वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१३
सहाभाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।०८
किरकोळ अंकास ........................ ०।४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ............।०

Rs.
annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

Advertisements
Below 10 lines...2R
per line over10...4 a
Repetition per line3a


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXVI AKOLA MONDAY 2 MAY 1892 NO 17

वर्ष २६ सोमवार तारीख २ माहे मे सन १८९२ इ० अंक १७


नोटीस

पिंपळगांवराजा ता. १६-४-९२

तिर्थरूप रा. रा. नारायण पांडुरंग देशपांडे परगणे पिंपळगांवराजा साष्टांग नमस्कार वि. मी या पत्रद्वारें अशी नोटीस देतो कीं मजकडे आपले सन १३०० फसली साला बद्दल पटवारी पणाची रकमे पैकीं १२८ रुपये देणें राहिलें आहेत ते पावती देऊन घेऊन जाण्या बदल आपणास पांच चारदां ह्मटलें. दुसरे विद्यमान तहसिल्दार साहेब तालुके मलकापूर यांच्या मुकाबिल्यांतही मीं अशी जबानी दिली आहे कीं पावती मिळाली नाहीं ह्मणून रकम राहिली. असो शिवाय हल्लीं सन १३०१ फसली सालच्या मुशाहिऱ्या पैकीं १९० रुपये घेऊन जावे ह्मणोन तुमचे कडेस गोविंद सखाराम कु. गोविंद भास्कर कु. बापु वहिलें असे तीन इसम पाठविले असोन तीही रकम पावती देऊन नेली नाहीं. ही रकम नेण्या विषयी मी आपणास ह्मणून थकलों आता त्रस्त होऊन शेवटीं या नोटिशीद्वारें आपणास रकम घेऊन जाण्या विषयीं १५ दिवसांची मुदत देत आहे. ही नोटीस पावल्या पासोन नमुद केलेले मुदतींत जर आपण पावती देऊन दोन्ही साला बद्दलची रकम न न्याल तर मग तुमची कोणत्याही प्रकारची सबब ऐकिली जाणार नाहीं हें खूब समजावें. तत्रापी आता पावती यावी व रकम घ्यावी श्रुत होय ही विज्ञप्ती.

गणेश मोरेश्वर देशपांडे प्रगणें पिंपळगांवराजा ता. मलकापूर जि. बुलडाणें

नोटीस

परशराम वल्लद नारायण गांवडे जात कुणबी राहणार देऊळगांव प्रगणें पातूर सेखबाबू यांसः—

नोटीस देणार गिरजी मर्द परशराम राहणार हल्लीं चतारी नोटीशीनें असें कळवितें कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न होऊन सुमारें बारा वर्षें जाहलीं. मी शहाणी होऊन आज चार वर्षें झालीं. ह्या चार वर्षांत नवऱ्या पासून बायकोस जें सुख असतें तें तुमचे पासून मजला मिळण्याचें कांहीं एक साधन तुमचे जवळ नाहीं. मी आज चार वर्षें तुमचे नांवावर कर्ज काढून रुपये १८०.खाल्ले आतां मजला कर्जही मिळत नाहीं व हे रुपये मजला मिळावेत ह्मणून तुह्मास बहुत वेळां विचारले परंतु रुपये न देतां तुम्ही मजला शंभर रुपये बदल बैलगाडी दिली व बाकीचे रुपये राहिले ते ८० पुढें एक दोन दिवसांत देण्याचे ठरविलें. त्यासही चार दिवस झाले परंतु रुपये आले नाहींत तर नोटीस पावल्या पासून दोन दिवसांत रु.८० राहिलेले द्यावे न दिल्यास रीतीप्रमाणें काम चालवून ह्या नोटिशीच्या खर्चासुद्धां अखेर निकाल होईपर्यंत जें नुकसान होईल तें भरून घेतलें जाईल. व तुह्मी पुरुषत्वांत नाहीं ह्मणून मी दुसरा घरठाव करीन हें तुह्मास कळावें ह्मणून दिली नोटीस ता० २७–४–९२

सहीची निशाणी बांगडी गिरजी मर्द परशराम हीची असे.

## पत्रव्यवहार

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतीलच असें समजूं नये

पुसद ता. २४–४–९२

गुदस्त सालीं वाशीम जिल्ह्यांत बरेच डाके पडले. या वर्षीही डाके कमी पडत आहेत असें नाहीं. डाकेखोर लोक आपले हेतू साधण्या करितां अनन्वित राक्षसी कर्में करण्यास बिलकुल मागेंपुढें पाहत नाहींत. डाके पडण्यास कारणें दोन असावींत असें वाटतें. एक तर लांबलचक जंगली जिल्ह्याकरितां पोलीस पुरेसें नाहीं, दुसरें बंदी जंगल पुष्कळ आणि मोंगलाई सरहद्द लागून असल्या मुळें डाकेखोर लोकांस आश्रय घेण्यास फावतें. मे० देविस साहेब बहादूर डे० कमिशनर यांचें आश्रान्त मेहनतीनें पुसद तालुक्यांतील खरूज या गांवीं पडलेला डाका पत्यांत येऊन डाकेखोर लोकांना कडक शिक्षा झाल्या त्यावरून थोडीशी दहशत बसल्या सारखें वाटत आहे. साहेब बहादूर यांना लोकांच्या स्थितीची चांगली माहिती आहे. कनवाळू असल्यामुळें लोकांचा जमाव बरा आहे असें पाहतांच उपदेशपर भाषण करण्याची संधी ते जाऊं देत नाहींत. डाकेखोर आले असतां त्यांना पकडण्याचे युक्ती कशी योजावी धैर्य कसें धरावें, एकी कशी असावी वगैरे मुद्दे भाषणांत हटकून यावयाचेच. लोकांना आत्म संरक्षणार्थ बंदुकीचें लायसेन्स देण्याचें साहेब बहादुरांनीं काम झपाट्यानें चालूं दिलें आहे. साहेबांना मराठी आणि उर्दू येत असल्यामुळें गरीब लोकांची दाद लवकर लागते.

लिहिण्यास आनंद वाटतो कीं, पुसद येथील शाळेवर रिसोड येथील मास्तर येणार होते परंतु तसें न होतां हल्लीं असलेले मास्तर कायम केल्याचें समजतें. मास्तर जुने असून लोकप्रिय आहेत.

मे० शामराव साहेब अव्वाची कोर्ट पुसद हे रजेवर गेले. तरी त्याचे रजेत त्यांच्या कामाची व्यवस्था काय झाली हें समजलें नाहीं. कोर्ट सुटी असल्यामुळें दिवाणी काम बंद राहील, फौजदारी संबंधीं काम पुसद तहसिलदार साहेबांकडे लोकांचे सोयी करितां जाईल असा अनुमान आहे.

पुसद येथील हास्पिटल असि० यांनीं मोठ्या मेहनतीनें नवीन दवाखान्याचे इमारतींत गृहप्रवेश प्रीत्यर्थ सभा भरविली. सभ्य गृहस्थ सभेस आले होते. प्रसिद्ध फयाजुद्दिन साहेब व बळीराम जिवाजी यांनीं अनुक्रमें उर्दूंत आणि मराठींत निबंध वाचला. डाक्तर साहेब गरिब लोकांवर फार मेहेर नजर ठेवीत आहेत हें त्यांना भूषणाहें आहे—क्षणभंगुर सुखा साठीं इतर कामांत खर्च न करितां सार्वजनिक कामास उदार आश्रय द्यावा अशी बळीराम जिवाजींची सुचना आहे त्याकडे सुज्ञ लोक जरूर विशेष लक्ष्य पुरवितील. कळावें.

आपला
"मित्र"

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध ६ शके १८१४

## फारेस्ट खातें

(मा. अं. व पुढे चालूं)

फारेस्टाच्या तिन्ही जंगलांच्या सीमा मर्यादित करण्याचीं व पूर्वीं केलेल्या सीमा कायम राखण्याचीं कामें या वर्षांत चाललीं होतीं परंतु स्टेट फारेस्ट कडेल सीमा आंखण्याचें काम अकोला जिल्ह्यांत अजून व्हावयाचें असून कित्येक ठिकाणीं अद्याप बरोळ्या ही घातलेल्या नाहींत. बंदी जंगल व मोकळें जंगल या मधील चतुस्सीमा घालण्यानिमित्त एकंदर साल अखेरीस १०३२ रुपये खर्च आला आहे.

जंगलास आग लागून नास धूस होऊं नये ह्मणून ७,११,२९२ एकरा एवढ्या जमिनीवर नीट बंदोबस्त ठेविला असून त्या एका चौरस मैला मागें रु.७ आ.२ या प्रमाणें खर्च पडला आहे. वरील एकरापैकीं ६,९४,२९० एकर जंगलास आगीचा कांहीं उपद्रव झाला नाहीं परंतु बाकीच्या ठिकाणीं पाहिजे होता तेवढा बंदोबस्त राहिला नाहीं वणी जिल्ह्यांत सन १८८९-९० सालीं जी सुधारणा झाली होती ती या सालीं कायम राहिली नाहीं आणि त्यामुळें तिकडील जंगलांत पुष्कळ वेळा आगी लागल्या होत्या या आगी कांहीं जण बुद्धि पुरस्सर लावतात असा सरकारी आफिसरांस वहिम येतो तरी फौजदारी खटला करण्या पुरता पुरावा नसल्या मुळें स्वस्थ बसणें भाग झालें परंतु या खेरीज सरकारी फारेस्टाला लागूनच जपइनामदार लोकांचीं कुरणें आहेत तीं मोठमोठीं असल्या मुळें त्यांच्यावर योग्य देखरेख ठेविली जात नाहीं आणि या कुरणांतील आगींचा फैलाव सांसर्गानें सरकारी फारेस्टातून होऊन पुष्कळ नुकसान होत असतें. आणि शिवाय खालसा झालेल्या खेड्यांतील पाटील कडून आग लागूं नये म्हणून व्यवस्था करण्या साठीं हरप्रकारें मदत मिळते त्या प्रमाणें इनामदारांकडून त्यांच्या हद्दींत साह्य मिळत नाहीं ही खेदाची गोष्ट होय.

स्टेट फारेस्टांतून गुरें चारण्यास परवानगी नाहीं. फक्त बुलढाणे जिल्ह्यांत इतर कुरणें लोकांच्या उपयोगासाठीं नसल्यामुळें स्टेट फारेस्टांतून गुरें चारण्याची मोकळीक कायम ठेविली आहे. जनावरां साठीं जीं कुरणें राखलीं आहेत तीं परत फारेस्ट खात्याच्या ताब्यांत देऊन सरकारी जंगलांतून आळीपाळीनें फुकट शेतकीचीं गुरें चारण्याचा परवाना काढावा म्हणजे त्या योगें फारेस्टांतील कुरणें पुन्हां मोठ्या जोमानें वाढतील आणि सहजीं चांगला फायदा होईल. परंतु मागें मोजणी झाली त्या वेळीं निरनिराळ्या गांवा करितां कुरणें स्वतंत्र ठेविलीं होतीं तीं लोकांच्या ताब्यांतून हिसकाऊन घेतली जावींत हें कोणासही आवडत नाहीं त्या अर्थी सध्यां चालली आहे तशी व्यवस्था कायम ठेवणें हें फार बरें. वऱ्हाडांतील सपाटीच्या भागांतील गांवांना कुरणांची अत्यंत जरूरी आहे आणि तशीं कुरणें नसल्या मुळें कित्येक स्थळीं लागवडीच्या जमिनी कुरणासाठीं निराळ्या राखून ठेविल्या आहेत. तेव्हां सरकारी जंगलांतून गुरें चारण्याच्या सोयी जव्या करून देणें पुष्कळ प्रकारें भाग आहे आणि त्या सोयी करून देण्याच्या तजवीजी कडे रेसिडेंट साहेबांचें लक्ष्य लागलें आहे हें पाहून मोठा संतोष वाटतो.

इंडिया कौंसिल बिलाचें दुसरें वाचन हाऊस आफ कामन्स सभेपुढें झालें आणि आतां कामन्स सभेची कमिटी बसून बिलाच्या खर्ड्यांतील प्रत्येक कलमा संबंधानें वाटाघाट होऊन नंतर काय तो अखेर निकाल तिसऱ्या वाचनाचे वेळीं लागेल. सांप्रतचें कौन्सल बिल दुसऱ्या वाचना पर्यंत निभावलें ही मोठी आनंदाची गोष्ट होय. दुसऱ्या वाचनाच्या वेळीं बड्या बड्या व लोकमान्य गृहस्थांचीं भाषणें झालीं तीं सर्व इंत्थभूत वाचण्यास मिळालीं आणि त्यावरून तारायंत्रद्वारा विलायतच्या बातम्या लागतात त्यापासून कित्येक प्रसंगीं मनाला भ्रंश पडून निरनिराळ्या प्रकारच्या कोते विचारांनीं मन अपूर्ती कळलेली हकीकत आपल्या कल्पना सामर्थ्यानें पूर्ण सविस्तर कसें रचतें याचा दाखला आह्मास आला. मि. ग्लाडस्टन साहेबांच्या भाषणाच्या त्रोटक व तारेनें कळलेल्या सारांशानें पुष्कळ जण नाउमेद झाले होते. परंतु वास्तविक प्रकार कांहीं तसा नाहीं. अशा ऐन निर्वाणीच्या प्रसंगीं ब्राडला साहेबा सारखे माहितगार व धूर्त मुत्सदी पाहिजे होते असें मात्र वारंवार स्मरण होतें. सध्यांच्या कौंसिल बिलांत लोकनियुक्त प्रतिनिधी निवडण्याच्या तत्वाचा स्पष्ट उल्लेख किंवा अंत-

गेत समावेश नाहीं. हिंदुस्थानचीं कायदे कौंसिलें आजकाल आहेत त्यांत कौंसिलदारांची संख्या अल्प आहे व लोकांच्या विचारांस कांहींच मान मिळत नाहीं. या दोन गोष्टी सदहूं बिलांत घातल्या आहेत परंतु त्या इतक्या मर्यादित व संबाधित केल्या आहेत कीं त्या पासून वास्तविक लोकमताचा विजय होण्यास अवकाश फार थोडा सांपडेल. कर्झन, ग्लाडस्टन, टेंपल, स्वान सीमोरको इत्यादि थोर थोर मुत्सद्यांचीं भाषणें झालीं त्यांत वादविषय हा पडला आहे कीं लोकनियुक्ततेच्या तत्वाची अंमलबारी व्हाईसराय साहेबांच्या सल्यावर, विचारावर व अनुभवावर सोंपवावी आणि त्या तत्वाची समावेशता बिलांत असूं नये. ग्लाडस्टन साहेबांचें ह्मणणें कीं कौंसिलदारांच्या लोकनियुक्तते संबंधानें कामन्स सभेनें कांहीं कायदा करूं नये. हिंदुस्थानांत अनेक धर्मपंथ, अनेक जाती व अनेक पक्षप्रतिपक्ष आहेत तेव्हां त्यांस महत्व व अधिकार मिळून विघ्नपरंपरा व अनर्थसमुच्चय होऊं नये. खरोखरच्या लोकमताला योग्य मान दिलाच पाहिजे आणि तो सन्मान कसा द्यावा हें हिंदुस्थान सरकारास नीटपणें कळेल. त्या अर्थीं हिंदुस्थान सरकारास कामन्स सभेनें कायद्यानें बांधून घेऊन त्यांच्या अधिकारांस जबरदस्त आळा घालून लोकनियुक्त प्रतिनिधी निवडण्याच्या अधिकाराला अनर्थावह दिशा मिळूं नये ह्मणून त्या संबंधानें सर्व अष्टाधिकार हिंदुस्थान सरकारच्याच ताब्यांत ठेवावे.

लोकनियुक्ततेच्या अधिकाराचा दुरुपयोग होऊं नये म्हणून कौंसिल बिलांत त्याचा उल्लेख नको ही विचाराची कोटी कांहीं नवीन नाहीं. हा कोटिक्रम नित्यांतला आहे. कामन्स सभेला हिंदुस्थानची माहिती नसते तेव्हां तें म्हणणें यथार्थ आहे. परंतु हिंदुस्थान सरकारावर जो मुख्य कार्यभाग सोंपविला जातो तो योग्य प्रकारें सिद्धीस नेण्यास आमचें सरकार कितपत कार्यदक्ष व उदारवृत्तीचें व कळकळीचें आहे हें लक्ष्यांत आणलें म्हणजे आमची हतभाग्यता आम्हास फार वाटूं लागते. प्रभु धनपरायण, कार्यसाधु व बाह्य दृष्ट्या न्यायशील, असा निघाला तर त्या पुढें प्रजाजनांचा काय पाड!

वरील कौंसिल बिल पसार होवो अगर न होवो आम्हांस राष्ट्रीय सभेची चिकाटी बळकट व मजबूत धरली पाहिजे. राष्ट्रीय सभेनें लोकमत इतकें प्रज्वलित व कार्यक्षम झालें आहे कीं उद्यांचीं कौंसिल बिलें हीं राष्ट्रीय सभेच्या जयपताका होत. राष्ट्रीय सभे मुळें कामन्स सभे पर्यंत हिंदुस्थानच्या कौंसिलाचा बोभाटा गेला इतकेंच नव्हे तर त्या संबंधानें निरनिराळे बिलाचे मसुदे चमकूं लागले. हिंदुस्थान सरकारास ही दिवसें दिवस आपल्या नांवलौकिका साठीं निदान सढळ व उदार व्हावें लागत आहे. राष्ट्रीय सभेच्या सुविचारांची व लोकमत प्राबल्याची अवहेलना सोडून योग्य सत्कार करणें त्यांस भाग झालें आहे. आपले हेतु सफळ होण्यास विलंब लागेल तरी आपण निराश होतां कामा नये. आणि मधून मधून आपणास हीं भावी यशाचीं चिन्हें दिसतात त्या वरून तर आपण अधिक उल्हासानें व एकनिष्ठेनें राष्ट्रीय सभेच्या सेवेस लागलें पाहिजे. आपण राष्ट्रीय प्रकरणांत हल्लीं अल्प बहु सुखें उपभोगीत आहों त्या बद्दल आपल्या पूर्वजांचें स्मरण राखून आपल्या पुढील पिढींच्या आदरास व कृतज्ञतेस पात्र अशा चिरस्थायी सत्कृत्यांत व सुखपरिणामी संस्थांत आपलें आयुष्य वेंचणें हीच आपली इतिकर्तव्यता समजली पाहिजे.

---

इंडिया कौंसिल बिल बहुतेक पसार झाल्या सारखें आहेच. बिलाचा कमिटीमध्यें विचार चालला असतां उपसूचना ज्या ज्या आल्या त्या त्या नापसंत ठरल्या आणि त्यांत विशेष आनंदकारक गोष्ट कीं मि. म्याक्लिन साहेबांचा सफै पाडाव झाला. हिंदुस्थान सरकारनें लोकनियुक्त कौंसिलदार निवडण्याची पद्धत सुरू करण्या पूर्वी पार्लमेंटची स्पास संमती पाहिजे आणि ती संमती मिळाल्या खेरीज ही पद्धत सुरू झाली तर सांप्रतच्या बिलानें इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानचें राज्य गमावण्यास आरंभ केला अशा मतलबाची उपसूचना व तिचें समर्थन मि. म्याक्लिन यांनीं केलें परंतु त्या नेटीव द्वेष्ट्याच्या म्हणण्याला सर्वांनीं नकार चोखपणें सांगितला. खुद्द अंडर सेक्रेटरी यांनीं स्पष्ट कळविलें आहे कीं नवीन बिला प्रमाणें कौंसिलदार लोकनियुक्ततेच्या तत्वाला धरून निवडले जाण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें वाटेल ती योग्य पद्धत चालूं करावी. ग्लाडस्टन साहेबांवर आमची मोठी भीस्त होती त्या प्रमाणें आमचे मनोरथ पूर्ण झाले नाहींत तरी त्यांनीं कानसरव्हेटिव व लिबरल अशा दोन्ही पक्षाला जुळता असा सामोपचाराचा विचार काढून लोकनियुक्त प्रतिनिधी कायदे कौंसिलांतून निवडले जाण्याची तजवीज हिंदुस्थान सरकारावर सोंपविली. स्वान साहेबांनीं हिंदुस्थानच्या राष्ट्रीय सभेची कामगिरी सोळा आणे बजाविली. सारांश इंडिया कौंसिल बिला पासून आपणांस तीन गोष्टी लाभतील त्या येणें प्रमाणें:—कायदे कौंसिलांतील सभासदांची संख्या वाढेल. दुसरी गोष्ट प्रत्येक वर्षी बजेटावर वादविवाद करण्या विषयीं मोकळीक मिळेल ही होय. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतील प्रकरणा संबंधानें प्रश्न विचारण्याचा हक्क मिळणार हें तिसरें कलम आहे. कौंसिलांतील सभासदांची संख्या वाढविली आहे तरी त्या प्रकरणांत आमच्या मनोदया प्रमाणें कांहीं जुळून आलें नाहीं तरी आम्ही अशी उमेद बाळगतो कीं एखादा सोन्याचा दिवस आपणांस कालवशें प्राप्त होईलच होईल आणि तेव्हां प्रजा सर्व प्रकारचीं सत्तासूत्रें राज्यकर्त्यांच्या एकमतानें आपल्या हातीं चाळवील व उभय पक्षीं सुखावह गोष्टी घडून येतील. बजेटा विषयींची सवलत ही प्रजेस व सरकारास गुणावह आहे. नवीन कर बसवावयाचे असतात तेव्हां बजेटाची फोड कायदे कौंसिलांत होत असे आणि अशी स्पष्टता गेल्या तीस वर्षांत फक्त सोळा वेळा झाली होती. इलाखे निहाय व सर्व हिंदुस्थाना साठीं मिळून खजिन्याची व्यवस्था सरकार कशी काय ठेवितात, लोकांच्या नाना अपवादांस सरकारचा जबाब काय आहे, वसूल जमाबंदीच्या बाबींत फरक होण्यास कसकशा सवडी आहेत वगैरे गोष्टी योग्य द्वारें प्रजेच्या नजरे समोर आल्या म्हणजे मतभेद व गैरसमज हे आपोआप विलयास जातील. राज्यकारभारा विषयीं प्रश्न विचारण्याचा हक्क कौंसिलदारांस मिळाल्यानें सरकारचे निरनिराळ्या प्रकरणांतील विचार व प्रजेचे त्या त्या बाबदींत ह्मणणें हीं एकदम कळल्यानें उभयपक्षीं विशेष खुलासा होत जाईल आणि सहजीं अनेक कायद्याच्या सुधारणा अमलांत येतील.

---

मि. म्याकलीन साहेबांचे कौंसिल बिलावर बोलतांना तारे तुटले तें पाहून त्या मनुष्यास कोणत्या सार्थ विशेषणांनीं संबोधावें किंवा त्यास कोणाची उपमा द्यावी ह्मणजे त्यांच्या थोरपणाची, विद्वत्तेची व विचारसरणीची शहानिशा लोक करूं शकतील हें आह्मांस सांगवत नाहीं. मि. ए. ओ. ह्यूम साहेब राजद्रोही आहेत तेव्हां त्यांस सुळावर चढवावें किंवा गोळी बारानें ठार मारावें असे म्याकलिन साहेबांनीं उद्गार काढले होते. ह्यूम साहेब किती ही चुकले किंवा त्यांच्या हातून केवढा ही अपराध घडला तरी त्यांची या देशा प्रीत्यर्थ अखंड, अमोल व अप्रतिम सेवा कोणीकडे आणि म्याकलिन साहेब कितीही निर्दोष व शहाणे असले तरी त्यांचा विघ्नसंतोषीपणाचा, अनुदार प्रवृतीचा आणि अवलक्षणाचा बाणा कोणीकडे!

---

ह्यूम साहेबांच्या सरक्युलरांतील दारिद्र्य वर्णन विलायतच्या ब्रिटिश कांग्रेस कमिटीस कबूल आहे परंतु त्या स्थितीवरून इतिहासदृष्ट्या निघणारीं अनुमानें मान्य नाहींत ह्मणून ह्यूम साहेबांच्या सरक्युलरावर प्रतिकूळ अभिप्राय तिनें प्रसिद्ध केला आहे. सरक्युलराच्या लिहिणारांचा प्रांजलपणा व राज्यनिष्ठा सर्वजण कबूल करितात पण त्या लेखांतील विषया संबंधानें मतभेद पडला आहे तरी वादग्रस्त दिशा सोडून देऊन त्या सरक्युलराच्या मथितार्था कडे आपण सावधान चित्तानें पाहून राष्ट्रीय सभेचा मोर्चा विलायत कडे फिरविण्याचा प्रयत्न अव्याहत चालू ठेविला पाहिजे.

---

**The Berar Samachar**

MONDAY, MAY 2, 1892

The India Councils Bill was moved for the second reading by Mr. Curzon the Under Secretary of State and after the long, elaborate and well thought out speeches that were made at the time, it promises to be made a part of the Statue Book with scarcely any modifications. The Bill viewed in itself, falls short of the aspirations which have so repeatedly found an expression in the annual sessions of the National Congress and our satisfaction, therefore, is not so complete as it would otherwise have been if emphatic recognition had been given to the elective principles. The Under Secretary in the course of his 'lucid and comprehensive speech explained the object the government had in view in introducing the Bill "The object is to widen the basis and expand the functions of the Government of India, to give further opportunities than at present existed to the Non-official and Native element in Indian society to take part in the work of Government and in this way to lend official recognition to that remarkable development both in political interest and capacity &c." The object is a landable one and worthy of any civilized and liberal Government; and no sane man can reasonably quarrel with the Government on this score.

The changes the Bill proposes to effect are three in number. The first is the concession of the privilege of financial criticism in both the supreme and provincial councils. The second is the concession of the right of interpellation and the third is the addition to the number of members of both classes of councils.

The first change as pointed out by the Under Secretary, will undoubtedly be productive of results, beneficial alike to the Government as well as to the people. It will afford ample opportunities for the Government 'to explain their financial policy, to remove misapprehensions and to answer criticism and attack.' Members of the council will be placed in a better position than that they hitherto occupied by being allowed 'to indulge in a full and free criticism of the financial policy.'

The second change confers the right o Interpellation or of asking questions on matters of public interest.

The third change has in view the reconstitution of the Supreme as well as the Provincial Councils. It is this reform which concerns our interests deeply and which underlies every other reform. Mr. Schwnn moved an amendment to the Bill to include the elective principle in the body of the Bill. In his advocacy he brought his whole knowledge acquired by the close study of Indian affairs and by his personal attendance at one of the Congress Sessions to bear upon the question and briefly reiterated the story of the many grievances under which we labour and of the small feeble and miserable voice we are allowed in the administration of our country. But he had to withdraw the amendment on the suggestion of Mr. Gladstone who though agreeing with him in looking upon the language of the Bill as insufficient and unsatisfactory in so far as it was ambigious held that the amendment was only in amplification and not in contradiction of what the speech of the Under Secretary implied. Mr. Curzon while referring to the amendment in favour of the elective principle observed that 'the Bill does not exclude some such principle be the method election or selection or delegation or whatever particular phrase they would like to employ.

In giving effect to the Bill, the Government of India would consider the spirit of the Bill and the motives that predominated in its framing. The language of the Bill states that nominations are to be made but which system is to operate, nowhere is clearly defined. "It is plain that those who have adopted the language have something beyond mere nomination. With this interpretation of the Bill by the Grand old man before us coupled with that of the Under Secretary given above, we think it rests solely with the Govt. of India to devise means to improve the legislative machinery of this great dependency and to give that high and intelligent tone to our councils whose absence was regretted by a series of previous Viceroys. The Government of Lansdowne have already pronounced the present system of nomination defective and now it is their happy lot if the sympathy they once expressed in our welfare is not at all extinct, to make a new and wholesome departure from the system in vogue and place the Government upon a more efficient and solid basis. As the whole nation is not prepared to a man to appreciate the principles of representation Government would do well to avail themselves of the public institutions that are strewn over the land from one end to the other.

The Congress has been credited with the origin of the Bill. If our National movement has succeeded only so far as to draw the attention closely to the Indian questions, the money and energy that have been lavishly spent upon the Congress sessions, continuously these seven years, cannot be said to have been absolutely thrown away. Under the present circumstances we must remain contented with half a loaf when full bread is out of the

question. The rights of Interpellation and of criticism upon the financial statement are valuable in themselves. Patience and perseverance are known to have effected wonders in the politics of civilized nations. And if we but make these as the ruling guides of our public movements, a day will surely arise when we will find ourselves in the enjoyment of those privileges which are at present the birth— right of every Englishman.

---

## वऱ्हाड

हवामानः— उन्हाळा प्रखर आहे तरी वारा सतत व सपाट्यानें वाहल्यानें उष्मा कमी भासतो. कालपासून वाऱ्याची गती दर तासास तेरा चौदा मैलाहून अधीक असून शिवाय अभ्रें येतात. प्रस्तुत आकाशांतील लक्षणावरून वर्षाकालास आरंभ लवकर होईल असें दिसतें. उमरावतीस थोडा पाऊस ही पडला. रोगराई तुरळक असल्याविषयीं लोक बोलतात. गेल्या सोमवारीं धरणीकंपाचा किंचित् भास येथील कांहीं स्थळीं झाल्या बद्दल समजतें.

अकोल्याच्या गोरक्षणी सभेचे सेक्रेटरी रा. रा. व्यंकटेश अंबादास हे कळवितात कीं ता० १६-४-९२ रोजीं सभा भरून गोरक्षणावर उपदेशक पंधरावीस रुपये पर्यंतच्या पगारावर नेमण्याचा विचार ठरला आहे तेव्हां उमेदवारांनीं सेक्रेटरीकडे अर्ज पाठवावे. अर्ज आल्या नंतर वक्तृत्व गुणांत परीक्षा घेऊन उमेदवारा पैकीं एकजण पसंत केला जाईल.

मि. जे. ए. क्राफर्ड रेसिडेंटचे फर्स्ट असिस्टंट व सेक्रेटरी यांची बदली हैद्राबादेहून हिंदुस्थान सरकारच्या अंडर-सेक्रेटरीच्या जागीं गेल्या विसावे तारखे पासून झाली.

मि. जी. आर. इरविन यांस रेसिडेंटचे फर्स्ट असि. व सेक्रेटरी नेमून त्यांचा दर्जा तिसरे वर्ग पोलिटिकल एजंट पासून दुसरे वर्गाला चढाविला.

मि. जे. क्रेग एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर वर्ग पूर्व वऱ्हाड यांस बलुचिस्थानाकडे सुपरिंटेंडींग इंजिनिअर आणि पोलिटिकल एजंटचे सेक्रेटरी नेमल्या प्रमाणें ते तिकडे रवाना होऊन त्यांच्या जागेचा चार्ज मि. आश साहेबांनीं घेतला.

येथील डायरेक्टरचे आफिसांत देऊगांवराजाचे हेडमास्तर रा. रा. शिवराम रघुनाथ कुळकर्णी यांस बदलल्या प्रमाणें ते रुजू झाले आणि त्यांच्या जागीं यवतमाळचे ४० रु. पगाराचे असि० रा. रा. गोपाळ गणेश परभुणे यांस पन्नासावर नेमून मुंडगांवचे हेडमास्तर रा. रा. वासुदेव विठ्ठल आंबेकर यांस यवतमाळास धाडलें.

वणीचे पोष्ट मास्तरानें सरकारी पैशाची अफरातफर केली होती परंतु आफिसच्या तपासणीच्या प्रसंगीं चुकत असलेल्या रकमेचा भरती करितां येणार नाहीं असें पक्के वाटल्या वरून गेल्या २६ वें तारखेस त्यानें विहिरींत उडी मारून आत्महत्या केली.

---

## वर्तमानसार.

दक्षिण अफ्रिकेंतून लंडन शहरीं फळफळावळ नेण्याची सुरवात झाली आहे असें कळतें.

तुर्कस्थान आणि इजिप्त ह्या दोन देशामध्यें कांहीं तंटा उपस्थीत झाला आहे. तुर्कस्थानच्या सुलतानानें केरो येथें तार पाठवून अयुब पाशा यास केरो येथून निघून येऊं नका असें कळविलें आहे. इजिप्तच्या खेदिवानें तुर्कस्थानच्या सुलताना कडे तार पाठवून आपली अशी तक्रार कळविली आहे कीं आपल्या तर्फे इजिप्त येथें जो थोरल्या कमिशनरच्या हुद्यावर मुकत्यार पाशा आहे तो आमच्या देशाच्या अंतस्थ कारभारांत ढवळ ढवळ करीत आहे त्याचा विचार करावा.

---

The following draft Rules framed under section 116 (*e*), (*g*), (*h*) of the Berar Municipal Law 1886, will be taken into final consideration by the Municipal Committee Akola after the 10th of June 1892. Objections to them, if any, should be submitted in Municipal office before the date (10th June 1892).

22nd April 1892 } Vyankatesh R. Mudholkar Secretary Municipal Committee Akola.

### THE DAILY VEGETABLE MARKETS.

1 The Municipal Committee may, with the sanction of the Deputy Commissioner fix, from time to time, the places and limits of the Daily vegetable Markets at Akola.

2 The daily vegetable Markets will be used for exposing for sale only the following articles:—

(*a*)All sorts of vegetables fresh or dried.

(*b*)All sorts of fruits and roots fresh or dried.

(*c*) Plantain and other leaves.

(2)No such articles shall be brought into these markets which are not intended for sale.

3 These articles will be exposed for sale on no other public or private ground than in the daily vegetable markets.

4 Dealers will not be allowed to occupy any other place within the limits of these markets for sitting and exposing articles for sale but that marked off by the Municipal Committee for such purpose, whether it be on a Chabutra or ground.

5 The daily vegetable markets will be open from 4 o'clock in the morning till 8 o'clock at night.

(*b* )Every dealer shall remove his articles from the market before 8 o'clock at night.

6 Persons found begging or intoxicated with strong drinks shall be removed from these markets by any Municipal servant or officer, with or without the assistance of the Police.

7 Any person causing damage to Chabutras or any other erection put by the Municipal Committee, or trees planted by them, or any other Municipal property within the limits of these markets, shall be liable to make good the loss, the amount of loss being settled by the Municipal Committee.

8 No person shall commit any nuisance within the limits of these markets.

9 No articles pronounced by the Civil Surgeon Akola or by the Medical officer in charge Charitable Dispensary Akola to be unfit for human consumption shall be allowed to be sold or offered for sale in these markets.

10 The daily vegetable market will be under the management and supervision of the Conservancy Superintendent who will be primarily responsible for the proper sanitation and neat appearance of these markets and due observance of these rules.

11 Persons infringing these rules shall be liable, on conviction before a magistrate to pay a fine which may extend to fifty rupees.

### THE DAILY MEAT MARKETS

1The Municipal Committee may with the sanction of the Deputy Commissioner fix from time to time the places and limits of the daily meat markets at Akola.

2 These markets will be used for exposing for sale only the following articles:—

[1] Animal flesh, intended for human food

[2] fish, fresh or dried

(*b* )No such articles shall be brought into these markets which are not intended for sale.

3 These articles will be exposed for sale on no other public or private ground than in the daily meat markets.

4 Dealers will not be allowed to occupy any other place within the limits of these markets for sitting and exposing articles for sale but that marked off by the Municipal Committee for such purpose, whether it be on a Chabutra or on ground.

5The Daily meat markets will be open from 4 O'clock in the morning till 8 o'clock at night.

(*b*) Every dealer shall remove his articles from the markets before 8 o'clock at night.

6 Persons found begging or intoxicated with strong drinks shall be removed from these markets by any Municipal servant or officer with or without the assistance of the Police.

7 Any person causing damage to Chabutras or any other erections put up by the Municipal Committee, or trees planted by them, or any other Municipal property within the limits of these markets, shall be liable to make good the loss; the amount of loss being settled by the Municipal Committee.

8 No person shall commit any nuisance within the limits of these markets.

9 No articles pronounced by the Civil Surgeon Akola or the medical officer in charge of the Charitable Dispensary Akola to be unfit for human consumption shall be allowed to be sold or offered for sale in these markets.

10 The Daily meat markets will be under the management and supervision of the Conservancy Superintendent who shall be primarily responsible for the proper sanitation and neat appearance of the markets and due observance of these rules.

11 Persons infringing these rules, shall be liable on conviction before a magistrate to pay a fine which may extend to Rs.50.

### THE PUBLIC SERAIS.

1 All public serais, under the management of the Municipal Committee, shall be used for purposes of halting only by *bonafide* travellers.

2 No traveller will be allowed to reside in these serais consinuously for more than 72 hours except with the express permission subject to the sanction of the Municipal Committee—of the Vice Chairman or in his absence the Conservancy Superintendent or Secretary who will grant permission on conditions that he may deem fit to impose.

3 The Vice Chairman or in his absence the Conservancy Superintendent or Secretary may—subject to the sanction of the Municipal Committee allow the use of public serais to persons other than *bonafide* travellers for such purposes and on such conditions as he may deem fit, for a period not exceeding 7 days but not to the exclusion of travellers.

(b). The Municipal Committee may reserve rooms or any other portion of the serais for not being freely allowed to be used; and may give out such rooms or portions of the serais for being used on such conditions as the Municipal Committee may deem fit.

4 Any person causing damage to the building of the serais or to any other public property within the premises of these serias shall be liable to make good the loss; the amount of loss being settled by the Municipal Committee.

5 Travellers or any other persons found intoxicated with strong drinks or attacked with infectious diseases shall be removed from the serais by the Conservany Inspector under the orders of the Conservancy Superintendent.

6 All public serias under the Municipal management will be managed and supervised by the Conservancy Superintendent who will primarily be responsible for the proper sanitation and neat appearance thereof, and for due observance of these rules.

7 No person shall commit any nuisance within the limits of these serais.

8 Persons infringing these rules shall be liable, on conviction before a Magistrate, to pay a fine which may extend to fifty rupees.

### THE BURIAL AND BURNING GROUNDS

1 The Municipal Committee may, with the sanction of the Deputy Commissioner, fix from time to time the places and limits of burial and burning grounds at Akola.

2 No person shall, without special permission of the Municipal Committee bury or burn a human dead body in any other ground except in that which has been fixed for the purpose by the Municipal Committee under rule No. 1. and shall not leave the body insufficiently burnt or buried, as the case may be.

3 No person shall erect a tomb or any other monument on the ground beneath which any dead body is buried without the permission of the Municipal Committee.

4 Any person causing damage to Chabutras or any other constructions put up by the Municipal Committee or trees planted by them or any other Municipal property within the limits of these grounds shall be liable to make good the loss, the amount of loss being settled by the Municipal Committee.

5 No person shall commit any nuisance within the limits of these grounds

6 These burial and burning grounds will be under the management and supervision of the Conservancy Superintendent who will be primarity responsible for the proper sanitation and neat appearance of the grounds and due observance of these rules.

7 Persons infruiging these rules shall be liable on conviction before a magistrate to pay a fine which may extend to fifty rupees.

### PUBLIC SOURCES OF WATER SUPPLY

1 The Municipal Committee may from time to time, with the sanction of the Deputy Commissioner determine as to in what certain portions of the river Morna, bathing, washing clothes or animals, and fishing shall be freely allowed to the public and in what portions they shall not be allowed.

(*b*) The Municipal Committee may with similar sanction impose similar restrictions with regard to public wells.

2 No person shall commit any nuisance in or about these public sources of water supply.

3 All these public sources of water supply will be under the management and supervision of the Conservancy Superintendent who will be primarily responsible for the proper sanitation & neat appearance of these sources of water supply and due observance of these rules.

4 Persons infringing these rules shall be liable on conviction before a magistrate to pay a fine which may extend to Rs. 50.

पुढील नियमांचा मसुदा सन १८८६ च्या वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ११६ (इ), (ग), (ह) या अन्वयें तयार केला आहे. व तो ता० १० जून सन १८९२ नंतर मुनिसिपल कमिटी अकोलें यांजपुढें अखेरच्या विचारा करितां ठेवण्यांत येईल. तरी या संबधानें कोणाच्या कांहीं तकरारी असल्यास त्या त्यांनीं ता० १० जून सन १८९२ पूर्वी म्युनिसिपल आफिसांत दाखल कराव्या.

ता. २२।४।१८९२ व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर सेक्रेटरी मु० कमिटी अकोलें.

## रोज भरणारे भाजी बाजार.

१ मुनिसिपल कमिटी डे० कमिशनरच्या मंजुरातीनें अकोलें येथील रोज भरणाऱ्या भाजी बाजारांच्या जागा व हद्दी या वेळोवेळीं मुकर करील.

२. या भाजी बाजारांत फक्त पुढील जिन्नस विकी करितां ठेवूं दिले जातील:—

(अ) सर्व प्रकारच्या ताज्या व वाळलेल्या भाज्या

(ब) सर्व प्रकारचीं ताजीं व वाळलेलीं फळें, मुळें व कंद

(क) केळीचीं व इतर पानें

२ वर (अ), (ब), (क) यांत वर्णिलेले जिन्नस विकायाचे असतील तेवढेच बाजारांत आणावे. विकायाचे नाहींत असे हे जिन्नस बाजारांत आणूं नयेत.

३. हे जिन्नस भाजी भाजारा शिवाय इतर कोणत्याही खाजगी अथवा सार्वजनिक जागीं विकी करितां मांडूं नयेत.

४. भाजी बाजारांत ओव्यावर अगर जमीनीवर कमिटीनें जागा नमूद करून दिल्या असतील त्या खेरीज इतर जागीं उदम्यानें आपला माल विकी करितां मांडूं नये अथवा स्वतः बसूं नये.

५. भाजी बाजार सकाळीं ४ वाजे पासून तों रात्रीं आठ वाजे पावेतों खुला राहील.

(ब) कोणी ही उदम्यानें आपला माल रात्रीं आठ वाजल्या नंतर भाजी बाजारांत ठेवूं नये.

६ कोणी इसम भाजी बाजारांतून भीक मागतांना, दारूनें झिंगलेला, अथवा स्पर्श रोगानें पीडिलेला असा आढळेल तर त्यास कोणीही मुनिसिपल नौकरानें अथवा अधिकाऱ्यानें, पोलिसच्या मदतीनें अगर त्याशिवाय, बाजारांतून काढून द्यावें.

७. भाजी बाजाराच्या हद्दींतील ओटे, झाडें अगर इतर कांहीं सार्वजनिक वस्तु यांस कोणी कांहीं अपाय केल्यास त्या योगें होणारी कमिटीची नुकसानी त्यानें भरून दिली पाहिजे. नुकसानीची रकम मुनिसिपल कमिटी ठरवील.

८. कोणी इसमानें भाजी बाजाराच्या हद्दींत कोणतेंही प्रकारची घाण करूं नये.

९. अकोल्याचे सिव्हिल सर्जन अथवा धर्मार्थ दवाखान्याचे मेडिकल आफिसर हे जे जिन्नस मनुष्यास खाण्यास अयोग्य आहेत असें ठरवतील तसे जिन्नस भाजी बाजारांत विकूं दिले जाणार नाहींत.

१०. हे दररोजचे भाजी बाजार कान्सरव्हंसी सुपरिंटेन्डन्ट यांच्या व्यवस्थे खालीं व देखरेखी खालीं राहतील. व त्यांचें मुख्य काम, हे बाजार स्वच्छ व नीटनेटके ठेवणें व वरील नियम नीट रीतीनें पाळले जातात किंवा नाहीं हें पाहणें हें राहील.

११. जो कोणी हे नियम मोडील व तसें केल्या बद्दल मानिस्ट्रेटापुढें शाबिती होईल तो ५० रुपये पावेतों दंडास पात्र होईल.

## रोज भरणारे कसई बाजार

१. मुनिसिपल कमिटी, डेपुटी कमिशनरच्या मंजुरातीनें अकोलें येथील रोज भरणाऱ्या कसई बाजाराच्या जागा व हद्दी या वेळो वेळीं मुकर करील.

२. या कसई बाजारांत फक्त पुढील जिन्नस विकी करितां ठेवूं दिले जातील:—

(अ) मनुष्यें खातात असें मांस

(ब) मांस—ताजें व वाळविलेलें

(१) वर अ, ब, यांत वर्णिलेले जिन्नस विकायाचे असतील तेवढेच बाजारांत आणावे. विकायाचे नाहींत असे हे जिन्नस बाजारांत आणूं नयेत.

३ हे जिन्नस कसई बाजारा शिवाय इतर कोणत्याही खाजगी अथवा सार्वजनिक जागीं विकी करितां मांडु नयेत.

४. कसई बाजारांत ओव्यावर अगर जमिनीवर कमिटीनें जागा नमूद करून दिल्या असतील त्या खेरीज इतर जागीं कसायांनीं आपला माल विकी करितां मांडू नये, अथवा स्वतः बसूं नये.

५. कसई बाजार सकाळीं ४ वाजे पासून ता रात्रीं ८ वाजे पावेतों खुला राहील.

(ब) कसायांनीं आपला माल रात्रीं ८ वाजल्या नंतर कसई बाजारांत ठेवूं नये.

६ कोणी इसम कसई बाजारांतू भीक मागतांना, दारूनें झिंगलेला, अथवा स्पर्श रोगानें पीडिलेला असा आढळेल तर त्यास कोणी ही म्युनिसिपल नोकरानें अथवा अधिकाऱ्यानें पोलिसाच्या मदतीनें अथवा त्याशिवाय, बाजारांतुन काढुन द्यावें.

७ कसई बाजाराच्या हद्दींतील ओटे, झाडें, अगर इतर कांहीं सार्व जनिक वस्तु यांस कोणी कांहीं अपाय केल्यास त्या योगें होणारी नुकसानी त्यानें भरून दिली पाहिजे. नुकसानीची रकम म्युनिसिपल कमिटी ठरवील.

८. कोणी इसमानें कसई बाजाराच्या हद्दींत कोणते ही प्रकारची घाण करूं नये.

९. अकोल्याचे सिव्हिल सर्जन अथवा धर्मार्थ दवाखान्याचे मेडिकल आफिसर हे जे जिन्नस मनुष्यास खाण्यास अयोग्य आहेत असें ठरवतील तसे जिन्नस कसई बाजारांत विकूं दिले जाणार नाहींत.

१०. हे दररोजचे कसई बाजार कान्सरव्हंसी सुपरिंटेन्डेन्ट यांच्या व्यवस्थे खालीं व देखरेखी खालीं राहतील. व त्यांचें मुख्य काम, हे बाजार स्वच्छ व नीटनेटके ठेवणें, व वरील नियम रीतीनें पाळले जातात किंवा नाहीं हे पहाणें हें आहे.

११ जो कोणी इसम हे नियम मोडील व तसें केल्या बद्दल मानिस्ट्रेटा पुढें शाबिती होईल तो ५० रुपये पावेतों दंडास पात्र होईल.

## सार्वजनिक धर्मशाळा.

१ मुनिसिपल कमिटीच्या व्यवस्थे खालीं असलेल्या धर्म शाळांतून फक्त प्रवाशी लोकांस उतरूं दिलें जाईल.

२. कोणत्या ही प्रवाशास एकसारखें ७२ तासांपेक्षां जास्त वेळ धर्म शाळेंत, व्हाइस चेअरमन, व ते गांवीं नसल्यास कानसरव्हंसी सुपरिंटेंडन्ट अगर सेक्रेटरी, यांच्या परवानगी शिवाय राहूं दिलें जाणार नाहीं. व ही परवानगी त्या अधिकाऱ्यांस योग्य वाटेल त्या अटीवर ते देतील. त्यांनीं दिलेल्या परवानगीस म्यानेजिंग कमेटीची मंजुरी लागेल.

३. व्हाईस चेअरमन,व ते गांवीं नसल्यास कानसरव्हन्सी सुपरिंटेन्डन्ट अगर सेक्रेटरी यांनीं त्यांना योग्य वाटेल त्या कामा करितां व त्या अटीवर प्रवाशा शिवाय इतर लोकांस धर्मशाळा उपयोगा करितां ७ दिवस पावेतों द्यावी.या परवानगीस म्यानेजिंग कमेटीची परवानगी लागेल.धर्मशाळा अशा उपयोगा करितां देणें ती प्रवाशास जरूरीपात एवढी जागा सोडून बाकीची जागा द्यावी.

(ब) मुनिसिपल कमिटीस धर्मशाळेंतील कांहीं विवक्षित भाग अगर खोल्या राखून ठेवून त्या योग्य वाटतील त्या अटीवर उपयोगास देण्याचा अधिकार आहे.

४. धर्म शाळेची इमारत व तिच्या हद्दींत असलेल्या इतर सार्वजनिक वस्तु यांस कोणी कांहीं अपाय करील तर त्या योगें जी नुकसानी होईल ती त्यानें भरून दिली पाहिजे. नुकसानीची रकम मुनसिपल कमिटी ठरवील.

५. धर्म शाळेंत प्रवाशी अगर कोणी इसम दारूनें झिंगलेला अगर स्पर्श रोगानें पीडिलेला आढळेल तर त्यास कानसरव्हंसी सुपरिंटेन्डन्ट यांच्या हुकुमानें कानसरव्हंसी इनस्पेक्टर यानें काढून द्यावें.

६. या मुनिसिपल कमिटीच्या व्यवस्थे खालीं असलेल्या धर्मशाळेवर कानसरव्हंसी सुपरिंटेन्डन्ट यांची देखरेख राहील. व त्यांचें मुख्य काम, धर्मशाळा स्वच्छ व नीटनेटक्या ठेवणें व वरील नियम रीतीनें पाळले जातात किंवा नाहीं हें पहाणें हें राहील.

७ कोणी इसमानें धर्मशाळांच्या हद्दींत कोणतेही प्रकारची घाण करूं नये.

८ जो कोणी इसम हे नियम मोडील व तसें केल्या बद्दल मानिस्ट्रेट पुढें शाबिती होईल तो ५० रुपये पावेतो दंडास पात्र होईल.

## प्रेतें पुरण्याच्या व जाळण्याच्या जागा

१. म्युनिसिपल कमिटी, वेळो वेळीं डेपुटी कमिशनराच्या मंजुरातीनें अकोलें येथील प्रेतें पुरण्याच्या व जाळण्याच्या जागा व त्याच्या हद्दी मुकर करील.

२. म्युनिसिपल कमिटीची परवानगी मिळविल्या वांचून मनुष्याचें प्रेत, नियम १ अन्वयें नमूद केलेल्या जागे शिवाय इतर जागीं कोणी पुरूं नये अथवा जाळूं नये व अर्धे जाळलेलें अथवा पुरलेलें असें प्रेत टाकून त्या जागेवरून कोणी जाऊं नये.

३. मनुष्य पुरलेल्या जागीं म्युनिसिपल कमिटीच्या परवानगी वांचून कोणी कोणत्या ही प्रकारचें थडगें बांधू नये.

४. या प्रेतें पुरण्याच्या व जाळण्याच्या जागीं असलेल्या चबुतऱ्यास, झाडांस अगर इतर कांहीं सार्वजनिक वस्तुस जो कोणी अपाय करील त्यास त्या योगें होणारी नुकसानी भरून द्यावी लागेल. नुकसानीची रकम म्युनिसिपल कमिटी ठरवील.

५. या प्रेतें पुरण्याच्या व जाळण्याच्या जागेवर कोणी कोणत्या ही प्रकारची घाण करूं नये.

६. या प्रेतें पुरण्याच्या व जाळण्याच्या जागा कानसरव्हनसी सुपरिंटेन्डन्ट यांच्या व्यवस्थे खालीं व देखरेखी खालीं राहतील. व त्यांचें मुख्य काम, या जागा स्वच्छ व नीट नेटक्या ठेवणें व वरील नियम नीटरीतीनें पाळले जातात किंवा नाहीं हें पहाणें, हें आहे.

७. जो कोणी इसम हे नियम मोडील व तसें केल्या बद्दल म्याजिस्ट्रेटा पुढें शाबिती होईल तो ५० रुपये पावेतों दंडास पात्र होईल.

## पाणी भरण्याच्या सार्वजनिक जागा

१. कोणी नदीच्या कोणत्या भागांत लोकांस स्नान करण्यास, धुणें धुण्यास, जनावरें धुण्यास व मासे धरण्यास परवानगी देण्यांत येईल व कोणत्या भागांत दिली जाणार नाहीं हें म्युनिसिपल कमिटी डेपुटि कमिशनरच्या परवानगीनें वेळो वेळीं ठरवील.

(ब) म्युनिसिपल कमिटी, सार्वजनिक विहीरी संबधानें हा डेपुटी कमिशनरच्या मंजुरातीनें याच प्रकारें ठरवील.

२. कोणी इसमानें या सार्वजनिक पाणी भरण्याच्या जागांतून अगर त्यांच्या आजूबाजूस कोणते ही प्रकारची घाण करूं नये.

३. या सार्वजनिक पाणी भरण्याच्या जागा कान्सरव्हनसी सुपरिंटेंडेंन्ट यांच्या व्यवस्थे खालीं व देखरेखी खालीं राहतील व त्यांचें मुख्य काम, या जागा स्वच्छ व नीट नेटक्या ठेवणें व वरील नियम नीट रीतीनें पाळले जातात किंवा नाहीं हें पहाणें हें राहील.

४. जो कोणी इसम हे नियम मोडील व तसे केल्या बद्दल म्याजिस्ट्रेटा पुढें शाबिती होईल तो ५० रुपये पावेतो दंडास पात्र होईल.

☞ हें पत्र अकोलें येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराची किंमत
वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हांशील ०।१२
सहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।८
किरकोळ अंकास ........................ ०।४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।१।६
दुसरे खेपेस ........०।१

Rs.
annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................1as

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 9 MAY 1892 NO 18
वर्ष २६ सोमवार तारीख ९ माहे मे सन १८९२ इ० अंक १८

श्री गोमाता प्रसन्न

रा. रा. वऱ्हाडसमाचार पत्रकर्ते आकोलें यांस.

आकोलें येथील गोरक्षणी सभेचे सेक्रेटरी यांज कडून. विंनती पूर्वक कळविण्यांत येतें कीं ता. १६–४–९२ इसवी रोजीं गोरक्षणची सभा होऊन सदरील सभेंत असें ठरलें आहे कीं गोरक्षणावर व्याख्यान व उपदेश देण्या करितां एक मनुष्य नेमावा. सदरील जागेवर ज्यांची नोकरी करण्याची ईच्छा असेल त्यानीं गोरक्षणी सभेचे सेक्रेटरी आकोलें याज कडेस अर्ज द्यावा आणि व्याख्यान देण्या करिता एक दिवस नेमिला जाईल त्या दिवशीं लायब्ररींत अगोदर व्याख्यान द्यावें. ज्याचें व्याख्यान लोकांनुमतें पसंत ठरेल त्यास जागा दिली जाईल. विशेष माहिती गोरक्षणीचे चिटणीस यांचे आफिसांत मिळेल. सदरहू जागा १५ पंधरा पासू २० वीस रुपया पर्यंत ठराविली आहे. कळावें तारीख २८।४।९२ इ०

व्यंकटेस अंबादास

---

नोटीस

ति० रा० रा० तुरेराव शामरावजी देशमुख रहाणार जामठा बुजरुख ता० मुर्तिजापूर जि० उमरावती यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मी अज्ञान होतो ह्मणून ज्या सालीं रजिष्टरांत तुमचें नांव पाळन करण्यासाठीं लागलें होतें. त्या साळापासून ते सन १८८० इ० मे पर्यंत दरसाल रुसमाचा पैसा रुपये ४३१।०२ आणे प्रमाणेंचा हिशेब येणें राहिला आहे. आपणास हिशेबाबद्दल पुष्कळ वेळा येऊन ह्मटले असतां आपण आपलें कर्जाची सबब सांगित होते कीं मी तुझ्याबद्दल कर्जदार झालो आहे. हें खरें किंवा खोटें हिशेबानेंच समजूंन येते परंतु हिशेब आज तारखे पावेतो दिला नाहीं. मी सज्ञान होईस तो पर्यंत दरसालचें उत्पन्न शिवाय शेतांचे उत्पन्न दरसाल रुपये ७५ प्रमाणें नफ्या बद्दल मिळत होते असे एकून दरसालचें उत्पन्न पांचशे सहा रुपये ५०६।०२ दोन आणे तुह्मी घेतलें होते. तों पर्यंत तुह्मी माझें सर्व वतनाची वहिवाट करीं काय केली. हें मला गांवीं गेल्यावर समजलें कीं, तुह्मी माझे वतनाची कांहींच सुधारणा केली नाहीं व माझें लग्न ही केलें नाहीं या शिवाय लहानपणीं माझे अंगावरील आईचे हातचे दागिनें एक साळाचे रुपयाचे होते तेही तुह्मी मोडून खालेंत. सबब या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं वरील उत्पन्नाचा हिशेब द्यावा. व आपण माझें खावटी बद्दल ह्मणाल तर माझे दरसालाचे उत्पन्नाचे व्याजांत मुजरा आले. पुढें सज्ञान झाल्यावर सन१८८७ सालीं तुमचें गांवीं तीन वर्षें रहावयास आलो होतो त्या वेळेंस घरास रुपये ३९ लाविले व ९१ सालीं मी आपले गांवीं गेलों तेव्हां घराचे आंतील सामान अनमास किंमत रुपये २२५ सव्वा दोनश्याचें हिसकावून घेतले ते येणें प्रमाणें:-मोठ्या संदुकांत कपडे व च० पु० किं० रु० ३५, दोन लहान पेट्या एकींत पितळेची लहान भांडीं कींमत रुपये २५ व दुसरींत पितळेची नकशीदार लहान भांडीं व किराणा सामान किं० रु० १६ व पोतभर तांबेपितळेचीं मोठीं भांडी किं० रुपये ३५ व बंदुक बांधलेली किं० रु० २५ व लोखंडी सांग किं० रु० ९ व बंदुकीचो नळी किं० रु० १५ आणि बिछानें दोन नवा व जुना किं० रु० २५ व येण्याजाण्याबद्दल रेल्वेचें भाडे रुपये ५२ एकूण दोनशें शाहांशी २८६ रुपये व वरील सामान व डागिनेही नोटीस पावल्या तारखेपासून तीन दिवसांचे आंत रहातें गांवीं पाटील पांडे यांचे समक्ष आणून द्यावें व हिशेबही समजाऊन द्यावा व नोटिशीतील मुदती प्रमाणें आपले कडून अंमलावरी न झाल्यास अगर सामान चोरीस गेल्यास कोणती ही सबब ऐकिली जाणार नाहीं आणि या नोटिशीचा खर्च व दाव्याचा अव्वल पासून तों अखेर निकाल होईस तों पर्यंतचा खर्च तुमचे जवळून कोर्टमार्फत भरून घेतला जाईल. या शिवाय माझे विरुद्ध माझे साळे झोडेगकर व भाऊ बंद लोकांशी व सावकार लोकांशीं माझें नुकसानीचें इराद्यानें बनावटी लेख रसिदा व सल्लामसलतीचा पत्रव्यवहार करूं नये. नोटिशी प्रमाणें न वर्तल्यास कोर्ट मार्फत निराळी तजवीज केली जाईल कळावे हि नोटिस दिली सही तारीख १ मे सन १८९२ इसवी.

(सही) चद्रंभान सूर्यभानजी देशमुख रा० मा० त० म्हैसपूर दस्तुर खुद्द.

---

## पत्रव्यवहार

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

मुक्काम वाशीम ता. २६।४।९२.

कृतानेक सा० न० वि० वि० गेल्या आठवड्यांत आकाश ढगांनीं व्याप्त होतें. तापाचा फैलाव बराच झाला होता, परंतु पांच सहा दिवसां पासून ढग उडून गेले. वारा सोसाट्याचा वाहतो. उन्ह चढत्या कळेवर आहे. रानामध्यें गुरांना पाणी व चारा मिळत नाहीं. धारण महाग झाली व आणखी होत आहे. साल मजकुरी आंबे फार असून उष्णता कडक आहे. तापाचें ठाणें पुष्कळ दिवसां पासून पडलें आहे. तेव्हां एकंदरीनें जनारोग्य बरें दिसत नाहीं.

रेल्वे पासून हा जिल्हा अगदीं एका बाजूस असल्यामुळें रेल्वे पासून होणारें सुख व सुधारणा यांस आह्मी खरोखर मुकलों आहोंत. आमच्यांत उद्योगीपणा नाहींसा झाला आहे. आह्मास वळण दाखविण्यास विद्वान् नितीमान् परोपकारी असे लोक फारसे दिसत नाहींत. अलीकडील पिढी संगीत नाट्यकलेंत गढून जाऊं पहात आहे. नाट्य कला चांगली आहे. परंतु अज्ञान अशिक्षित मुलें त्यांत पडलीं कीं मग काय विचारता! फायदा एका बाजूस राहून त्या पासून भयंकर परिणाम व्हावयाचेच. येथें असा प्रकार झाल्याचें दिसत आहे कीं, लहान असो, मोठा असो या नाटकाच्या नादीं लागून त्याच्या अगदीं जाळ्यांत पडून जाऊन त्याला कांहीं सूचत नाहीं असें झालें आहे, नाटकी मंडळ्या बाहेरून येथें येऊ लागल्या पासून अनीतीचें बीज मुलामध्यें तर काय परंतु प्रौढ दशेंतील मनुष्यांमध्यें पक्कें पणें पेरलें गेलें आहे. अलीकडे लहान लहान मुलांमध्यें विड्या ओढण्याचें व्यसन इतकें वाढलें आहे कीं त्याना विडी ओढल्या वांचून क्षणभरही चैन पडत नाहीं. आईबापांच्या कह्यांत मुलें नाहींत असा सर्व गांवभर पुकारा आहे. मोठ्या लोकांचें अनुकरण मुलें करितात. मोठ्याचीच नीती जर बिघडली तर त्यांनीं अनुकरण कोणाचें करावें बरें? मोठें शहाणे असत त असा मुलांचा स्वाभाविक रित्या समज असतो. मोठ्यांनीं कुनीती केली तरी ती मुलांना कुनीती वाटत नाहीं. त्यांना ती सुनीतीच वाटून तिचें तीं अवलंबन करितात. कुनीतीपथावलंबन करून पादरक्षांनीं ताडण पावलेली वडी मंडळी जर कदाचित् असली तर पादरक्षांनीं ताडण पावणें ही पुजाच आहे असें मुलांना वाटतें. कारण मोठ्यांचा सत्कार जर असा झाला तर मुलांनीं ती योग्य पुजाच आहे असें न समजावें तर काय करावें? तर शहाण्यांनीं मुलांवर कडक नजर ठेऊन त्यांना सुनीतिपथ दाखवावा हें बरें.

मि० सायंना यांची बदली बुलडाणें जिल्ह्यांत झाली त्या प्रमाणें ते येथील आपल्या कामाचा च्यार्ज मि० स्टेसी ह्मणून यवतमाळाकडून कोणी गृहस्थ आले त्यांस देऊन ते तिकडे गेले. ज्या वेळीं ह्यांना कमीट केलें त्यावेळीं लोकांना हे सुटतील कीं नाहींत अशी शंका वाटून त्यांच्या बद्दल लोक फार हळहळले. कारण ईश्वरी प्राण्यावर असें संकट येणें या बद्दल वाईट वाटणें हें मानवी धर्माला अनुसरूनच आहे. पुढें सेशन कोर्टच्या न्यायांत ते सुटले या बद्दल ही लोकांना वाईट वाटण्याचेंच कारण नाहीं. सर्व नीट गोष्टी झाल्या. परंतु तो बिचारा कुंभार मेला तो कोणत्या कारणानें मेला याचा निकाल काय झाला हें जाणण्याची लोकांना इच्छा आहे. करितां वऱ्हाड हायकोर्टानें अगर लोकल गव्हर्मेंटनें या मुकद्दम्याचे मुळापासून झालेला तपास व कागद पाहून लोकांचें समाधान करावें हें बरें! हायकोर्ट जडज्य आतां नवीन आलेले आहेत. तसेंच मिस्तर ड्राऊडन साहेब हे वऱ्हाडचे माहितगार आहेत. यांनीं हें कागद पहावे अशी लोक इच्छा आहे. मि० सोमण येथील हेड क्लार्क पोलीस खातें यांची बदली बुलडाण्यास झाली. व तेथील मिस्तर बीनास हे येथें येणार असें ह्मणतात.

न्यायाधिशाचें काम मोठें कठीण आहे. दोन्ही पक्षांचें मंडण करण्यास वकील असतात. दोहो बाजूंनीं कायद्याचे आधार दाखविले जातात. या सर्वांचा विचार करून त्यांतून शांतपणें आपल्या बुद्धि कौशल्यानें तत्व निवडून काढून खरा न्याय करणें हें सोपें काम नव्हे. न्यायाधिश निःपक्षपाती निर्भीड, निर्लोभी, असा असला तर रयतेला आवडतो इतकेंच नाहीं तर तो ईश्वराला प्रिय होतो. त्याला जगांतील सर्व सुख मिळून त्याची किर्ती होते. शिवाय न्यायाधिशामध्यें गालीप्रदान देण्याची चाल नसावी. आपणाला कोणी उणें बोललें असतां जसें वाईट वाटेल त्याच प्रमाणें आपण न्यायाच्या व अधिकाराच्या जोरावर दुसऱ्यांस अपशब्दांचा भडिमार केला असतो त्यांस वाईट वाटतें नसेल काय असा विचार प्रत्येकानें केला पाहिजे. दोन दिवसांचा अधिकार शिव्या देऊन गाजवून घेणें अगदीं वाजवी नाहीं. " देह त्यागिता किर्ती मागें उरावी मना सज्जना ऐशी क्रिया धरावी " हें तर असूं द्या. एखादे वेळीं असाही प्रकार घडून येण्याचा संभव कीं कोठें कोठें शिव्या पासून भयंकर परिणाम घडून येतात. तेव्हां न्यायाधिशाची स्थिती मोठी कठीण असते. सरकारानें दयाळू होऊन जे कायदे केले आहेत? ते किती चांगले आहेत त्यांची अंमलबारी करणें हें न्यायाधिशाचें काम काम आहे. पदरचा कायदा करणें अगर कायदे एका बाजूस ठेऊन आपले स्वेच्छाचारी घोडें पुढें ढकलण्याचें काम न्यायाधिशाचें नव्हे. न्यायाधीश ह्मणजे खरें खोटें निवडून काढणारा. सर्व जगामध्यें कामगार असतात त्या सर्वांमध्यें न्यायाधिशाचा अधिकार मोठा समजला पाहिजे. न्यायाधीश आपमतलबी नसावा त्याच्या अंतःकरणांत नेहमीं दया असली पाहिजे. असो यावरून न्यायाधीश कसा असावा हें सहज कळून येईल.

येथें एक घोड्याचें " सरकस " मि० काशीनाथ विनायक छत्रे मि० विष्णुपंत छत्रे प्रोफेसर यांचे पुतणे यांनीं आणिलें आहे. मंडळी बरीच असावी असा अदमास आहे. कांहीं ब्राह्मण आहेत व बाकी निरनिराळ्या जातींचे लोक आहेत. यांचे बरोबर घोडे, मांकडें, कुत्रीं हीं जनावरें आहेत. हीं इतकीं आज्ञाधारक करून ठेविलीं आहेत कीं तीं पाहून मनुष्य अगदीं थक्क होऊन जातो. त्यांनीं परवां व काल असे दोन खेळ केले. ते दोन्हीही खेळ प्रेक्षणीय होऊन लोकांनीं त्यांची तारीफ केली. दोन्हीही दिवशीं मंडळी बरीच होती व मि. छत्रे यांना उत्पन्न ह्या गांवांत

बरेंच झालें. घोड्यांनीं जी कसरत केली त्यांतुन कांहीं येथें सांगण्या सारखी आहे. एक वीत लांब एक वीत रुंद अशा एका शिळेवर चार पाय एकत्र करून उभे राहणें, जमिनीवर पड झटल्याबरोबर पडणें, मरण्याचें सोंग हुबेहुब आणणें, वरून चाबूक मारला अगर फटाक्यांच्या पेट्या उडविल्या तरी न हालणें, भरधांव घोडा मंडळाकृती चालला असतां वर उडून बसणें, वरच्या वर उड्या मारणें, कांहीं न धरतां उभे राहणें, पांच इसम एकाच घोड्यावर बसून घोडा भरधांव चालणें, गिऱ्हाइकास घोडा विकला असतां त्याजबरोबर न जातां त्याजवर दुगाण्या झाडणें व आपल्या मालकापाशीं येऊन उभे राहणें, रबरी चेंडूवरून दहा वर्षांची मुलगी चालणें, तराजूनें घोडे तोलून घेणें, ग्लास पाण्यानें भरलेले डोकीवर घेऊन खालीं निजणें, वर उठणें व निजून पायांतून लांकडी कडी अंगांतू काढून टाकणें, कुत्र्यांस उभे रहा झटल्याबरोबर उभे राहणें, माकडें घोड्यांच्या पाठीवर बसलेलीं असे दोन घोडे मंडळावर एकाच काळीं एकाच दिशेनें जवळ जवळ भरधांव पळणें. वगैरे प्रकार फार चांगले झाले व ही मंडळी फार गुणी दिसते व यांच्या मध्यें गुण चांगले असून ही लोकाश्रयास पात्र. आहे. कळावे ही विनंती.

"क्ष"

---

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध १३ शके १८१४

सहा वर्षांपूर्वीं पब्लिक सर्व्हिस कमिशन बसलें होतें त्या कमिशननें हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतील उंच उंच दर्जाच्या आणि मोठ्या मोठ्या पगाराच्या जागा एतद्देशीय लोकांस देण्या संबंधानें अनेक सूचना केल्या होत्या. त्या कमिशनच्या रिपोर्टावर सन १८८९ च्या सप्टेंबरच्या १२ वे तारखेस स्टेटसेक्रेटरीनीं आपला अभिप्राय नमूद करून तो हिंदुस्थान सरकारकडे अंमलबारीसाठीं रवाना केला. गेल्या २१ वे तारखेस त्या अभिप्रायाला अनुसरून हिंदुस्थान सरकारनें अखेरचा हुकूम काढला आहे. त्या अन्वयें मद्रास, मुंबई, बंगाल, वायव्यप्रांत, आणि पंजाब मिळून ८६ जागा नेटिवासाठीं काढल्या आहेत. १६०० रुपये पगारा पासून ३०० रुपये पगारा पर्यंतच्या मुलकी आणि दिवाणी व फौजदारीकडील जाग्यांचा यांत समावेश होतो. वरील हुकुमाप्रमाणें मिळालेल्या सवलतीशी सांप्रतच्या नेटिवांच्या जाग्यांचा ताळा बसवितां हिंदुस्थान सरकारनें एवढें अवडम्बर मानवून नेटिवांस पूर्वींपेक्षां फार सवडी व अधिकार दिले आहेत असें नाहीं.

मध्यप्रांतामध्यें नेटिवांस मोठमोठ्या हुद्यांच्या जागा देण्या विषयीं हुकूम सोडण्याचें काम चिफ कमिशनरच्या अभिप्रायावर सोंपविलें आहे. ब्रह्मदेशांतील लोकांस शिक्षण नाहीं व राज्य कारभारांतली माहिती नाहीं तेव्हां ते लोक नालायक आहेत असें ठरविलें आहे. आसाम प्रांताची विल्हेवाट ब्रह्मदेशाप्रमाणेंच लाविली आहे. वऱ्हाडप्रांत अमानी मुलुख आहे ह्मणून त्या संबंधानें हिंदुस्थान सरकारनें तिळप्राय विचारही केला नाहीं. खरो खर पाहिलें असतां वऱ्हाडप्रांत निजाम सरकारास परत देणें इंग्रज सरकारास उचित आहे परंतु हा सत्यवचनाचा व न्यायाचा धडा बक्रवृत्ती सरकारास कोणी शिकवावा हें आह्मांस समजत नाहीं. वऱ्हाड प्रांत परत द्यावयाचा नाहीं तो नाहींच आणि त्याखेरीज त्या प्रांतांतील लोकांस इतर प्रांताच्या लोकाप्रमाणें राज्यांतील हक्क व अधिकार द्यावयाचे नाहींत असा संकल्प आहे कीं काय न कळे!

---

सन १८९३ च्या सप्टेंबर महिन्यांत अमेरिका खंडांत चिकागो शहरीं जगामध्यें अद्भुत व अदृष्टपूर्व प्रदर्शन होणार आहे त्या समयीं सर्व धर्मांचें सारतत्व शोधून काढण्यासाठीं सर्व राष्ट्रांतील लोकांचें पार्लमेंट बसणार आहे. या धर्मसभेचे हेतु, तिनें योजलेलें महत्कार्य व तिच्या उपयुक्तते विषयीं थोर थोर विद्वानांचे विचार कळून घेण्या पासून ही मनाला एके प्रकारें आल्हाद वाटतो. या धर्मपरिषदेची स्थापना सर्वमान्य तत्वावर आहे ह्मणजे त्या संस्थेकडून विशिष्ट एका जातीला, राष्ट्राला अगर देशाला कांहींच महत्व मिळणार नाहीं. निरनिराळ्या लोकांचा भिन्नपणा किंवा भूगोलदृष्ट्या दिसणारा परकीयपणा हा बिलकूल विचारांत घेतला जाणार नाहीं. अमेरिकन लोकांच्या मनावर संस्कार घडतात ते उदार प्रवृत्तीचे फार असतात आणि तशांत लोकसत्तात्मक संस्थांचें वळण त्यांस असल्यामुळें इतर राष्ट्रा पेक्षां त्यांच्या अंगीं एकलकोंडेपणा व बढाईचा व्यर्थ दुरभिमान हे बहुतकरून फार कमी आढळतात. अमेरिकन समजतात कीं सर्व राष्ट्रा मध्यें एक बंधुत्वाचें नातें फार दृढ व बळकट आहे आणि त्या नात्याच्या योगानें च परिणामीं सर्व लोक एकवटण्याचा संभव आहे. या बंधुत्वाच्या मनोवृत्तीला सध्यां देखील अंकूर फुटला आहे आणि त्याचें मुख्य दर्शक वरील धर्मपरिषद् असून त्या पासून पृथ्वींतील मुख्य मुख्य राष्ट्रांच्या परस्पर स्नेहसंबंधाला एकीकरण व दृढीकरण होणार आहे. सन १८९३ च्या परिषदेस केवळ ख्रिश्चियन लोकांपैकीं नानाविध धर्मपंथानुयायी जमणार आहेत असें नसून क्याथोलिक, प्रोटेस्टंट, यहुदी, ग्रीक चर्चवाले इत्यादि धर्मांचे अग्रगणी लोक असून ही बौद्ध, पार्शी, ब्राह्मणी, महमदी, इत्यादि धर्मांपैकीं श्रेष्ठ व बहुश्रुत लोक त्या स्थळीं गोळा होणार आहेत. त्या स्थळीं जमल्या नंतर सर्वजण मोकळ्या मनानें व प्रेमबुद्धीनें मनुष्याच्या नैतिक व धार्मिक प्रवृत्ती संबंधानें संभाषणें करून मोठमोठ्या गूढ प्रश्नांचा निकाल करितील. भूगोला वरील बहुविध, जुनाट, विविध शास्त्रांच्या धर्मांच्या अभिमानी व विचारशील गृहस्थांच्या अशा सभेकडून काय फायदा होणार असावा असा सकृद् दर्शनीं प्रश्न निघतो. नैतिकदृष्टीनें सदर्हू प्रकारच्या धर्मसभेपासून पुष्कळ फायदे दिसून येतात. हा धर्मसभेचा बेत सिद्धीस गेला व मुरूपर्वेकरून ख्रिश्चियन धर्म खेरिज करून इतर धर्मांचे लोक या सभेला येतील तर या धर्मसभेच्या इतिहासावरून सर्व जगाला कळून येईल कीं या इतर धर्मांमधूनही आध्यात्मिक व नैतिक महातत्वांचा बोध केला आहे. या धर्मांचें परिशीलन करून बहुवेत्ते बनलेल्या विद्वांना करवी ओतप्रोत, निश्चयात्मक, व खात्रीची माहिती मिळवून त्यापासून अध्यात्मज्ञानाचा प्रसार कसकसा होत गेला व धर्मप्रसारानें ग्रंथलेखन, शास्त्रकला, व्यापारवृद्धि, राज्यकर्तृत्व, समाजोन्नति व प्रापंचिकसुखें यावर भिन्न भिन्न दिशांनीं कसकसें बरें वाईट न कळत परिणाम घडत गेले इत्यादि गोष्टींची अटकळ सर्व जगास करून देण्याचा मूळ उद्देश आहे. धर्मसभेमध्यें होणाऱ्या वादविवादा पासून या गोष्टी कळून येतील कीं कोणत्या विशिष्ट धर्माचा दुसऱ्या धर्मावर सुसंस्कार घडला व घडत आहे आणि सांप्रत जगासमोर जे गूढ प्रश्न सर्व लोका संबंधानें उभे आहेत त्यांचा उलगडा कोणकोणत्या धर्माच्या तत्वप्रसृतीनें सुलभ व सुगम करितां येईल. पानभोजनादि व्यवहारांत परिमितता, अर्थशास्त्रांतील श्रम विवेचन, विद्यापान, साम्पत्तिक समाजरचना, भिन्न भिन्न धर्मांची एकवाक्यता इत्यादि सर्वव्यापि खोल प्रश्न संबंधानें या धर्मसभेंत मतांतरें न मवति होऊन अनेक सिद्धांत व अनेक कोटिक्रम सर्व लोकांस सुगमपणें उपलब्ध होतील. आस्तिक्य वादाचा गहन सिद्धान्त किती भक्कम पायावर रचला आहे, आत्म्याचें अनाशित्व मानण्यास मनुष्याजवळ काय काय समर्थक साधनें आहेत, आणि चार्वाकमतासारख्या अनात्म वादाला प्रतिध्वंसक शास्त्रवाद कसे संग्राहित करावे या गोष्टी या धर्म सभे पासून स्पष्टपणें कळून येतील. परस्पर राष्ट्रांमधील भेदाभेदाचा विचार अगदीं काढून टाकला असून या धर्मसभेचा उद्देश निरनिराळ्या धर्मावर खंडनात्मक किंवा मंडनात्मक वाद करण्याचा नाहीं. सर्व राष्ट्रें एकत्र व्हावीं, त्यांच्या धर्मवादा पासून बंधुत्व वाढावें, आणि सर्वांस ज्ञानप्राप्ति होऊन सुविचाराची दिशा लागावी एतदर्थ या धर्मसभेचा असा सर्वमान्य व सर्वोत्कृष्ट उद्योग चालला आहे. पृथ्वीवरील कीर्तिवान, चतुर, व विद्वान अशा थोर पुरुषांनीं व स्त्रियांनीं सदर्हु सभेच्या पाचारणास अनुमोदन दिलें आहे.

अशा प्रचंड धर्मपरिषदाला हिंदुधर्मवेत्ते पंडित गेले नाहींत तर ती गोष्ट आपल्या देशाला कमीपणाची असून हिंदुधर्मा सारख्या अति जुनाट व बहुसंख्याक लोकांच्या पूज्य धर्माची मातबरी सर्व जगासमोर न येतां उलटें त्याच्या ऱ्हासाला निराळें कारण होईल. आह्मी मनापासून इच्छितों कीं हिंदुस्थानांतील कांहीं वादकुशल, धर्मनिपुण व बहुश्रुत गृहस्थ चिकागो शहरीं या परिषदास जाण्याची तयारी एव्हांपासून चालू ठेवतील. धनबल आणि विद्याबल या दोहोंचा जेथें संगम असेल अशा धनिक व विद्वान गृहस्थाचें हें काम आहे तरी श्री आणि विद्या या एकत्र नसतात तेव्हां तो संगम घडविण्याचा योग कोणी आणावा हा मोठा प्रश्न आहे. आह्मांस तर वाटतें कीं ज्या इंग्रज सरकारनें हिंदुधर्माखालील प्रचंड व बलाढ्य राष्ट्रावर आपलें राज्य स्थापिलें त्याच सरकारनें आपल्या प्रजाजनांची नैतिक व आध्यात्मिक उन्नति, अचाट बुद्धिवैभव, व प्राचीन सर्वकलाभिज्ञता हीं जगास आपल्या द्रव्यसाधनानें दाखवावीं आणि तेणेंकरून आपल्या अतुल पराक्रमाची व दिगंत कीर्तीची व सार्वभौमपणाची थोरवी अजरामर करून सोडावी.

---

वऱ्हाड प्रांतास रयतवारी लागूं आहे तरी जमेदारी आणि खेडेवारी या दोन्ही पद्धतींचा अंशरूपानें थोडा भाग शिल्लक आहे आणि तो भाग इतिहासदृष्ट्या जुना आहे तरी त्याचें स्वरूप नव्या रयतवारीच्या पद्धतीस जुळवून घेतलें आहे ह्मणून आतां त्यांत कांहीं विशेष फरक होण्याचा संभव नाहीं. वऱ्हाडांतील जमेदार लोकांचा रुस्सूम वंशपरंपरेच्या वतना प्रमाणें तोडून दिला आहे आणि त्यांच्या ताब्यांतील परगण्यांचे मामले काढून घेऊन त्यांस पिढीजादि पेन्शनदार करून टाकलें आहे. सांप्रत जमेदार लोकांस सालिना रुस्सूम मिळत असतो तो एके प्रकारें त्यांच्या पूर्वजांनीं निजाम सरकारच्या पदरीं उत्तम चाकरी बजावली तिचें चिरस्थाई फळ होय. इंग्रजी पद्धतीस पूर्वींची पद्धत आड येत असे ह्मणून सरकारनें जमेदारांस जमाबंदीच्या उत्पन्ना पैकी कांहीं ठोक पैसा द्यावयाचें ठरवून त्यांस बेरोजगारी केलें आहे. खेडेवारीचा मासला अद्याप अस्तित्वांत आहे. पाटील पटवाऱ्यांची संस्था अद्यापि कायम आहे आणि त्या लोकांकडून आज पावेतों सरकार जमाबंदीचें काम करून घेत आहे. या कामगिरी बद्दल सालवाद त्यांस ऐन उत्पन्नांतून कांहीं रोजमुरा मिळत असतो. वऱ्हाडांतील जमेदार ह्मणजे सुखवस्तु गर्भश्रीमान लोक आहेत व त्यांचा प्रांताच्या राज्यकारभाराशीं किंवा प्रत्यक्ष रयतेशीं संबंध सरकाररित्या कांहीं नाहीं अगर असल्यास तो अगदीं सूक्ष्म असून लक्षांत न घेण्या सारखा आहे. तेव्हां त्यांच्या संबंधानें विशेष माहिती न देतां आह्मी खेडेवारीच्या पद्धतींतील पाटील पटवारी लोकां विषयीं थोडी हकीकत या अंकीं दाखल करित आहों.

पाटील पटवाऱ्यांकडे जमाबंदीच्या वसुला पैकी तीन शाखा आहेत. ऐन काळीचा वसूल, टाऊनफंड आणि फारेस्ट कडील वसूल अशा तीन बाबींच्या उत्पन्नाचा भरणा सरकारांत करून त्याचा हिशेब त्यांस ठेवावा लागतो आणि सरकारच्या या चाकरी बद्दल त्या लोकां प्रीत्यर्थ गेल्या १८९०-९१ साली रु. ७,०८,४४५ २ आणे ७ पै खर्च पडला आहे. या नक्की आंकड्या वरून सालिना खर्चाची अटकळ करितां येईल. जमिनीच्या साऱ्याचें उत्पन्न त्या वर्षीं रुपये ६४,४१ १५०-१० आणे – ४ पै आहे आणि या रकमे वरच पाटील पटवारी लोकांचा खर्च आकारला तर शंभर रुपये उत्पन्ना मागें साडेदहा रुपये खर्च असें प्रमाण पडतें.

वऱ्हाड प्रांतांतील ६२६२ खेडीं मिळून ७७३८ पाटील आणि ६९१८ पटवारी आहेत. हे पाटील व पटवारी ह्मणजे कारभार चालविणारे लोक होत. बाकी सर्व मुलुख पाटलांचा आहे परंतु एखादाही काडीची सत्ता नाहीं. वरील संख्ये पैकीं कांहींजण सतत काम पहाणारे आहेत. कांहीं पाटील व पटवारी आळीपाळीनें एकएकटे अगर दोघेचौघे मिळून काम पहातात आणि ही आळीपाळी अगर

एकत्रपणा एकाच घराण्यांतील हक्कदारांच्या मानानें जुळवून घेतला असतो.

पाटील पटवाऱ्यांच्या वतना संबंधानें सरकार फार दक्ष व कृपाळु आहे त्या प्रमाणें पाटील पटवाऱ्यांच्या संस्थेपासून सरकारचा हा मोठा फायदा आहे. स्वल्प खर्चांत सरकारचा मुलकी कारभार पुष्कळ चांगला होऊन जुन्या पद्धतीचा मान राखल्याचें सरकारास श्रेय मिळाल्यानें सरकारावर रयतेची निष्ठा चांगली व कायमची बसते. आळीपाळीनें पाटील पटवारीच्या वतनाचा उपभोग एका कुटुंबांतील किंवा वेगवेगळ्या कुटुंबांतील हक्कदारांस द्यावा अशा बदल सन १८८४ साली पुष्कळ वाटाघाट होऊन १८८५ चा पाटील आणि पटवारी कायदा तयार झाला त्यांतील ७ वे कलमांत आळीपाळीच्या आवृत्ती संबंधानें उल्लेख आहे. या सातव्या कलमाची परिस्फूटता गेल्या रेव्हिन्यु रिपोर्टांत केली आहे ती नमूद करून हा लेख आह्मी पुरा करितों. पुढील एखादे वेळीं पाटील आणि पटवारी या लोकांस आवश्यक गोष्टी विषयीं माहिती देतां यावी ह्मणून आह्मी त्या संबंधानें सध्यां ठिकठिकाणची माहिती संग्रहीत करित आहों.

आळीपाळीची मुदत, पांच वर्षांहून कमी नसावी किंवा दहा वर्षांहून अधीक असू नये. हा आळीपाळीचा नियम लागूं करिते वेळीं कमिशनर साहेबांची मंजुरात पाहिजे आणि ती मंजुरात देते वेळीं खालील दोन गोष्टी लक्ष्यांत घेतल्या जातील.

( अ) मुलूख अमानी हैदराबाद येथें इंग्रजी सुरूं झाली तेव्हां पासून दोन अगर अधिक घराण्यांची अथवा एका घराण्यांतील दोन अगर अधीक पोट–कुटुंबाची चाल वर्षानुवर्षें वतनाचा कारभार आळीपाळीनें चालविण्याची होती; किंवा

( ब ) दोन अगर अधीक घराण्यांचे अथवा एका घराण्यांतील दोन अगर अधीक पोट कुटुंबांचे हक्क इतके सारखे समतोलपणें वतनाला पोंचतील कीं त्यामुळें एकाच घराण्याला अथवा पोट–कुटुंबाला स्वतंत्र कारभार देतां येत नाहीं.

वरील दोन्ही मुद्यांवर अनेक खटल्याचा निकाल होऊन त्यांच्या अर्थांची फोड व जुळणी होत होत त्या पासून निराळे चार नियम सध्यां लागूं करण्या सारखे निघाले आहेत ते येणें प्रमाणें:–

( १ ) जो कोणी वतनाला हक्क सांगत असेल त्यानें अगर त्याच्या पूर्वींच्या वतनदारानें इंग्रजी अंमल झाल्या पासून अगर इंग्रजी दप्तर चालूं झाल्या पासून आळीपाळीनें किंवा एकत्रपणानें वतनाचा उपभोग घेतला असेल आणि तो उपभोग सन १८७६ च्या ठरावा बरहुकूम रद्द केला गेला असेल तर त्या हक्कदाराला आळीपाळीनें वतनाचा उपभोग दिला जावा.

( २ ) जर एका घराण्यांतील वतनाचे विभाग लहान मोठे होत असतील तर त्या लहान विभागांचे अधिकारी एकत्र होऊन एक समायिक प्रतिनिधी पांच वर्षें मुदतीचा नेमतील परंतु त्या प्रतिनिधी विषयीं त्यांची तक्रार नसावी.

( ३ ) आळी पाळीनें वतनाचा उपभोग करूं देण्याचा नियम अमलांत नसतांना जो कोणी वतनाला अधिकारी निवडला गेला असेल त्याची जागा रिकामी होई पर्यंत आळीपाळीचा नियम लागूं होणार नाहीं.

( ४ ) वतनाला अधिकारी फार वाढले ह्मणून १८७६ च्या नियमा अन्वयें सर्वांचे हक्क बाजूस ठेऊन सरकारांतून त्यांच्या पैकीं एकजण मुकर झाला असेल त्या त्या प्रकरणांत वतन रिकामें झाल्यावर मागील हक्कदारांच्या हक्काच्या प्रश्नांचा विचार केला जाईल.

वरील नियम आज दाखल करण्याचा इरादा असा कीं सन १८७६ च्या सरक्युलराअन्वयें नऊ वर्षें पर्यंत पाटील आणि पटवारी यांच्या वतना संबंधानें जे निकाल झाले आणि ज्यांत पाटील पटवारींचे वडिलोपार्जित हक्क मारले गेले त्या निकालावर या नियमा बरहुकूम अपील करून आपापल्या हक्कांची शाबिती पाटील व पटवारी लोकांना यथाशक्ति करण्यास हें उपयुक्त साधन आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY, MAY 9, 1892

The well-known circular of 16th February issued by Mr. A. O. Hume has done immense service to India. It has opened the eyes of the English nation to the dangerous situation into which India is gradually drifting provided no prompt and ready measures are adopted to avert the trying crisis. We are aware that Mr. Hume is proclaimed a traitor and Mr. Macleam asked the people to shot him through. Reason and principle retire from discussion when abuse is the only argument. Mr. Hume has no doubt taken his people behind the curtain to behold the poverty, degradation and starvation with which the Indian people are trodden to the utmost depths of ruin and revolution. Mr. Hume's is simply a forecast, and the English nation has to decide what truths lurk there in. If his advice holds water let the Anglo Indians be all eyes and ears to deal a deadly blow to their selfishness and narrow principles of humanity and justice. The golden rule 'do unto others as you would they should unto you.' will at least suggest some rule of action if they digest their own histories to learn how the trammels of monarchic or oligarchic despotism led to the overthrow of their sovereigns and ministers and how the public weal and freedom grew into a real power The English Government is benign, just, and generous to India whenever their purse and person are not touched. It is selfish, unjust, and ungracious whenever their interests clash with those of the Natives. When there was war and discord amongst the people of India every thing afforded to the English as meddlers in native affairs an avenue to power, dignity, and riches and nothing was wanting to show them as just and benevolent. But the British rule has ere long mended these matters; and the time has come when men of divergent interests quarrel as natives and Anglo Indians. We don't expect Englishmen to show altruistic philanthropy to the subject races but they show themselves as worthy successors of their fore-fathers, who put down slavery as a stigma upon humanity. Is this not serfdom and utter degradation to which the Natives are reduced when they are disentitled to serve their rulers as high and responsible officers? The Congress is in short the voice of the nation and its proceedings are a lucid commentary upon the Anglo Indian bureaucracy. The dilatory, sluggish, and fidgetic manner in which the India Councils Bill and the new Provincial Service have recently been brought forth to the public gaze has illustrated the cruel kindness and ungenerous sympathy of the Anglo-Indians. Whether an individual endorses Mr. Hume's circular or not it is altogether a separate question. Mr. H. M. Hyndman an English gentleman of vast experience of Indian affairs has written a letter to the London Times in which he has pourtrayed a picture of Indian administration and has distinctly said the same thing as Mr. Hume. Towards the close of his letter he proceeds to remark as follows:—

"Let us suppose that we are dealing with any other country not directly under our rule and for whose well-being we are not responsible. Should we not recognize at once that a drain of £ 18000000 for state purposes above representing to India a drawing of many millions more— and a general disparity between imports and exports, properly calculated, of more than twice that of £ 18,000,000—Should we not recognize, I ask in the case of any other country, that a withdrawal of wealth on such a vast scale could not continue without 'bringing about the catastrophe which the late Sir James Caird saw looming ahead and Mr. A. O. Hume now declares, is close at hand?

Sir, these economic and commercial facts translated inta plain English mean ever increasing misery and starvation for tens of millions of people for whose welfare we Englishmen are responsible. I do hope that, even with a general election on prospect, this serious subject may be adequately considered and debated in the press as well as in Parliament. We have no right to turn our heads the other way and shirk the discussion of this matter. Since 1858 the mass of the English people have been directly responsible for the Government of India. Let us not any longer close our eyes that so poor a country cannot sustain such a terrible drain of wealth as we yearly make upon it for the benefit of Englishmen at home. Even from the most selfish point of view it is highly dangerous to drift into an economic catastrophe by refusing to admit economic truth."

---

## वऱ्हाड

हवामान–उष्णतेचें मान या आठवड्यांत कमी आहे. पारा १०७ अंशापर्यंत चढतो. वारा चांगला वाहत नसल्यामुळें उष्मा विशेष भासतो. जनावरांना उपद्रव तुरळक सुरूं झाल्या विषयीं ऐकूं येतें.

कुमार श्री हरबानजी असि० कमिशनर बुलढाणा यांस गेल्या पहिल्या तारखे पासून पंधरा दिवसांची हक्काची रजा मिळाली.

वऱ्हाड–हास्पिटल–असिस्टंट क्लास— हैदराबाद येथील खालील विद्यार्थ्यांचा शिक्षणक्रम पुरा होऊन ते अखेरच्या परीक्षेंत पसार झाले आहेत:—

महमद इस्मायलखान, शिवराम बाळकृष्ण, कत्स्या सुभिया, मीर अबदूल रहिमान व दोरास्वामी पिले.

रा० रा० देवराव जयकृष्ण एक्स्ट्रा असि० कमिशनर व स्मालकाज–जज्ज, तेल्हारा यांस चालूं महिन्यापासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली.

रा० रा० गोविंदराव यशवंत तहशीलदार वर्ग१ हे मार्च २९ वे तारखे पासून पेनशदार झाल्यामुळें त्यांच्या वर्गावर्गांत बढत्या झाल्या त्या येणें प्रमाणें:—

मेसर्स गिरराव रामचंद्र तहशीलदार वर्ग २, शापुरजी विरजी तहशीलदार वर्ग ३ व मीर अनवरअल्ली आफि० तहशीलदार वर्ग४ यांस अनुक्रमें वर्ग १, २, व. ४ चे तहशीलदार नेमलें.

मि० आर० ए० सिम्पसन असि० कमिशनर, उमरावती यांस गेल्या तारखेपासून वीस दिवसांची हक्काची रजा मिळाली.

अकोल्याच्या व्यापारी पेठेंत सऱ्यांच्या वडामोडी होतात त्या सऱ्यावर नवा कर गेल्या एप्रिलच्या पहिले तारखे पासून बारा वर्षें पर्यंत बसविण्याचा हुकूम अकोला मुनसिपाल कमिटीस मिळाला आणि त्या सऱ्याच्या करासंबंधानें नियम ही गेल्याच्या सोमवारच्या रेसिडेन्सी आरडरमध्यें प्रसिद्ध झाले आहेत. नळाचें पाणी शहरांत आणण्यास लागणारा खर्च भागविण्यासाठीं नवा कर बसविण्यांत आला.

प्रोफेसर काशिनाथ विनायक छत्रे यांचे सरकसचे खेळ या आठवड्यांत येथें होत असतात. प्रोफेसर विष्णुपंत छत्रे यांच्या सरकसाच्या मानानें हें सरकस छोटेखानी आहे तरी आपल्या कर्तबगारींत यांचें नैपुण्य व कौशल्य पाहून आह्मी त्यांची वाशिमकर "क्ष" च्या पत्रांत लिहिल्या प्रमाणें तारीफ करितों आणि आह्मास उमेद आहे कीं राजश्री काशिनाथपंत हे कांहीं कालाच्या परिश्रमानें व द्रव्यबळानें नामांकित सरकसवाले बनतील.

उमरावती बांकेवरील एका पोलिस कानस्टेबलानें पाहरा करीत असतांना आपल्या विश्वासांतील औरतेची अन्यासक्ति पाहून त्या त्वेषांत तिला गोळी घालून ठार मारलें. त्याजवर पुढें खटला चालेल.

कुमार श्री हरबानजी अव्वाची यांची बढती असिस्टंट कमिशनरचे वर्गांत झाल्या कारणानें रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ जोशी क्लार्क आफ कोर्ट कमिशनर-वऱ्हाड यांस रेसिडेंटाचे अव्वाची नेमल्या विषयीं गेल्या ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आणि त्या प्रमाणें ते आपल्या नव्या जागीं हैदराबादेस रुजूं ही झाले. कार्यदक्ष, चतुर व कसोटीस उतरलेल्या अंमलदाराचा झालेला योग्य बहुमान पाहून रेसिडेंट साहेबांच्या गुणग्राहकतेचे आह्मी अभिनंदन करितों.

कर्नल एच. डी. पी. रेनिक इंडियन स्टाफ कोर, डेपुटी कमिशनर वर्ग २ वऱ्हाड यांस दोन वर्षांची फर्लो रजा देण्यांत आली.

मि. जे. एम. वाचा असि० इंजिनिअर वर्ग२ यांस इंग्लडांत इंजिनिअरींगचा अभ्यास करण्यास जाण्या साठीं दोन वर्षांची रजा मिळाली.

रा. रा. भगवंतराव गोविंद हुंडीवाले खानगी कारकून अकोला यांस गेल्या गुरुवारीं देवज्वर झाला- कालऱ्यानें सहा तासांच्या अवकाशांत गृहस्थ अत्यावस्थ होऊन मरण पावला. त्याच्या आकस्मिक मरणानें त्यांच्या वृद्ध मातोश्री, बंधु व बायका मुलें यांचा संसार उघडा पडला आणि स्नेही मंडळीचा एक विश्वासू व प्रेमळ अंतःकरणाचा मित्र हरपला.

---

## वर्तमानसार

काठेवाडांत गव्हरनरांचे चोरीस गेलेले सर्व घोडे सांपडले पण चोर सापडले नाहींत चोरांनीं घोडे सोडून दिले होते.

लाहोर येथें येत्या पावसाळ्यांत कलाकौशल्याचें एक प्रदर्शन व सभा होणार आहे.

मद्रासेकडील रेव्हिन्यु सर्व्हेचे डे. सुपरिंटेंडेंट मि. बेबर आणि त्यांचे असिस्टंट सुर्यनारायणराव यांजवर कांहीं पैशाची अफरातफर केल्याचा आरोप आला होता. दोघांनीं ही अरोप कबूल केल्यावरून त्यांस अनुक्रमें तीन व दोन महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली.

आमो येथें सोन्याच्या व शिश्याच्या खाणी सांपडल्या आहेत.

उगांडा येथें प्राटेस्टंट व क्याथोलिक लोकांत दंगा झाला नाहीं अशी पार्लमेंटची बातमी आहे.

विलायतेस मजुर लोकांची एक बडी सभा होणार असून या सभेच्या बंदोबस्त ठेवण्यासाठीं राजधानींतील सर्व सैन्य सज्ज करून ठेवण्यांत येणार होतें.

हिंदुस्थानाकरतां लवकरच कर्ज काढण्यांत येणार आहे अशी गप्प उठल्या बरोबर विलायतचा रुप्याचा भाव उतरत होता तो कायम राहिला! गप्पेचा इतका परिणाम.

चालू राज्यपद्धत नापसंत करणारे १,३०० इसम फ्रांसांत पकडण्यांत आले आहेत.

सर्व ठिकाणीं रुप्याचे नाणे सुरू करावें अशा प्रश्नाचा विचार करण्यासाठीं बसलेल्या कमिटीच्या प्रेसिडेन्टचें मत आहे.

विलायतेस ७२॥ वर्षांच्या एका तरुणानें ७९ वर्षांच्या तारुण्यानें मुसमुसलेल्या एका बाईशीं नुकताच विवाह केला!

येत्या २४ व्या तारखेस सिमल्यास धूळभेटीचा समारंभ होणार आहे.

फिरोझपूर येथें अतिशय भयंकर पटकी उठली आहे. ठा. अ.

बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड हे आपल्या कुटुंबासह विलायतेस जाण्यासाठीं येत्या ७ व्या तारखेस निघण्याचें खास ठरलें. मुलें मात्र पावसाळा सुरू होईपर्यंत लोणावळ्यासच राहणार.

हरिद्वार येथें कालरा सुरू झाल्यामुळें सरकारनें यात्रा बंद केली. त्याजबद्दल तेथील धर्माधिकारी व भिक्षुक वगैरे लोक हिंदुस्थान सरकारावर ४॥ लक्षांचा दावा करणार आहेत.

काबूलचे अमीर आपल्या राज्यांत तारायंत्र न होऊं देण्या विषयीं खटपट करीत आहेत.

चीन देशांतील पुष्कळ लोक मुसलमान व्हावयास लागले आहेत असें समजतें.

शेतकऱ्यांकडून सुमारें २३ लक्ष रुपये बाकी येणें होती ती गायकवाड सरकारांनीं त्यांस माफ केली. शिवाय ज्या खेड्यांतल्या शाळेंत निदान सोळा विद्यार्थी येतील तेथल्या शाळेंत मुलांना पाट्या, पेन्सिली, बुकें वगैरे पुरविण्याची त्यांनीं व्यवस्था केली आहे. क. त.

दीर्घोद्योग — सन १७८० च्या नोवेंबरच्या २५ तारखेस न्यूयार्क बंदरांत हेलगेट जवळ एक ब्रिटिश जहाज बुडालें आहे तें आज ११२ वर्षांनीं समुद्राच्या तळा पासून वर काढण्याचा यत्न करण्या साठीं अमेरिकेंत एक मंडळी निघाली असून तिचें भांडवल १०००० डालरांचें आहे. हें भांडवल सदर जहाज काढण्यासाठीं खर्च करण्याचें ठरलें आहे ह्या यत्नांत यश आलें तर सदर कंपनीस त्या गलबतांत असलेला ४० लाख डालरांचा माल मिळेल.

**एक नवा कारखाना—** मद्रास शहरांत विजेनें चालणारी ट्रामवे सुरू करण्याकरितां विलायतेंत एक मंडळी स्थापन झाली आहे. या मंडळीचें प्रमुखत्व हिंदुस्थानचे हितचिंतक मि. डिग्बी यांणीं घेतलें असून मुंबापूरस्थ मि. भावनगरी हे एक एतद्देशीय गृहस्थ त्यांतील व्यवस्थापक आहेत. या मंडळीचें भांडवल १०लक्ष रुपये असून १०।१० रुपयांचा एक असे त्याचे एक लक्ष भाग केले आहेत (वटवणावळी सुद्धां प्रत्येक भागानें १९ रु० होतात) यां पैकीं निम्मे भांडवल हिंदुस्थानांत उभें करण्याचा विचार असून त्या करितां मद्रास, मुंबई आणि कलकत्ता येथें न्याशनल ब्यांकेच्या आफिसांत शेअर जमविण्याचें काम गेल्या चौथ्या तारखे पासून चाललें आहे. ता० ४ मे पर्यंत हें भाग घेण्यांत येतील या विद्युत्शकटाचे कारखान्यांस लागणारें यांत्रिक सामान वगैरे मद्रासेंतच तयार करण्याचा विचार असून देखरेख करणारी माणसें सुद्धां इकडच्या इकडेच तयार करणार. अगदीं अवश्य तेवढींच माणसें विलायतेहून आणावयाची असा बेत आहे. हा कारखाना फार मोठा आहे. त्यांत भांडवल घालणारांस चार पैसे राहण्या सारखे असून कित्येक मजूर अन्नास लागतील हा एक मोठा फायदा आहे.

**जगांतील नद्या—** ह्या भूतलावर २९ मोठ्या नद्या आहेत. त्यांची लांबी १००० मैला पासून चार हजारां पेक्षां जास्त मैल आहे लांबीच्या अनुक्रमानें त्यांचीं नांवे आह्मी देतों—

| | |
|---|---|
| मिसी सिपी | ४३०० मैल |
| अमाझोन | ४०२९ |
| कियांग | ३९०० |
| एनिसाई | ३५८० |
| नाईल | ३२४० |
| हो आंगहो | ३०४० |
| वोल्गा | २५०० |
| डान्यूब | २८०० |
| अमूर | २५०० |
| रायोब्रेव्ह, रायोमंदिर, व नायझर, प्रत्येक | २३०० |
| रेडव्हिडर | १५२० |
| ओहिओ | १४८० |
| सेंट लारेन्स | १४५० |
| रायोनिग्रो | १६५० |
| ओरिनोको | १६०० |
| उरुग्वे | ११०० |
| युफ्रेटीस | १९०० |
| टैग्रीस व भागीरथी | १३०० |

सेंट लारेन्स व तिला मिळणाऱ्या नद्या व सरोवरें यांची मिळून ७३००० मैल लांबी आहे. या नदींत ९००० घन मैल उदक संचय आहे प्रत्येक सेकंदास १० लक्ष घन फूट पाणी काढून या नदीचा उपसा करावयाचें कोणी मनांत आणिल्यास ४० वर्षें ही तें संपणार नाहीं असा प्रोफेसर सायरस यांणीं हिशेब केला आहे. किती प्रचंड हा उदक संचय!

**राजा पळून गेला—** सिकीमचा राजा यात्रेचें मिष करून एकंदर जडजवाहीर बरोबर घेऊन तिबेटास पळून गेला आहे असं आतां बाहेर आलें आहे. गु० सू०

लष्करी लोकांची निवड करून त्यांची भरती करण्या करितां स्टेट सेक्रेटरी यांनीं एका कामगाराची नेमणूक दोन वर्षें पर्यंत मंजूर केली आहे व त्याची मुदत पांच वर्षें पर्यंत वाढविण्याचा अधिकार हिंदुस्थानचे सेनापतीस दिला आहे. पठाण लोकांची निवड पेशावर येथें, पंजाबी मुसलमानांची निवड रावळ पिंडी येथें, शीक लोकांची अमृतसर येथें डोग्रा लोकांची जालंदर येथें, जाट व हिंदुस्थानचे मुसलमान लोकांची दिल्ली येथें, हिंदुस्थानी लोकांची लखनौ येथें आणि गुरखा लोकांची गोरखपूर येथें अशीं ठिकाणें नेमलीं आहेत.

**देवालय सांपडलें—** कुलाबा जिल्ह्या पैकीं देवदंडा येथें एक शेतकरी शेतांत खणीत असतां त्याला शंकराचें एक जुनें देवालय सांपडलें आहे. त्यांत सांबाची पिंडी त्या पुढें नंदी व एक सहाण सांपडली असून आणखी खणण्याचें काम चालू आहे.

पुढच्या जून महिन्यांत एक रशियन आरमार इंग्लंडच्या आरमाराची कवाईत पाहण्यास तिकडे जाणार आहे आणि त्याच्या सन्मानार्थ इंग्लंडांत मोठा उत्साह होणार आहे. गु०सू०

**सोन्याचा बाजार—** हल्लीं इमानाचा जिकडे तिकडे तोटा पडत चालला असून लबाडी मात्र हवी तितकी स्वस्ती होत आहे युरोपियन कंपन्यांत इमान चांगलें असतें अशी आज पर्यंत चांगली समजुत होती परंतु त्यांत सुद्धा बेमानागिरी फार वाढूं लागली! बंगाल्यांत सोनपिट गोल्ड मिनिंग नांवाची एक कंपनी सोनें काढण्या साठीं निघालेली आहे व त्यांत शेंकडो लोकांनीं कांहीं तरी फायदा होईल ह्या आशेनें आपलें भांडवल घातलें आहे, पण आतां समजतेंकीं, मि० क्रिकेट व मि० मूस ह्या नावाचे दोन गोरे लोकांनीं संगनमत करून हा सर्व भुक्तीचा बाजार मांडला आहे ह्यापैकीं एक साहेब कलकत्याहून सोनें घेऊन खाणीची ह्मणून जी जागा ठरविली आहे तेथें जातो; आणि दुसरा तें सोनें त्या खाणीतील अशुद्ध मातींत मिसळून तो मसाला सोन्याची माती ह्मणून कलकत्यास दाखविण्यास आणतो; व त्या भपक्यावर च लोकांनीं आज पर्यंत पैसें घातले आहेत!! अशी लबाडी झाली असून व त्यांतील एक मनुष्य कबूल झाला असून त्यांच्यावर खटला होत नाहीं! असें पयोनियरनें लिहिलें आहे!! विश्वासाला आतां जागा तरी कशी राहणार नकळे!

**प्रळय—** फ्रान्स देशांत, इटालींत व युरोपांतील दुसऱ्या कांहीं शहरांत आगलाव्ये लोकांनीं हल्लीं प्रळय करून सोडला आहे पाहिजे त्या ठिकाणीं गुप्त रीतीनें सुरुंग घालून ते बत्ती ठोकून देतात व अतिशय नाश करितात जिकडे तिकडे धरावर व पकडा पकड सुरू आहे असें लंडनच्या तारा सांगतात. स.

शिकंदर बादशहाचा व पौरस राजाचा जो प्रचंड लढाई झाली त्या लढाईंत राजाच्या एका हत्तीनें लढण्याची फार कमाल केली. पुढें लढाईंत तो हत्ती शिकंदरानें पकडला व त्याच्या एका पायांत एक मोठा थोरला वाळा घालून तो सूर्यार्पण केला. या वाळ्यावर त्या हत्तीची व लढाईची हकीकत खोदली होती. तर तो हत्ती पुढें ३५० वर्षांनीं पुनः दिसला. त्याच्या पायांत तो लेख खोदलेला वाळा जशाच्या तसाच होता.

नुकतीच अशी बातमी आली आहे कीं, एका गिरणीला धूर जाण्यासाठीं चिमणी केली आहे ती कागदाची आहे. ब्रेस्लो (जर्मनींतील राजधानी बर्लिन या शहरापासून सुमारें दोनशे मैलांवर एक शहर आहे) येथें एका गिरणीला सुमारें चौपन्न फूट उंचीची चिमणी पाहिजे होती. तेव्हां नेहमीं प्रमाणें विटा न आणतां कागद एका ठिकाणीं खूप जोरानें दाबून त्याचे मोठमोठे ठोकळे बनविले, नंतर ते विटांप्रमाणें काळजीपूर्वक एकमेकांवर ठेवून त्याच्या करितां मुद्दाम निराळें केलेलें सिमिट (लुकण) घालून ते सांधले. या चिमणीला आग लागण्याची भीति नाहीं अथवा कांहीं पदार्थ वरून चोपडला आहे. विजेच्या पडण्याची तर भीति मुळींच नाहीं. इतर चिमण्यांना ती भीति फार विजेनें या चिमण्यांच्या द्वारानें आजपर्यंत किती तरी नुकसान केलें! वरील अनुभव घेऊन झाल्या नंतर फ्रान्सांत एका गृहस्थानें पिआनोची केस (पेटी) कागदाची तयार केली. ती इतकी कठिण कीं बोलायची सोय नाहीं. त्या पेटीचा रंग दुधासारखा पांढरा आहे. त्या पिआनोंतून सूर फारच मधुर निघतात. मोठे मात्र निघत नाहींत. ज्या कागदाची ती पेटी करावयाची त्याच्या तंतूवर सुराची मधुरता अवलंबून असते.

व्हिएना (आस्ट्रियाची राजधानी) येथें असा कायदा आहे कीं, रात्रीं साडेदहा वाजल्यानंतर कोणी रस्त्यांत हिंडतां कामा नये त्या वेळच्या नंतर कोणी माणूस घरांतून बाहेर पडतांना अगर घरांत शिरतांना पाहिला तर पोलिसानें त्याच्यापासून सुमारें दोन आणे कर घ्यावा असा अधिकार आहे.

ईजिप्टमध्यें एकंदर २३ स्मालकाजकोर्टें आहेत. आणि त्यांत होणारें काम इतकें चोख होतें कीं तेथल्या निकालाविरुद्ध अपील होतच नाहीं.

डेराडून—येथें जो फारेस्ट खात्याची शाळा आहे, तेथें तरुण मुलांनीं जाऊन शिकावें. त्यापासून त्यांचा फायदा आहे, कारण रु० २०० पासून ६०० पर्यंतच्या १२६ जागा त्या खात्यांत मोकळ्या आहेत, असें एक वर्तमानपत्र सुचवितें.

मंडाले येथें अग्निप्रलय झाला. त्यांत सुमारें दोन मैल रस्त्यावरलीं घरें स्वाहा झालीं व पुष्कळ लोकांची आहुती झाली आग विझवायच्या इंजनाचें कांहीं चालेना, आणि वाऱ्यानें तर अनर्थ करून सोडला होता.

करम०

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराची किंमत
वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१३
सहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।०८
किरकोळ अंकास ..............................०।४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०।१

SUBSCRIPTION
Rs.
annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..........................................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXVI | AKOLA MONDAY 23 MAY 1892 | NO 20

वर्ष २६ | सोमवार तारीख २३ माहे मे सन १८९२ इ० | अंक २०

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य १२ शके १८१४

## फुकट परंतु जबरीचें शिक्षण.

"सत्यधर्म समाज" नावांची मंडळी पुणें मुक्कामीं स्थापन झाली आहे हें वर्तमानपत्रें वाचकांस माहीत असेलच. ह्या मंडळीचा उद्देश असा आहे कीं, ब्राह्मणेतर जातीच्या उन्नत्यर्थ झटावयाचें व त्यांतल्या त्यांत साधेल तर ब्राह्मण लोकांची निंदाही करावयाची. कांहीं वर्षांपूर्वीं जोतीराव फुले व दीनबंधु प्रभृति मंडळींनीं ब्राह्मण लोकांस शिव्या शाप देण्याचा विडाच उचलला होता; त्याच लोकांचा अनुयायी सध्यांचा समाज असल्या कारणानें त्यांचें अनुकरण करण्यांस समाज विसरला नाहीं. रा. सा. विश्रामजी घोल्या सारख्यांचा समाजास आश्रय असल्या कारणानें ह्यांत विशेष भारदस्तपणा राहील अशी आमची आशा होती परंतु ती सफळ होण्या सारखीं चिन्हें अजून तरी दिसत नाहींत. तरी पण पहिल्या पेक्षां अलीकडे ह्या शिव्यांचें मान बरेंच कमती झालें आहे ही एक मोठी आनंदाची गोष्ट समजली पाहिजे. मागें ब्राह्मणाचें नैसर्गिक चापल्य बऱ्याच युरोपियनांस असह्य झालें होतें व लीवारनर साहेबांसारख्यांस ब्राह्मणांची निंदा ऐकणें संतोष दायक होत असे. ब्राह्मणांची निंदा करणें ह्मणजे नीच जातीच्या उत्कर्षास सहाय करणें होय असा सर्व साधारण समजही झाला असे व त्या समजाचें निरारोपण अजून ही समूळ नाहींसें झालें नाहीं असें दिसतें. ब्राह्मणेतर जातीचें अशा रीतीचें वर्तन जर त्यांच्या हितास कारणभूत झालें असतें तर ह्या श्रेष्ठ ह्मणविण्या जातीस वाईट वाटण्यास कांहीं कारण नव्हतें. परंतु अशा निरुपद्रवी परंतु निंद्य वर्तना पासून काळाचा व बुद्धीचा जो निरर्थक व्यय झाला त्या बद्दल मात्र कोणास ही वाईट वाटल्या वांचून राहणार नाहीं. असो.

वरील समाजानें ब्राह्मणेतर जातींची मोठी सभा भरवून हिंदुस्थान सरकारास एक अर्ज पाठविण्याचा ठराव केला आहे. त्या अर्जांत इंग्रज सरकारच्या राज्यांत सर्व हिंदुस्थानभर देशीभाषेंत चार ईयत्ता पर्यंत तरी शिक्षण सर्व मुलांनीं मिळविलेंच पाहिजे अशा तऱ्हेचा कायदा करण्याबें सुचविलें आहे व अर्थांत तें शिक्षण मोफत असावें अशा विषयीं विनंती करण्यांत आली आहे. अशा तऱ्हेनें शिक्षण देण्याचीं कारणें दाखवित असतां नेहमीं प्रमाणें ब्राह्मणांवर ताशेरा झाडण्यास कसूर झाली नाहीं. अशा उपायानें तरी लॉर्ड ल्यांडसडाऊन यांचें मन वळून ह्या समाजाच्या मागण्या ते कबूल करतील तर ब्राह्मणांस आनंदच होईल अशी आमची खात्री आहे. ह्या समाजांत शूद्र लोकांचा भरणाच फार आहे तरी पण ब्राह्मणांची निंदा करीत असतां अति शुद्रांच्या पंक्तीस जाऊन बसण्याची हातोटी त्यांस फार चांगली साधली आहे. पुण्या सारख्या ठिकाणीं तरी शूद्र लोकांची स्थिती फार चांगली आहे. अते कोणीही समंजस लोक कबूल करतील व ब्राह्मणांची वागणूक ज्या प्रमाणें शूद्र लोकांशीं असते त्यापेक्षां शंभरपटीनें निंद्य अशी वागणूक शूद्र लोकांची अति शूद्र लोकांबरोबर असते; परंतु प्रसंगास त्यांच्या निकृष्ट स्थिती सारखीच आपली आहे असें ह्मणण्यासही ते मागें पुढें पाहत नाहींत हा धूर्ततेचा कावा ब्राह्मण लोकांनीच ह्यांना शिकविला असावा, असो. वरील अर्जांतील मागण्या सरकारास कितपत रुचतील व अशा प्रकारच्या मागण्या पासून रयतेस कितीसा फायदा आहे ह्याचा विचार होणें अप्रासंगिक होणार नाहीं.

संमतिवयाच्या कायद्या पासून बऱ्याच लोकांस सरकारजवळ कायदे मागण्याची जिज्ञासा उत्पन्न झाली आहे. व फक्त भूतदयेनें उत्पन्न झालेल्या कळवळ्यानें सर्व प्रजाजन उलट असतांही आपलाच हेका पुराकरणाऱ्या दयाळु सरकाराजवळ त्यांच्या औदार्यावर भरंवसा ठेऊन लोकांनीं आपली कार्यसिद्धि करून घेण्यास त्यांच्या तोंडाकडे पहाणें साहजिक आहे. परंतु आपल्या हिताहिताचा संबंध ज्या ठिकाणीं आहे व पैशाला खार लागण्याचा प्रसंग जेथें येणार आहे अशा वेळीं भूतदया, औदार्य, न्यायीपणा इ. सर्व गुणांना झुगारून देण्यास मायबाप सरकारास कधींच अशक्य वाटलें नाहीं असा पावलो पावलीं अनुभव असतां लोकांचें तिकडे नेहमीं दुर्लक्ष्य व्हावें हा एक चमत्कारच समजला पाहिजे. प्रत्येक मनुष्याला शिक्षण मिळालें पाहिजे अशी मागणी करणारांचा उद्देश तें शिक्षण ज्याचें त्यानें आपापल्या खर्चानें कमवावें असा उद्देश नाहीं हें सिद्ध आहे. तेव्हां अशा तऱ्हेचें शिक्षण देण्यास सरकारास विद्या खात्याकडील खर्च दसपटी पेक्षां जास्त वाढवावा लागेल ह्याचा विचार अर्जदाराकडून व्हावयास पाहिजे होता. आहे तोच खर्च फार आहे व शिक्षणाची व्यवस्था लोकांनीं संभाळावी आणि सरकारच्या डोयी वरील हा भार हलका करावा असें ह्मणून दाखविणारें व हलकें हलकें कृतीही करून दाखविणारें सरकार आपल्या मागणीला कितपत मान देईल ह्याचा अंदाज अगोदरच करतां येण्या जोगा आहे. कर बसवून सरकारनें आपल्या खजिन्यांत पडणारी खळ भरून काढावी असा अर्जदारांचा उद्देश नसला पाहिजे व असा जरी उद्देश असेल तरी सरकार आपला संबंध ज्यांत नाहीं अशा गोष्टीं बद्दल रयतेंत असंतोष उत्पन्न करण्यास कधींही तयार होणार नाहीं. रयतेस तरी ह्या कायद्या पासून कितपत फायदा होणार आहे हें पाहिलें पाहिजे. अर्जदारांनीं इंग्लंडांत असा कायदा आहे हें एक कारण इकडे तो कायदा लागूं करण्याबद्दल विनंती केली आहे. परकीयांचें तितकें अनुकरणीय असा जो कांहीं लोकांचा समज झाला आहे अथवा एखादी अल्लड बायको दुसरीनें सरी घातली तर आपण दोरी घालण्यास ज्या प्रमाणें तयार होते त्यांतलाच हा प्रकार दिसतो आहे. इंग्लंडांत पैसा मुबलक आहे. शिक्षणाची गोडी फार आहे. शिक्षणावर उपजीवितच विशेष अवलंबून आहे. इकडे त्याच्या अगदीं उलट प्रकार आहे. लाखो रुपये कर्ज, कोट्यावधि लोकांना शिक्षण गंधही नाहीं. व शेती उपजीविकेचें मुख्य साधन आहे. अशा ठिकाणीं हा कायदा कितपत हितावह होणार आहे. ज्यांच्या करितां कायदा मागणार त्यांच्या खऱ्या स्थितीचें अनुमान करणारांस जुलमाचें शिक्षणच त्यांच्या सुधारणेस अवश्य आहे असें कधीं ही ह्मणतां येणार नाहीं. शेती सारख्या कष्ट साध्य व सहाय्या वांचून अशक्य अशा धंद्यावर नेमंतम दिवस काढणारांना त्यांच्या हरएक कामांत नोकरां ऐवजीं उपयोगी पडणाऱ्या मुलांस दिवसांतून पांच किंवा सहा तास शाळेंत धाडण्यास भाग पाडणें व असें न झाल्यास त्यांस दंड किंवा शिक्षा भोगावयास लावणें कितपत हितावह होणार आहे? शेतकऱ्यांची स्थिती शोचनीय होत चालली आहे त्यास कोणी त्राता उरला नाहीं व पुढें त्यांची काय वाट लागणार अशी काळजी सर्वांना लागली असून त्यांचे कैवारी ह्मणविणारांनीं व त्यांच्याच हिता करितां ह्मणून सरकाराजवळ कांहीं तरी वेडगळ मागण्या कराव्या ही खरोखर मोठी दुर्दैवाची गोष्ट समजली पाहिजे. ब्राह्मणेतर जातीची कळकळ पुण्याच्या समाजास जर खरीच असेल तर त्यांची सुधारणा करण्यास सांप्रतचा मार्ग अगदीं निरुपयोगी आहे. सरकारनें उदार शिक्षणांत दिलेल्या सवलतींतील मोठा भाग आपल्यास मिळविण्याच्या प्रयत्नांत जर ह्या समाजाचा काळ खर्च होईल तर व सरकारास सहज देतां येतील अशा मागण्या करण्याकडे बुद्धीचा व्यय होईल तर लिवारनर साहेबांसारख्या उदार साहेबांच्या सहाय्यानें बरेंच यश येणार आहे. आपलें हित साधून घेत असतां ब्राह्मणांची निरर्थक निंदा व अति शुद्रांबद्दल दिखाऊ कळ कळ हे दोन भाग सोडून दिले तर कोणीही अशा खटपटीचें अभिनंदनच करील.

---

सांप्रतचा दुष्काळ व लोकांची दैना हीं पाहून हिंदुस्थानच्या साम्पतिक स्थिती विषयीं प्रश्न उद्भवतो कीं अशा कष्टमय व दुःखमय स्थितीचें पर्यवसान तरी काय होणार आहे. कालचक्राच्या फेऱ्या बरोबर आपण सारखें फिरते आहों हें खरें पण आतां लोकांचा टिकाव किती दिवस निभणार आहे आणि परिणामीं भावी स्थिती काय होणार आहे हें कांहीं पक्कें कळत नाहीं तत्रापि सध्यां जीं जीं लक्षणें दृश्यमान आहेत त्या वरून आपल्या नेटिव लोकांची कांहीं धडगत दिसत नाहीं. कित्येक जणांचा अभिप्राय असा पडतो कीं इंग्रजी राज्य चिरकाल झाल्यानें देशाची भरभराट होत आहे, सर्व देश पाकपाण्यानें, उद्योगश्रेणीनें, रेल्वे तारायंत्रें इत्यादि दळणवळणांच्या सोयींनीं, आगत व निर्गत मालाच्या उंच उंच शिखरप्राय राशींनीं धनसंपन्न व सुखसमृद्ध बनला आहे आणि त्या धनाढ्यतेचीं दर्शक निशाणें मोठमोठाले वाडे, हवेल्या श्रीमंतीचे दागदागिने, सुखकारक उंची उंची कपडालत्ता, न्यायकोडताची समृद्धि, उत्पन्नाच्या तिजोऱ्या हीं होत. सर्वजनसमूह माऊमत्ता व जीवित यांच्या संरक्षणानें आबादानी व धनधान्यविपुलता यांच्या सुखवैभवानें माना डोलवीत आहे. हा आनंदोत्सव व ऐषआराम खरा वास्तविक आहे असें समजून इंग्रजी राज्याचे गोडवे गाणारे राजहंस कांहीं आंग्लो-इंडियन सत्ताधीश व थोडे दुधखुळे नेटिव सांपडतील. परंतु वरील प्रकारची दृष्टि फार थोड्या भाग्यशाली पुरुषास दिली आहे आणि त्या दृष्टिलाळचें स्वर्गसुख इंद्रजाला प्रमाणें खोटें व मोह घालणारें आहे. दुसरेपक्षीं कांहीं लोक अपलाप करितात कीं अघोर दारिद्र्यांत सर्व लोकसमूह लोळत पडला आहे, त्यांच्या गरजावर इंग्लंद देशानें आपले कारखानें चालविल्या मुळें सर्व देश निष्कांचन, व उद्योगपराङ्मुख, बनत चालला आहे, देशाच्या सोयीसाठीं ह्मणून रेल्वे, तारायंत्रें, कालवे वगैरे संस्था चालल्या आहेत त्या एका प्रकारें हिंदुस्थानच्या द्रव्य संपत्तीच्या प्रवाहाला इंग्लंद देशाच्या भांडवलरूपीं समुद्रांत नेऊन सोडीत आहेत; राज्यांतील दिवाणी, फौजदारी व मुलकी या शाखाकडील मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या व विपूल पगारांच्या जागा राज्यकर्त्यांच्या आप्त स्वकीयासाठीं बगळून ठेवल्यानें इंग्लंडाची वैभवोन्नति, नेटिवांची पायमल्ली व दारिद्र्यगर्की अक्षय्यपतन अशा प्रकारची फलद्रूपता इंग्रजांच्या चिरस्थायी राज्य कर्तृत्वानें प्राप्त झाली आहे; आणि लष्करी खर्चानें हिंदुस्थानची प्रजा नागवून सोडून हत्याराच्या कायद्यानें हतवीर्य नेटिवांस दरिद्री, नामर्द, निखळ, शरणांगत व चरणलीन असें बनविलें आहे.

वरील दोन्ही पक्षांच्या अभिप्रायांचें आह्मी चांगलें मनन केलें आहे, त्यांच्या विचारास आधारभूत गोष्टींची शहानिशा आह्मी पक्षपात सोडून प्रांजल बुद्धीनें करून पाहिली, आणि वस्तुस्थितीशीं तडून वरील अभिप्रायांची यथार्थता शोधून पाहिली तेव्हां आह्मांस आमचें सांपतचें ज्ञान, अनुभव व अनुमान हीं असें सांगतात कीं दुसरा अभिप्राय खरा आहे, भावी स्थिती फार कठीण दिसते, व चालू राज्यपद्धत सुधारली नाहीं तर पुढें येणारा काळ मोठा भयंकर वाटतो. कसें हीं होवो आमच्या लोकांचा सर्व हवाला ईश्वरावर आणि आमच्या राज्यकर्त्यांवर सर्व प्रकारें आहे. विद्याभिवृद्धि सपाट्यानें चालली आहे तरी देखील आह्मांस क्षणोक्षणीं जुलूम साहेबांच्या सरस्युराचा प्रत्यय येतो. ज्या गोष्टी आह्मास कळून चुकल्या होत्या त्या त्या थोर, उदारचरित, निःस्पृह, व लेखनकुशल पुरुषानें स्पष्ट व व्यक्त करून सांगितल्या आहेत. पन्नास वर्षांमागें लोक संख्येच्या मानानें अन्नाची विपुलता व पीकपाण्याची सुबत्ता होती त्यामुळें लोकांजवळ चार पैसे कमी होते तरी ते पोटभर अन्नाला व अंगभर वस्त्राला मोताद नव्हते. ते सुखाचे दिवस पुन्हा दिसतील काय असें मनाला वारंवार वाटतें।

---

मराठीमध्यें ग्रंथसंग्रह फार कमी आहे व तो वाढविण्या विषयीं उद्योगही मोठ्या जारीनें चाललेला नाहीं या संबंधानें औदासिन्य पर उद्गार जिकडून तिकडून ऐकूं येतात. आपल्या भाषे संबंधानें विचार करितांना आपली नजर सहजगत्या इतर सुधारणेच्या पंथास लागलेल्या किंवा शिखरास पोहोचलेल्या राष्ट्रांकडेस वळते. परंतु त्या देशांत ग्रंथवृद्धी होण्याला जो अनुकूळ वस्तुस्थितीचा जमाव होता त्याचा आमच्या देशांत बऱ्याच अंशानें अभाव आहे. स्वतंत्रता अथवा स्वराज्य, शिक्षणप्रसार, शांतता, संतुष्टता, द्रव्यानुकूलता व उद्योग करण्याची संवय हीं ग्रंथसमृद्धि होण्याला अवश्य होत. स्वतंत्रतेच्या अनुपम छत्राखालीं मनांतील विचार प्रगल्भतेला पावून स्वभाषा, कवित्व व तात्विकज्ञान यांना उत्तेजन मिळून कशा भरभराटीला चढतात हें इतिहासाकडे ओझरती दृष्टी फेकल्यानें सुद्धां कळून येण्यासारखें आहे. रामदास, तुकाराम, मुक्तेश्वर इत्यादि साधूंचे ग्रंथ निर्माण होण्याला त्यांची परमार्थ वृत्ति व अज्ञानी स्वबांधवांना परलोकसाधनाचा सरळ व सोप्या रीतीनें मार्ग दाखविण्याची परोपकारबुद्धि हीं बहुतांशीं कारणीभूत झालीं. मोरोपंताला धनिकाश्रय चांगला होता. या कविश्रेष्ठांचे मराठी भाषेवर जे अनंत उपकार झाले ते न फिटण्या सारखे आहेत.

मराठी भाषेंतील ग्रंथ विपुल न होण्याला जर आधुनिक विद्वानांची अनास्थाच कारण असेल तर या पेक्षां आह्मां महाराष्ट्रीयांना अधिक लाज आणणारी गोष्ट दुसरी कोणतीच नसेल. आमच्या भाषेला उतरती कळा लागण्याचें एक मोठें कारण सरकारकडून व शिक्षणांचीं सूत्रें ज्यांच्या हातांत आहेत त्याचे कडून होणारी हयगय होय. एतद्देशीय भाषास राजमान्य लहान मोठ्या संस्थांतून थारा मिळेनासा झाला आहे. या विषयीं आह्मी आनंद किंवा खेद मानावा हें आह्मास कळत नाहीं. कारण देशी भाषांची हक्काची जागा इंग्रजी भाषेनें हिसकल्यामुळें त्यांची दिवसानुदिवस अधिकाधिक राळ होत चालली आहे. दुसरें या विदेशी भाषेला अंतरावरच ठेवण्याचा प्रयत्न झाला असतां आज ज्या लहान मोठ्या संस्था दृष्टीस पडतात त्यांचें अस्तित्व कठीण झालें असतें व त्यांचे पासून आह्माला जे फायदे झाले आहेत व अधिक होण्याचीं जीं चिन्हें आहेत त्यांचा मागमूसही नसता. कोर्ट कचेऱ्यांतूनही एतद्देशीय भाषांना अर्धचंद्रच देण्यांत येत आहे. न्यायाधीश वकील व कारकून यांची कमी अधिक प्रमाणानें इंग्रजीमध्यें वाकबगारी असण्याची अपरिहार्य अवश्यकता असल्यामुळें अक्षरशत्रु व अडाणी पक्षकार, साक्षीदार खेरीज करून इतरांजवळ देशीभाषांची प्रतिष्ठा नाहीं व अशीच स्थिती कांहीं दिवस चालल्यास देशी ( व ती चालणार यांत तिळमात्र शंका नाहीं ) भाषांना कोणती स्थिती प्राप्त होईल याची कल्पना करण्यास मन माघारें येतें.

चालू शिक्षणक्रमाकडे वळलें असतां एतद्देशीय भाषांचा जो मान ठेविला जातो त्यावरूनही आनंद व हुरूप वाटण्यास जागा नाहीं कारण हायस्कूलांमध्यें प्रवेश झाल्यावर विद्यार्थ्यांना संस्कृत किंवा मराठी भाषेचा अभ्यास करावयाचा याविषयीं विचार पडतो. ज्या मुलांची विश्वविद्यालयाची प्रवेश परीक्षा पास झाल्यावर पुढें जाण्याची उमेद असते त्यांना मराठी भाषेची कितीही गोडी व आवड असली तरी निरुपायास्तव पाठशाळांतील शिक्षणाला अंतरण्याचा प्रसंग येऊं नये ह्मणून कधीं कधीं आपले कलाविरुद्ध संस्कृत भाषेचेंच अवलंबन करावें लागतें. ह्मणजे ज्या मुलांना कालांतरानें पाश्चात्य शिक्षणाचा संस्कार व्हावयाचा व ज्यांच्या द्वारें त्या ज्ञानाचा स्वाद घेण्याची त्यांच्या देशबंधूंना उत्कंठा असते ( निदान दाखवितां तरी येते ) त्यांना मराठी ४।५ च बुकांचें अध्यापन झाल्यानंतर मराठी भाषेला राम राम ठोकावा लागतो. आतां यावर असा आक्षेप निघेल कीं मराठी भाषेची जननी जी संस्कृत भाषा तिचा अभ्यास झाल्यावर मराठी भाषेवर फारशी मेहेनत करण्याची जरूरी नाहीं. परंतु हें ह्मणणें सर्वैव खरें नाहीं. मराठी भाषा बरेच दिवस प्रचारांत असल्या कारणानें ती एक स्वतंत्र भाषा झाली आहे. व तिच्यांतील ग्रंथाचा सांठा अगदींच लहान आहे असेंही नाहीं. स्वभाषेंतील सौरस्य न दवडतां परभाषेंतील विचार उतरून देण्याला स्वभाषा चांगली अंकित असली पाहिजे. व तिचा कांहीं काळ पर्यंत व्यवस्थेशीर अभ्यास झाल्या खेरीज ती कबजांत येणें कठीण आहे. दुसरें जे मराठीचा अभ्यास चालूं ठेवितात त्यांची एक तर पुढें जाण्याची बहुशः उमेद नसते व असलीच तर स्वभाषेचा स्वीकार केल्यामुळें च पुढील अभ्यास करण्याची गती कुंठीत होते. पाठशाळांतील शिक्षणांत मराठी भाषेला अवकाश नाहीं. एतद्देशीय भाषांचा विश्वविद्यालयांत शिरकाव होण्या साठीं पुष्कळ विद्वानांचे दीर्घ उद्योग निष्फळ झाले ही मोठी खेदाची गोष्ट होय.

शिक्षण प्रसारा विषयीं विचार केला असतां शिक्षण दिवसेंदिवस फैलावत चाललें आहे हें कोणासही कबूल करावें लागेल परंतु एकाच प्रकारचें शिक्षण दिलें जात असल्या कारणानें त्या शिक्षणाचें मोल कमी कमी होत चाललें आहे. आज सर्व लोकांची चालूं शिक्षणावरच उडी पडण्याला सरकारचा अदूरदर्शीपणा व लोकांचें अज्ञान हींच कारणें होत. निरुपायानें पुष्कळांनां दुसरा मार्ग खुला नसल्यामुळें सध्यां शाळांतून चालूं असलेल्या शिक्षण क्रमांतच शिरावें लागतें. व त्यापैकीं बऱ्याच लोकांना पैशाच्या किंवा विशिष्ट बुद्धीच्या अडचणीमुळें हा मार्ग अर्धांपाव सोडणें भाग पडतें. आह्मी विशिष्ट बुद्धी ह्मटली याचें कारण हेंच कीं ज्या मुलांची गती हायस्कुलांतील शिक्षणामध्यें चांगलीशी होत नाहीं तो अगदींच निरुपयोगी असतो असें नाहीं. इतर विषयांत त्याची बुद्धि चांगली दिसून येईल. या साठीं आज जें शिक्षण दिलें जातें त्याला थोडीशी निराळी दिशा मिळाली पाहिजे. चालू शिक्षणांतच निराळा ओघ पाडला पाहिजे. अलिकडे धंदे शिक्षणाची निकड जास्तीच भासूं लागली आहे. या शिक्षणाला चांगलें उत्तेजन मिळाल्या शिवाय स्वदेशीं कारखाने व व्यापार ह्यांना तेजी यावयाची नाहीं, व देशांतील पैसा देशांत रहावयाचा नाहीं. या उपर शिक्षणाकडे जर सरकार दुर्लक्ष करील तर आज पुष्कळ होतकरू मुलांची भलत्याच कारणीं बुद्धी वेंचली जात असल्यामुळें जें नुकसान होत आहे व त्या समवेत जी देशाची हानी होत आहे या दोहोंची जबाबदारी त्यांचेवर आहे.

ग्रंथसंग्रह वाढण्याला लोकांमध्यें वाचनाची अभिरुची वाढली पाहिजे. शिक्षणाचा फैलावा जरी थोडथोडा दिवसानुदिवस वाढत चालला आहे तरी लोकांचा इंग्रजींतून मराठींत उतरविलेल्या क्लिष्टशास्त्रांचा अभ्यास करण्याकडे प्रवृत्ति नाहीं. शिक्षण मिळाल्या पासून ज्ञान व चरितार्थता हीं दोन्ही ही अनायासें साधलीं जातात तरी केवळ ज्ञाना करितांच अभ्यास करणारे फारच थोडे सांपडतील. मराठींत गहन शास्त्रीय विषयावर ग्रंथ होण्याला अनेक अडचणी आहेत. शाळांतून मराठींतून शिक्षण फारच कमी दिलें जातें. मोठ्या प्रयत्नानें एका भाषेंतील सार दुसरे भाषेंत दिल्या नंतर ही त्याला वाचक मिळण्याचीं मारामार पडेल. संसारयात्रेचा मार्ग आरंभल्यावर केवळ ज्ञानार्थ अनोळखी परिभाषा उकलून पुस्तकें चाळण्याची थोडेच लोक तसदी घेतात. व ज्यांना विद्येची आवड अनावर असेल त्यांना इंग्रजीमध्यें साधारण गती करून घेतल्या नंतर थोड्या पैशानें मूळच्याच ग्रंथांशीं जाऊन आपली मनीषा तृप्त करितां येईल. व अशा विद्याभिलाषी लोकांमध्यें स्वभाषाभिमानार्थ दुबार वेळ खर्च करणारे फारच विरळा सांपडतील.

---

रा० रा० यारो विठ्ठल वाळवेकर सुबोध पत्रिकेचे प्रकाशक यांनीं जार्ज वाशिंगटन. चरित्र मराठींत लिहून प्रसिद्ध केलें आहे. त्या पुस्तकाची एक प्रत अभिप्रायासाठीं आह्माकडे आली आहे तिचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. वाशिंगटनचें रमणीय चरित्र, वाळवेकरांची प्रौढ भाषा व सुबोध प्रकाशाची सुरेख छापणी यांनीं हें पुस्तक वाचण्यालायक व लोकादरास पात्र असें आहे. पुस्तक समग्र वाचल्यावर मागाहून आह्मी आपला अभिप्राय प्रसिद्ध करूं.

---

पुण्याच्या कांहीं गृहस्थांनीं मिशनरी साहेबांच्या हातची चहाकाफी व बिस्कुटें खाल्लीं ह्मणून त्यांच्या संबंधानें आज दोन महिने ग्रामण्याचें प्रकरण तिकडे चाललें होतें. श्रीमत् शंकराचार्यांकडे फिर्याद झाल्यावर त्यांच्या कडून न्याय शास्त्रांत निपूण असे दोन शास्त्री वरील फिर्यादीचा निकाल करणाकरितां पुण्यास धाडण्यांत आले. वादी व प्रतिवादी यांजकडील साक्षी पुरावा घेऊन ज्यांच्यावर आरोप शाबीत झाला त्यांस सांतपन चांद्रायण, कृच्छ्रदान, सर्व प्रायश्चित्त इत्यादि अपराध महत्वाच्या मानानें शुद्ध करण्याचे उगाय सांगण्यांत आले. वरील शास्त्रीद्वयानें या खटल्याचा जो निर्णय इंग्रजी न्यायकोडताच्या धर्तीवर केला असून तो यथासांग निष्पक्षपाताचा, दूरदर्शीपणाचा असा आहे. वादीपक्षाचा हटवाद, कलहतत्परता, मिथ्या भाषण, व वृथा धर्मस्तोम हीं स्पष्टपणें कळून आलीं त्याच प्रमाणें प्रतिवादी पक्षाचें धर्म प्रकरणांत औदासीन्य, अशास्त्र गोष्टींत प्रवृत्ती, व प्रायश्चित्ताविषयीं नास्तिक्यबुद्धि हीं ही प्रकटपणें दिसलीं. एकंदरीनें ग्रामण्याचा निकाल सर्व चांगल्या मनुष्यांस आवडण्या सारखा झाला आणि अखेर धर्माच्या बाबदींतील फाटाफूट व दुही सध्यां मोडली ही मोठी आनंदाची गोष्ट होय.

---

The Berar Samachar

MONDAY, MAY 23
1892

The British Government never misses the lion's share in whatever will flow to power and greatness. The whole history of the English people is one long series of illustrations of the governing principle of self-aggradizement. If man be a wealth-seeking animal the British Government representing so many human units as its component parts is much more so in all possible limits. The American War that led to the foundation of the United States as separated from the mother colony is but a negative example of the British selfishness and short-sighted egotism. The people in Great Britain would not lose an iota of administrative and controlling agencies in the American Kingdom but the new settlers in the other hemisphere were more than a match for them and got themselves rid of their dire and ruinous influences. The British dominions in India with their ever expanding and fast increasing boundaries afford an excellent positive illustration of the British policy of self-advancement. Nothing can withstand this policy. But the measure of success or failure that attends such a policy corresponds with the good associations it carries with it. Even to be most successfully and eminently selfish one must be a little unselfish. The show of false altruism often succeeds in the world. Whenever the British Government can be benevolent and philanthropic without any sacrifice to themselves it is the most benign and benevolent Government that ever ruled on the surface of the earth. But their interests must get the upper hand whenever they clash with others. It is here that they retire with good grace from all their boast of civilized and refined politics. It is human nature and we do not blame our Government for that. Our only prayer to them is to introduce the salutary influences of uniting the people of India and Great Britain under one homogeneous ties of brotherhood & fellowsubjects. Let the Government be

ever watchful to fill up the wide gap caused by the differences in tongue, nationality and religion. The best way to do away with these geographical divisions & artificial distinctions of human creation is to foster that fellowfeeling and unity of sentiments which goes in the long run to ameliorate all sorts of alienating relations.

With the British Government we stand or fall. These are the words of Mr. Hume and they are pregnant with deep meaning and wise warning. The present policy of the Government is not to strengthen those foundations of the empire which have brought together both the English and the natives under one sceptre. It tends vastly to impair those fastnesses and strongholds of unity and amity with the weakening influences of race-hatred, military persuasions, and high emolutions of Anglo-Indian officialdom. Every move in the right direction is studiedly avoided and if it succeed at all it loses much of its goodness. The progress of the Indian Councils Bill in the Commitsee of the House of Commons is another illustration of the tedious, sluggish, and unsympathetic process of law— making in connection with India.

The principle of election which the Congress advocated is practically set at naught. The Under Secretary Mr. Curzon explained the view of the Govt. in the often quoted sentence 'be the method election, selection, or delegation, or whatever be the particular phrase you desire to employ.' It was a high stroke of policy on Mr. Gladstone's part when he resolutely got him to stick to his words in a way to let the people of India have some significant voice in their legislative Councils. It is to be seen how far the India Govt. will act upon this bill in the light of this interpretation. The new bill does not make any advance as regards the number of members of the Councils if the Government of India extend the old Act to its maximum limit. The minimum number is ten according to the bill while maximum number is twelve according to the old Act. Mr. Maclean, the proclaimed antagonist of Mr. Hume, tried his best to delay the operation of the bill to an indefinite period. Of course he was defeated in his amendment but the other amendment of bringing the bill into force within 18 months of its passing was also rejected because it wos thought unwise to fetter the discretion and to hamper the initiative of the Viceroy in this matter. Sober and thoughtful people wonder that the bill comes so late as thirty years after the original Act of 1861. It is certainly disappointing that no amendment passes the Committee. In short, the account of the present ill advised bill is a striking commentary upon the spirit of the Anglo Indian despotism in India.

———0———

The following paras from the discussions in the Committee of the House of Commons lay down the unvarnished tale of British policy. With this view before us we would easily explain why those members of Parliament who took up the cause of India for the sake of truth, right, and justice could not succeed in the face of opponents of the type of Mr. Maclean, Sir R. Temple, and Mr. Curzon. The now stating paragraph will show how honestly & sincerely the English people cherish due faith in our loyalty and devotion to the English throne:—

"Sir W. Plowden said that Sir R Temple had forgotten that this diversity of population, habits of thought, languages, creeds, and forms of religious service rendered it absolutely necessary for the Government of India to obtain something like an expression of public opinion on the part of the people. He concurred in the view, however, that the amendment as at present drawn was not a practical one, but he urged the government to say how far they would be disposed to introduce in the Bill words which would show that the elective principle had been accepted by the House of Commons. Would the Under Secretary for India accept words providing that the additional members of Council should be eligible "whether elected or nominated." He contended that the past history of India showed that in moments of crisis many natives had proved themselves to be men of valour and administrative power, and quite able to replace European officials in many places.

Sir R. Temple disclaimed any intention to cast reflections upon the spirit or courage of our Indian fellow-subjects. What he had said and still maintained was that in the capacity and energy required in time of crisis and of danger they could not replace Europeans."

Though our good is bound with that of our rulers the latter will take care to hold their own even if the good of the former goes to the wall. Let our people observe what Mr. Curzon remarks about the supremacy of the official circle even in the legislative deliberations. It fully convinces us of the political serfdom to which we are reduced in the rapid current of events. We cannot guess how tearibly the heavens will be shaken to their foundations before the English people yield to the natives of India the control of the purse.

"If there were to be such a large number of non-official members, it would be necessary to add to the official members, for it was perfectly clear that the government must remain in the majority. And if these additional official members were appointed it would mean that high officials would have to be taken away from their duties in other parts of India. Thus the plan would not only lay a great burden upon government, but it would distinctly interfere with the business of government. Then it was to be noted that the larger the Councils became the greater would be the tendency to those results inseparable from popular assemblages. There would be the creation of two parties— a Government party and an Opposition. (Hear, hear, and "Why not?" from Mr. MacNeill.) The honorable member for Donegal did not seem to realize that such a position in India must result in the abrogation of government altogether. India could not afford to have two parties in the Council Chamber. The right honorable gentleman, the member for Mid-lothian, once described the position of an Opposition as being one of greater freedom and less responsibility. But in India it would be all freedom and no responsibility. Responsibility could only arise out of the possibility of being called upon to accept the consequences of one's own actions; and in India that obligation could never be imposed on an Opposition. It would be in every way undesirable to promote that friction and possible hostility between parties which did not at present exist, and he hoped that the House of Commons would never consent to any such scheme."

———•———

Mr. F. B. Dickinson Officiating Conservator of Forests H. A. D. has written us the following letter for general information:—

"It may interest some of your readers to know that the calendar for 1892 of the Imperial Forest school at Debra-Dun is obtainable from the Librarian of the school at the price of annas ten.

The calendar gives full information about the school course and examinations and would be useful both to intending students and to persons interested in education."

## वऱ्हाड

हवामान— उष्णता फार प्रखर तरी वारा चांगला जोराचा सुटतो ह्मणून तलखी व उकाडा होत नाहीं. परंतु पटकीचा उपद्रव फैलावत चालला आहे. बाळापूराकडे पुष्कळच लोक मेले. सांप्रतच्या पटकीच्या दुःखण्याचा निकाल फार तावडतोब होत असून त्याला उन्हाळ्याची भर पडते. मृत्यूचा अजब तडाखा पाहून दुःख कमी वाटतें आणि देहाची क्षणभंगुरता व ईश्वरेच्छेची शिरसावंद्यता हीं पदोपदीं लक्षांत येतात.

रा. रा. विसाजी रघुनाथ पेनशनदार मास्तर, कृष्णाजी बापुजी किडे, आणि शेषराव रघुनाथ वकील यांस अनुक्रमें उमरावती मूर्तिजापूर व वाशीम येथील तालुका बोर्डाचे सभासद नेमलें.

अकोल्यास नदीचें तुंबलेलें पाणी पिण्याच्या उपयोगांत येऊं नये अशी सरकार मार्फत मनाई झाली आहे त्याच प्रमाणें अर्धे कच्चे, फार पिकलेले व कुजलेले आंबे बाजारांत विकूं नयेत ह्मणून ही हुकुम सुटला आहे.

अति दुःखाची गोष्ट कीं बाळापूरचे तहशिलदार रा. रा. नारायण केशव देशपांडे अंजनगांवकर यांस पटकीच्या अजारानें गेल्या शुक्रवारीं देवाज्ञा झाली. गृहस्थ कामांत वाकबगार, प्रजेचा कनवाळू व स्वभावानें विलासी असा होता तेव्हां त्यांच्या आकस्मिक मरणानें आप्तइष्ट मंडळीस फारच दुःख होईल.

सर्जन-- मेजर चार्लस लिटल एम. डी. सानिटरी कमिशनर वऱ्हाड यांस त्यांच्या लष्करी खात्या कडील सर्जन -- लेफटेंनंट कर्नलच्या हुद्याची बढती मिळाली आहे हें कळविण्यात आह्मांस संतोष वाटतो.

रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ जोशी अव्वाची व स्पेशल माजिस्ट्रेट वर्ग२ यांस शिकंदराबादच्या छावणींत तीनशें रुपये पर्यंतच्या दाव्यांचा निकाल करण्याचा जिल्हा कोर्टाचा अधिकार देण्यांत आला.

मि. जे. आर. ओग्रेडी एक्स्ट्रा असि० कमिशनर यांस मुल्की कडील आसिस्टंट कमिशनरचे अधिकार दिले.

रा. रा. यशवंत वामन दिवे वकील यांस वाशिम तालुका बोर्डाचे सभासद नेमलें.

मि. जी. मेल्हास्ट डेपुटी कनसरव्हेटर फारेस्ट जिल्हा आफिसर - इलिचपूर यांस निकडीच्या घरगुती कामा निमित्त सहा महिन्यांची विशेष रजा पुढील माहिन्याचे १५ वे तारखे पासून दिली.

कर्नल रेनिक डेपुटी कमिशनर इलिचपूर हे आपल्या कामाचा चार्ज देऊन विलायतेस दोन वर्षांच्या फर्लोवर रवाना झाले.

पंडित सुरजनारायण यांस अजमिराकडे मोठ्या अधिकाराची बढतीची जागा मिळली असल्या कारणानें ते तिकडे उत्तर हिंदुस्थानांत जाणार आहेत असें कळतें,

दस्तुर एदलजी बहिमनजी असिस्टंट कमिशनर वर्ग १ शिकंदराबाद यांस गेल्या पंधरावे तारखेपासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली.

वाशीम ता० ११।५।९२

वि. वि. येथील डे० इन्स्पेक्टर मि० ऋषि तीन महिन्यांच्या रजेंत काय करणार हें कळलें नाहीं. कोणी ह्मणतात कीं ते पुण्याला जाणार व दुसरे कांहींजण बोलतात कीं ते इकडेच राहून शेतीवाडीची सुधारणा करणार. राजश्री ऋषि सरकारी नोकर असल्यामुळें दुसरें कारण सयुक्तिक वाटत नाहीं. रा. केळकर यांस गेल्या ४ तारखेपासून आक्टिंग डे० इन्स्पे० नेमले. हे गृहस्थ जुने, सभ्य, व शांत स्वभावाचे आहेत यांनीं पुष्कळ दिवस आक्टिंग कामें सर्वोत्कृष्ट केलीं आहेत तेव्हां त्यांच्या हक्कांचा विचार करून त्यांस कायमची डे० इन्स्पे० ची जागा मिळो असें सर्वजण इच्छितात.

येथील तलावाचें पाणी वापरण्यास म्युनिसिपालिटीनें सदय अंतःकरणानें परवानगी दिली यामुळें धुण्यास पाणी मिळूं लागलें. परंतु कित्येक अनीतिमान लोक स्त्रिया धूत असतां अगदीं लहान वस्त्र नेसून स्त्रियांच्या दृष्टीसमोर पाण्यांत उड्या मारतात व आपल्या नग्न अंगाचा भाग स्त्री जनाच्या दृष्टीस पाडतात. ह्या शिवाय लहान लहान मुलांच्या झुंडीच्या झुंडी तळावांत पोहण्याकरितां जातात ह्या पासून मुलांच्या जिवास धक्का बसण्याचा संभव आहे. तलावांत शेवाळ सर्प वगैरे असल्यामुळें भीति आहे. करितां म्युनिसिपालिटीनें इकडे लक्ष देऊन सदरहु गोष्टीचा बंदोबस्त करावा. कळावें.

आपला

'क्ष'

## नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें. ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट२०कलम६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १९ मि. नंबर $\frac{६}{१८९२}$

स्पेशल अ० कमिशनर साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत

नांव बद्रीनाथ बालमुकुंद मारवाडी अ० पालन करणार आई रुखमाबाई जवजे बालमुकुंद राहणार कुरणखेड तालुके अकोला जिल्हा अकोला यांस मयत.

बालमुकुंद बापाचे नांव रामलाल मारवाडी राहणार कुरणखेड ता. अकोला जि. अकोला याचें कर्ज वसुल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार याणे अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहु मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्याणी ता.१८ माहे जून सन १८९२ इ. रोजीं सदरहु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आप आपले हक्का विसी लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ३० माहे एप्रील सन १८९२ इ०

V. N. Dandekar.

सिक्का. सही ज्यज.

## वर्तमानसार

आमचे मांडलिक राजे, रईस, संस्थानिक जहागीरदार, इनामदार, दुमाळदार, मोकासदार, पेन्शनदार, वगैरे आपल्या पिठावर रांगोळ्या काढणारे लोक व त्यांची मुलेंही आपल्या कुळाला, अब्रूला, हिताला व प्रसंगविशेषीं मनुष्यत्वालाही लाथ मारून असे कांहीं दुराचार करतात कीं त्यानें आमच्या सारख्यांना उगीच दुःख होतें. जिवाचा व्यर्थ तळतळाट होतो. रंडीबाजी, दारुखोरी, जुव्वा, गुंडेशाई व जे कांहीं आपल्याला बुडवून घेण्याचे उपाय असतील ते उपाय—या सर्व गोष्टी जणूं बाळकडूच होत असें समजून ही मंडळी एक ना एक व्यसनांत मग्न आहेत. ही शोचनीय स्थिती बदलण्यास कांहीं उपाय आहे काय? आह्मांस तर समूळ तळपट झाल्या वांचून या मंडळीचे डोळे उघडणार नाहींत असें वाटतें. पण दारिद्र्यांजनानें डोळे उघडून मग बघायाचें काय? ही स्थिती चांगली काय? आमची ही नाडी मंडळी या गोष्टीकडे लक्ष देतील काय? हे विचार सुचण्यास आमचे भोरचे पंतसचिव यांचे विरुद्ध त्यांच्या संस्थानांतील इनामदार व रय्यत लोकांनीं इंग्रज सरकाराकडे अर्ज केला आहे हें कारण झालें आहे, संस्थानचा हरीं ( हिरडा ) कोणा इजारदारास सचिवानी मक्त्यानें दिला आहे. त्या इजाऱ्याच्या काय शर्ती आहेत हें प्रसिद्ध झालें नाहीं. पण त्या अर्जावरून असें दिसतें कीं त्या मक्तेदाराची तरफदारी करून सचिव साहेब किंवा त्यांचे हस्तक प्रजेस गांजीत आहेत व असंतुष्ट करीत आहेत. तर हा प्रकार सचिवांस हितकर आहे काय? ब्रह्मदेश इंग्रजांचे हातीं येण्याला प्रारंभीचें कारण हा लांकडांचा इजाराच नव्हे काय? हा हिरडा आमचे श्रीमंत सचिवांस रेचक न होवो एवढी आमची इच्छा आहे. पण हे बडे लोक चांगले बोलाकडे लक्ष देतील काय?

देशसेवक.

पुण्यांत महाडचे ज्योतिषी, रा. रा. बाबाजी काशिनाथ पटवर्धन हे आले होते व त्यांनीं पुण्यांतील लोकांची व मुख्यत्वेंकरून सुधारक ह्मणविणारांची फलज्योतिष खरें असल्याबद्दल खात्री करून दिली हें आह्मी तर काय, पण जुन्या गोष्टीचें नांव घेतलें कीं फुटाण्या सारख्या उडणाऱ्या सुधारक मताच्या पत्रांनीं देखील कबूल केलें आहे. रा. बाबाजीरावांनीं फलज्योतिषाचें माप प्रत्येकाच्या पदरांत घातल्यामुळें त्या सुधारक मंडळीस फलज्योतिष खरें आहे असें ह्मटल्या वांचून गत्यंतरच राहिलें नाहीं. रा० पटवर्धन यांच्या ह्या अनुभविक ज्ञानानें जरी फलज्योतिष खरें आहे असें आह्मी ह्मणतों तरी एवढ्यावरून आमची सामाजिक किंवा धार्मिक मतें पूर्वीपेक्षां निराळीं होतील असें कोणी समजूं नये असा शेरा सदर्हू सुधारक पत्रांनीं मारला आहे!

पु. वै.

बोस्टन येथील यंग मेन्स असोसिएशननें एक पुस्तकालय उघडण्याचा समारंभ केला. मि. जॉर्ज डब्ल्यू केबल यांना व्याख्यान देण्याकरितां बोलाविलें होतें. त्या समारंभाचे वेळीं, आमंत्रणचिठ्या किंवा टिकिटें नव्हतीं; तर जो एक पुस्तक आणून देईल त्याला आंत घ्यावयाचें. याप्रमाणें पुस्तकालयांतील पुष्कळ कपाटें भरून गेलीं.

जमिनीच्या पृष्ठभागावरच प्राणी आहेत; परंतु पाण्याच्या पृष्ठभागावर आहेत इतकेंच नाहीं, तर अतिशय खोल भागांतही फार प्राणी आहेत. कांहीं कांहीं ठिकाणीं इतके असंख्यात प्राणी आहेत कीं, सर्व, पाणी जीवमय आहेसें भासूं लागतें. स्कोअर्सबी नांवाच्या एका गृहस्थानें असें काढलें आहे कीं, दोन चौरस मैलांत २८,८८८,०००,०००,००० ००० प्राणी असतात. ह्या प्रमाणावरून पहातां जगांतील सर्व, जलचर प्राण्यांची गणती करण्या करितां जगाच्या आरंभापासून आतांपर्यंत ८०,००० लोक ठेवले पाहिजे होते. ते, आणखी असेंही ह्मणतात कीं, पाण्याच्या एका थेंबांत ३६,००० अति सूक्ष्म जंतु आहेत. पाण्याच्या अति प्रचंड संचयांत कांहीं कांहीं भाग जंतुविरहित असतील; परंतु अशीं ठिकाणें फारच थोडीं. इतर प्राण्यांच्या ठिकाणापेक्षां समुद्र प्राण्यांचें आगर आहे, व त्यांत असणाऱ्या अगणित प्राण्यांवरून पाहतां पाण्याचा एक थेंब ह्मणजे एक लहानसें जगच आहे. असें कबूल करणें भाग पडतें.

विलक्षण वासरूं—हेवुड येथील एका शेतकऱ्याच्या गाईला एक वासरू झालें त्याला दोन डोकीं, तीन डोळे चार नागपुड्या, दोन तोंडें व दोन जिभा आहेत. वासरूं चांगलें लठ्ठ आहे. दोनही तोंडांनीं दूध पितें व तिनही डोळ्यांनीं पाहतें.

जन्म व मृत्यु दिवसा होतात त्या पेक्षां रात्रीं अधिक होतात.

करमणूक.

नव्याचशा लहान लहान म्युनिसिपालिट्यांनीं एकत्र जमून मध्यभागीं कोठें तरी पाट बंधाऱ्याचें काम करावयाचें आणि त्याचें पाणी त्या सर्वांनां सारखे सारखे खर्चानें वाटून घ्यावयाचें, अशी एक कल्पना बंगाल्यांत निघाली असून त्याची प्रचीति लवकरच पाहण्यांत येणार आहे.

पुजाऱ्यांचा उठावा—ह्मैसुरांतील देवांच्या पुजाऱ्यांस यापुढें देवळांत राहूं देऊं नये असा ह्मैसूर सरकारनें हुकूम केला आहे.

सत्यशोधक.

पिनलकोडांत जीं सरकार विरुद्ध गुन्ह्यांचीं कलमें घातलीं आहेत त्यांच्या व्यापकपणावरून आणि कडकपणावरून साहजिक अनुमान इतकेंच निघतें कीं, आपण परमेश्वराला स्मरून हिंदुस्थानच्या रयतेला न्यायानें वागवीत नाहीं ही गोष्ट इंग्रज राज्यकर्त्यांच्या मनाला अस्वस्थ करते. परंतु अशा स्थितींत देखील आह्मी सरकारला खात्रीनें सांगतों कीं, निखालस अंतकाळ समीप येईपर्यंत हिंदुस्थानच्या मेंग्या प्रजेची स्वामिभक्ती ढळणार नाहीं. ह्मणून प्रस्तुतपेक्षां ज्यास्त सरळ रीतीनें या प्रजेला वागविण्यापासून इंग्रजांच्या मुख्य हेतुला तिळभरही भीति नाहीं.

मणिपूरच्या दुर्दैवी राजांच्या राण्या व मुलें यांना फक्त त्यांच्या अंगावरील एकेक वस्त्रानिशीं सिल्हट येथें नदीकिनाऱ्या पासून बरेंच लांब पायीं चालवीत नेऊन तिथें एका देवळांत जोग्यासारखें ठेविलें आहे व त्यांना दरमाणसीं ३ । ३ रुपये पोटगी देण्याचें ठराविलें आहे! अशा रीतीनें त्या राजकुळींनांना वागविण्यापेक्षां एकदम त्यांची कत्तल कां नाहीं केली?

क० त०

पतिद्रोह— जारकर्मीला प्रवृत्त होऊन घर बुडवण्यास तयार झालेल्या बायकोचा खुन केल्याबद्दल नवऱ्याला सरकार देहांत शासन करतें. पण प्रजेनें राजद्रोह केला कीं तिला तोफेचे तोंडीं भडाभड उडाविण्याला मागें पुढें पहात नाहीं. कुमार्गवर्ती प्रजा आपल्या राजाचें राज्य बुडवते आणि स्त्री आपल्या पतीचें घर बुडवते. पतीनें स्त्रीवध केला कीं त्यास फांशीची शिक्षा आणि राष्ट्राधिपति अगणित मनुष्यांचा वध करून पुन्हा आपले मोकळेंच. याचा न्याय करणारा जगांत कधीं कोण मिळेल तो मिळो!!

सद्धर्मदीप.

पुण्यास एका मराठ्यांच्या लग्नांत वरानें कट्यार शोभे साठीं वापरली ह्मणून मॅजिस्ट्रेटानें त्यास पांच रुपये दंड केला. लग्नाच्यावेळीं नवऱ्या मुलाच्या हातांत कट्यार पाहिजे कां? त्यांचे आजे पणजे मोठे शूर व लढवये असतील व त्या मुळें ते क्षत्रियही असतील आणि क्षत्रिय विवाहांत तसा विधी सांगितलाही असेल पण त्याचा आज काय उपयोग? त्या शूर व लढवया आज्या पणजांची पोरें आज हमाल व भिस्ती बनली आहेत तर त्यांनीं ती क्षात्रविवाह पद्धती सोडून हमाल भिस्ती पद्धती सुरू करावयास नको काय? त्या क्षत्रिय ह्मणविणाऱ्या वृद्धांची पोरें आज जर परकीय लोकांच्या लाथाबुक्या खातें असून त्यांच्या वृद्ध माता बहिणी आस्वल समजून परकियांच्या हातून मारल्या जात आहेत तर ती क्षात्रलग्नपद्धति आज कशास पाहिजे? जंगलांतल्या उम्बराच्या झाडाच्या मूठभर समिधा आणणाऱ्या एका कर्मठ ब्राह्मणावर जर खटला होतो, घाणेरें झालेलें मीठ स्वच्छ करणाऱ्या बायांस जर शिक्षा होतें तर लढाईच्या सामानांत येणारी जी कट्यार ती बाळगणारास कां शिक्षा होऊं नये?

कुच्च नांवाच्या बेटांत आलीकडे अतीशय राकेल तेल जाऊं लागलें हें पाहतांच तेथील कारभाऱ्यांनीं असा एक जाहीरनामा प्रसिद्ध केला कीं, आमच्या राज्यांत कोणी ही राकेल तेल वापरूं नये. असा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत कारभाऱ्यांचे दोन हेतू आहेत. पहिला या तेलापासून होणारे वाईट परिणाम बंद व्हावेत आणि या तेलामुळें राज्यांतील धान्याचें तेल निघण्याचें बंद झालें तो धंदा पुनः सुरू व्हावा. हें दोन्ही हेतु फार उत्तम असून त्याबद्दल ते कारभारी प्रशंसेस पात्र आहेत.

१८०९ सालचा दारू अबकारीचा एक पट्टा आहे – त्याकडे पाहिलें ह्मणजे त्या संबंधानेंही आज विलक्षण फेरफार झाला आहे असें दिसून येते. त्यावेळीं दारूची भट्टी लावणारांस सरकारांस दर भट्टीच्या मागें दररोज फक्त ८४ आणे द्यावे लागत असत. आज भट्टीचा व्यापार मुळींच बंद करून टाकण्यांत आला आहे हिंदुस्थानच्या लोकांस छाकटे बनवून मग त्यांचे खिसे रिकामे करून घेण्याचा आज जो प्रकार चालू आहे तो त्यावेळीं नव्हता असें या पट्ट्यावरून दिसते. त्या पट्ट्याचें ५ वें कलम असें आहे कीं, 'जशा प्रकारची दारू प्याल्यानें माणूस छाकटा होईल तशा प्रकारची व तितकी दारू मी कोणासही देणार नाहीं आणि लोक छाकटे होऊन अव्यवस्थित होणार नाहींत. अशाबद्दल माझ्यानें घेववेल तितकी मी खबरदारी घेईन.' एकंदरीनें त्यावेळच्या व हल्लीच्या कारभारांत बराच फरक झालेला असून तो फरक सौम्यतेचा नसून मनगटाच्या जोराचा दिसतो

ठा० अ०

कोणत्याही साध्या शाईत स्थलांतर करण्याचा धर्म (ट्रान्सफर) आणण्याची आपली इच्छा असल्यास तींत साखर मिसळावी ह्मणजे झालें हा साधा उपाय आहे.

हुन्नरोत्तेजक.

अनुभवावरून असें कळून आलेलें आहे कीं, जर एखाद्या पाण्याच्या डबक्यांत डुकराचें मूत्र गेलें तर त्या डबक्यांतील मासे ताबडतोब मरतात. ही गोष्ट जर खरी असेल तर असें होण्याचें कारण पाहिलें पाहिजे. याचें कारण एवढेंच असावें कीं, त्या मूत्रांत सल्फुरेटेड हैड्रोजन उत्पन्न होतो; व दुसरे कांहीं विषारी वायुही उत्पन्न होतात.

विंचवाच्या दंशावर— कापशीचा पाला व मोहऱ्या एकत्र वाटून लेप द्यावा. किंवा कापशीचें मूळ रविवारीं काढून ठेवावें तें चावून खाल्ले असतां विष उतरतें.

कापूर सर्व ज्वराबर चालतो असें एका इंग्रज वैद्याचें मत आहे. कापूराच्या पाण्यांत झाडाचें बीं भिजवून ठेविलें असतां कितीही दिवसांनीं बाहेर काढलें तरी तें जमिनींत घातल्याबरोबर उगवतें.

शेतकरी.

डाळिंब हें फळ खाण्यास रुचिदायक व शरिरास हितकारक असें आहे. याच्या योगानें शरिरास हुशारी येऊन तृषा शमते. हें फळ खाण्यासही देण्यास हरकत नाहीं. या झाडाचीं मुळें, पानें, साल, फुलें व फळांची साल हीं सर्व औषधास उपयोगीं पडतात. डाळिंबाच्या रसाचा उत्तम पाक होतो; त्यास डाळिंबपाक ह्मणतात. डाळिंबाचा रस पित्तशामक आहे. डाळिंब तुरट, आंबट, मधुर, तृप्तिकारक, स्निग्ध, दीपनग्राहि, हृद्य, उष्ण, रुचिकर, लघु, अग्निदीपक; व कफ, खोकला, श्रम, मुखरोग कंठरोग व पित्त यांचा नाश करितें.

आर्यभिषक्.

## अकोला बाजारभाव.

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | १००= |
| ,, १५ दिवसाच्या मुदतीची | | | ९९॥–॥ |
| सुवर्ण २५ रुपे | १०८॥ | आळशी | ९९ |
| गहूं काठे | ७२॥ | बनशी | ७७॥ |
| जवारी | ४९ | सर्की | ६ |
| कापूस | ३७ | रुई | १२ |
| मीठ ३॥ तूप ९॥ | | तेल | ५॥ |

सट्ट्याचे भाव. ( मोंगलाई )

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | बसंत | १९४९ | ४६॥– |
| गहूं | वैशाख शुद्ध | १९४९ | ६६।– |
| आळशी | चैत्र शुद्ध | १९४९ | ८६॥ |
| सर्की | वैशाख नवे सालची | १९४९ | ५।– |
| रुई | फाल्गुन | १९४९ | ५५। |

गु० ब०

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराची किंमत
वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०८
साळअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास ....................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

SUBSCRIPTION
Rs.
annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs· 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy....................................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 30 MAY 1892 NO 21

वर्ष २६ सोमवार तारीख ३० माहे मे सन १८९२ इ० अंक २१

## जाहिरात.

अकोलें येथील कैलासवासी गंगाधर जोरावरमल साहू यांनीं मरणापूर्वीं रा. रा. लखमीचंद जैनारायण व रामदेव लालचंद याजला धर्मार्थ कामें करण्यास सांगितलीं होतीं तीं खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१ श्री लक्ष्मी नारायणाचें मंदीर तयार करून त्यां देवतेची स्थापना करावी.

२ श्री राजेश्वर महाराजाचें संस्थाना मागें विठोबा शंकर नाईकवाडी याची जागा आहे. तिजबद्दल गहाणखत दुकानांत आहे तो दस्तऐवज देवास आर्पण करावा व चिरकाल चववढा चालवावा त्याचे खर्चा करितां मौजे हिंगन तर्फे म्हैसपूर येथील जमीन देवाचें नांवावर लावून द्यावी.

३ शिव चरण बोवाचे देवळाचें काम पुरें करून सभोंवतीं पाठशाळा बांधून सदरील देवळांतच गोपाल कृष्णाची व पादुकेची स्थापना करावी.

४ अकोलें येथील स्मशाभुमींत एक मकान मनुष्य बसण्यास व एक मुडदे जाळण्यास बांधून द्यावें.

५ मोरणा नदीचें किनाऱ्यास एक घांट बांधून द्यावा.

६ यज्ञ करावा.

७ लक्ष्मण बाबा रामदासी संस्थान ताजनापेठ याजकडेस खात्यांत बाकी आहे ती त्यास अर्पण करून खात्यांत खर्चीं लिहावी.

८ ताजना पेठेंतील दुकाना २ रामप्रतापचे दुकाना जवळील पूर्वेकडील त्याचे मंदी १ करून त्यांत श्री महाविष्णुचें तुळशीशीं लग्न लावून स्थापना करावी.

येणें प्रमाणें लक्ष्मी नारायणाचें देऊळ तयार झालें परंतु मूर्ती स्थापना होणें आहे ती होईलच.

२ श्री राजेश्वर महाराजाचें दरबारीं चौघडा मित्ती वैशाख शुद्ध १ पासून सुरूं झाला आहे. व त्याचे खर्चा प्रीत्यर्थ मौजे हिंगन येथील जमिनीचें खातें राजेश्वर महादेवाचे नांवें करून दिलें व त्याची वहिवाट जानकीदास गंगाधर याजकडेस ठेवली आहे शेताचें उत्पन्नांतुन खर्च न भागल्यास शेटजींनीं आपले जवळून करावा व त्यांत कांहीं शिलक राहिल्यास त्याजवर शेटजीची मालकी आहे.

३ शिवचरण बोवाचे सस्थानचें काम जारी आहे.

४ लक्ष्मण सखाराम बावा रामदासी संस्थान ताजनापेठ याजकडेस बाकी होती ती खर्च खातें लिहून खातें चुकतें केलें.

येणें प्रमाणें व्यवस्था उभयतां शेटजीनीं केली व पुढें हीं राहिलेलीं कामें त्यांचे हातून पूर्ण दशेस पावतील अशी उमेद आहे परमेश्वर कृपेनें कैलासवासी गंगाधरशेट यांचे मनोरथ पूर्ण होतील असें वाटतें.

( सही )
जयराम बळवंत तळेकर.
दस्तूर खुद्द.

---

नोटिस

किसन लाल वल्लद धनुलाल खत्री रहाणार खामगांव जलालपुरा. यांस नोटीस देणार शामलाल बनसीलाल खत्री राहणार मनारखेड तालुके बाळापूर नोटिशीनें असें कळवितो कीं, तुमची मुलगी नामें जीऊ ही आमची बायको. इजला तुह्मी माहेरपणा करितां १५ पंधरा दिवसांचे करारानें घेऊन गेला त्यांस आज अदमासे अडीच महिने झाले. ह्या अवकाशांत आह्मी स्वतः दोन तीन वेळा तिजला आणण्या करितां आलो होतो परतु तुह्मी आजन्म पाठवीत नाहीं वगैरे बऱ्याच गोष्टी सांगितल्या याजमुळें तुह्मांस नोटिशीनें कळविलें जातें कीं नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांत बायकोस आणून घरीं पोंहोंचती करावी. असें झालें नाहींतर रीतो प्रमाणें बायको ताब्यांत घेण्याबद्दल काम चालविलें जाईल व अखेर निकाल होईपर्यंत व ह्या नोटिसीचा खर्च वगैरे सर्व भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस तारीख २६ माहे मे सन १८९२ इसवी.

( सही )
शामलाल बनसीलाल खत्री.
दस्तुर खुद्द.

---

## भाग १.

१—- रकम ( अ ) ( ब ) व ( क ) अन्वयें नियम खालील बाबतींत—

(१) तालुका बोर्डाचे निवडक मेंबर्स निवडण्याकरितां निवड करणारे मंडळीची रचना आणि ह्या बोर्डाच्या व जिल्हा बोर्डाच्या निवडक मेंबराची निवडकरण्याच्या वेळेबद्दल व रीती बद्दल.

( २ )तालुक बोर्डाच्या मेंबरांची नेमणूक व जिल्हा बोर्डाच्या मेंबरांची नेमणूक.

( ३ ) तालुक बोर्डाच्या व जिल्हा बोर्डाच्या मेंबरांच्या हुद्याची मुदत.

तालुके बोर्डास.—१. तालुके बोर्डांत मेंबरांची जी संख्या रहाण्याची ती रेसिडेंट साहेब वेळोंवेळीं ठरवितील त्या प्रमाणें राहील. प्रथमतः त्यांत १८ मेंबर्स रहातील त्यां पैकीं ६ पेक्षां जास्त नाहीं असें कमिशनर नेमतील व बाकीचे यापुढें सांगितलेले रीती प्रमाणें निवडले जातील.

मेंबरांची लायकी.— २. खालीं लिहिलेले लोक तालुक बोर्डाचे मेंबर ह्मणून निवडले जाण्यास योग्य होत.

(१) कोणताही पुरुष जो दर वर्षास चार रुपये किंवा अधिक टाऊन ट्याक्स देत असेल तो.

(२) पेढी किंवा सार्वजनिक कंपनी जी १० रुपये किंवा अधिक टाऊन ट्याक्स देत असेल तिचा गुमास्ता किंवा वहिवाटदार.

(३) तालुक्यांत नेहमीं रहाणारा कोणताही पुरुष ज्या जवळ त्याच तालुक्यांत रुपये १०० पेक्षा जास्त सारा देणारी जमीन असेल तो.

(४) कोणताही पुरुष ज्याजकडे त्याजकडे त्या तालुक्यांत इनाम किंवा जहगीर आहे, व जिचा सारा ती खलसा असती तर दर वर्षास रुपये १०० पेक्षां जास्त असतो.

( ५ ) स्पेशियल माजिस्त्रेट, व मुलकी आणि पोलीस पाटील ज्यांना तालुक्यांत अधिकार आहे तें. आणि

(६) तालुक्यांत रहाणारे देशमुख व देशपांडे यांचे घरांतील इसम.

परंतु पुढें सागितलेले लोक निवडणूकीस योग्य नाहींत.

( अ ) ज्याचे वय २१ वर्षा पेक्षां कमी आहे.

( ब ) ज्यांस सरकारी नोकरींतून वाईट वर्तनामुळें बरतर्फ केलें आहे.

(क) ज्यास कैदेची अशी शिक्षा झाली असेल कीं तेणेंकरून त्यास वऱ्हाडच्या रुरल बोर्डस कायद्याचे कलम ९ वरून बरतर्फ करतां येईल असें डिपोटी कमिशनर यास वाटेल.

(ड) जो बोर्डाचा नोकर किंवा कारकून असेल.

[ ई ] ज्याचा बोर्डाशीं किंवा बोर्डाच्या तर्फेनें केलेल्या कोणतेही करारांत किंवा कामांत हिस्सा किंवा हितसंबंध साक्षात् किंवा पर्यायानें असेल.

[ फ ] जी स्त्री आहे.

(ग) जो वेडा आहे किंवा बरा न होणाऱ्या रोगानें पीडित आहे.

आणखी अशी शर्त आहे कीं रकम (२) यांत सांगितलेली पेढी किंवा सार्वजनिक कंपनी पैकीं एका इसमापेक्षां अधिक एके वेळीं बोर्डांत रहाणार नाहींत. अशा पेढीच्या किंवा कंपनीच्या एका पेक्षां अधिक इसमांची निवड झाल्यास ज्यास मताची जास्त संख्या मिळाली असेल तोच मात्र योग्य समजला जाईल.

मत देणाराची लायकी—

३. मत देणारे लोकांत सर्व पुरुष जे अज्ञान किंवा वेडे नाहींत व जे तालुक्याच्या टाऊन फंडास दर वर्षी चार रुपयां पेक्षां कमी नाहीं इतके रुपये देतात त्यांचा व सर्व पुरुष जे अज्ञान किंवा वेडे नाहींत व जे तालुक्याच्या जागल्या व लोकल सेसास दर वर्षी ४ रुपयांपेक्षां कमी नाहीं इतके रुपये देतात त्यांचा समावेश होतो. प्रत्येक लोकांनीं जी निवड करण्याची ती निरनिराळे दिवशीं किंवा एकाच दिवशीं निरनिराळे वेळीं सोयी प्रमाणें करावी.

ज्या इतर लोकांस मत देण्याचा अधिकार आहे ते.—

४. तालुके बोर्डाचे मेंबराचे निवडणुकीचे कामांत मत देण्याचा हक्क ज्या लोकांसही आहे व जे नियम ३ अन्वयें लायक ठरलेले नाहींत ते—

(अ) तालुक्यांत अधिकार असणारे स्पेशल माजिस्त्रेट.

(ब) तालुक्यांत अधिकार असणारे मुलकी व पोलीस पाटील, व वतनदार पटवारी आणि

(क) देशमुख व देशपांडे घराण्यांतील मुख्य पुरुष, परंतु मुख्य पुरुष अज्ञान किंवा वेडा किंवा स्त्री असेल तर त्याचे नंतर जो मुख्य पुरुष असेल त्यानें मत द्यावें.

मत देण्यास लायक ठरलेल्या लोकांच्या यादी तयार करणें व त्या दुरुस्त करणें.—

५ तालुक्यांतील मत देण्यास लायक ठरलेल्या लोकांची यादी प्रत्येक तहशिलींत तयार करावी. व ठेवावी. व वेळोवेळीं ती तपासावी. व तिच्या खरेपणा बद्दल तहशिलदार जबाबदार रहातील. ही यादी तयार झाल्यावर तिची एक नक्कल लोकांना दिसेल अशा ठिकाणीं तहशिलीचे पडवींत एका फळीला लावून टांगून ठेवावी.

६. तालुक्याच्या यादी वरून जिल्ह्याचे डेपुटी कमिशनरानें जिल्ह्यांतील मत देण्यास लायक ठरलेले लोकांची एक यादी तयार करावी. आणि नंतर ती यादी अंमलांत येईल. व ती ज्या तारखेस केली त्या तारखे पासून तीन वर्षेपर्यंत अमलांत राहील. परंतु डेपटी कमि. यांस योग्य दिसेल तर एखादा अर्ज आल्यावर मत देण्यास लायक ठरलेल्या एखाद्या इसमाचें नांव यादींत दाखल करतां येत.

नालायक इसमांचीं नांवें मत देणारांचे यादींतून काढून टाकणें.—

७. जो इसम ३ व ४ च्या अर्थाप्रमाणें लायक राहिला नसेल किंवा ज्याजवर असे गुन्ह्याची शाबिती झाली असेल किंवा जो एखादे न्यायाचे प्रकणांत असे हुकूमास पात्र झाला असेल कीं तेणेंकरून दिपुटी कमिशनर यांचें मतें नालायक झाला असेल, त्यांचे नांव निवडणूक करणाराचे यादींतून काढण्या करितां कमिशनर यांची पूर्वी मंजुरात घेऊन जिल्ह्याचे दिपुटी कमिशनर यांस वेळोंवेळीं हुकूम करण्याचा अधिकार आहे.

तालुक बोर्डाच्या मेंबराच्या जागेची मुदत.—

८. तालुक बोर्डाच्या प्रत्येक मेंबरास ज्या तारखेस तो मेंबर झाला असेल त्या तारखे पासून तीन वर्षांच्या अखेरीस जागा खालीं

केली पाहिजे परंतु त्याचे जागीं दुसऱ्या सभाची निवड किंवा नेमणूक होई पर्यंत व तो रेसिडेंट साहेब कायम करी पर्यंत त्यानें आपले जागेंच काम करण्याचें चालूं ठेवावें.

खालीं झालेली जागा कशी भरावी:—

९. मागील नियमाअन्वयें एकादी जागा खाली झाल्यावर किंवा कांहीं काळ पर्यंत खाली झालेल्या जागेवर (कलम १० रुरल बोर्डस् लॉ) जर गेलेला मेंबर निवडलेला असेल तर डेपुटी कमिशनरांनीं या पुढें सांगितल्याप्रमाणें निवडणुक करण्याचें काम चालूं करावें. जर गेलेलो मेंबर नेमलेला मेंबर असेल तर डेपुटी कमिशनरांनीं त्याबद्दल कमिशनरकडे रिपोर्ट करावा. व ते एखाद्या नवीन मेंबराच्या नेमणुकी करितां जी तजवीज करणें जरूर असेल ती करतील.

निवडीची नोटिसः—

१०. निवड करण्याचें काम कोणत्या तारखेस कोणत्या ठिकाणी व कोणत्या वेळीं चालविण्याचें त्याबद्दलची निवड करणारास तीस दिवसांची नोटीस दिली जाईल.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख जेष्ट शुद्ध ९ शके १८१४

हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिती सुधारण्याकडे ज्याचें त्याचें मन वेधलें आहे आणि अनेक लोक आपापल्या अनुभवाप्रमाणें निरनिराळे उपाय सांगत आहेत. कोणी ह्मणतात द्वीपांतरीं जाऊन वसाहती कराव्या, कोणी ह्मणतात कीं हिंदुस्थानची शेती सुधारावी, व कित्येक ह्मणतात कीं, हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत संयुक्त भांडवलें उभारून देशी कारखाने सुरू करावे, आणि देशाच्या गरजा बहुतेक सर्व देशांतल्या कारखान्यावर भागल्या जाव्या. वरील तिन्ही प्रकारच्या दिशांनीं लोकांचें चलन वलन सुरू होईल तेव्हांच राष्ट्राची उन्नति होण्यास प्रारंभ होईल. जीं जीं राष्ट्रें धनाढ्य व वैभवशाली बनलीं आहेत त्यांच्या इतिहासावरून पहातां वरील तिन्ही दिशा त्या राष्ट्रांतील लोकांनीं स्वीकारल्या आहेत असें दिसून येईल. कोणत्याही एकाच दिशेचें अवलंबन केल्यानें इष्टहेतु साधण्यासारखा नाहीं. वरील तिन्ही विचार सारख्याच महत्वाचे असून सर्वांनीं त्याप्रमाणें वागण्यास लागलें पाहिजे. ज्या देशांची सांपत्तिक स्थिती निकृष्ट प्रतीची आहे तो देश धनसंपन्न होण्यास वरील तिन्ही कारणांचा योग घडून यावा लागतो. सांपत्तिक उन्नतीचा संबंध असा कांहीं विलक्षण आहे कीं, राजकीय, सामाजिक व नैतिक वगैरे सर्व प्रकारच्या उन्नति सांपत्तिक सुधारणे समवेत होत असतात. प्रत्यहीं आपल्या अनुभवांतली गोष्ट आहे कीं जो कोणी दोन पैसे बाळगून असतो तो बऱ्याच अंशीं स्पष्टवक्ता, स्वतंत्र विचाराचा, स्वकार्यावलंबी असून त्याची चारचौघांत मान मान्यता असते. त्याला दुसऱ्याचे तोंडाकडे पहावें लागत नसल्यामुळें त्याचे अंगीं बरेच चांगले गुण वसत असतात आणि या गोष्टी ज्या संयोगामुळें त्याचा सरकार दरबारीं रबाब रहातो, त्याच्या शद्बाला चारचौघांत मान मिळतो, आणि त्याचे संन्निध असणाऱ्या लोकांस उद्योग धंद्याला लावून त्याला दुसऱ्याचा व आपलाही फायदा साधून घेतां येतो. ही गोष्ट व्यक्ती संबंधानें जशी खरी आहे तशीच व्यक्तिसमुच्चय दर्शक राष्टांसंबंधानें ही खरी आहे.

देशाची संपत्ति वाढली ह्मणजे सर्व गोष्टी कांहीं सुलभ होतात. राष्ट्रीयसभा एका प्रकारें वृथा अवडंबर आहे असा कित्येक विद्वान् गृहस्थांचा आक्षेप आहे. त्यांत त्यांचें ह्मणण्याचें इंगित हेंच कीं लोकांनीं सरकारपाशीं निवळ विनवण्या केल्यानें लोकांचें पाऊल राजकीय प्रकरणांत कालत्रयीं पुढें पडणार नाहीं. देशाची सांपत्तिक स्थिती सुधारली आणि सरकारासंबंधानें आपलें वर्तन राजनिष्टेचें पण पूर्ण स्वतंत्र विचाराचें होऊं लागलें. आणि सरकारचे ठायीं अनासक्ति व स्वोद्योगतत्परता हीं दिसून येऊं लागलीं ह्मणजे सरकार आपणच होऊन आमच्या मागण्या कबूल करील आणि राज्याच्या चिरस्थायीपणा साठीं सरकारला स्वार्थावरील काकदृष्टि बाजूस ठेवून प्रजेच्या कल्याणाकडे लक्ष देणें विशेष प्रकारें भाग पडेल. या ह्मणण्यांत बराच ग्राह्यांश आहे तरी त्यांत इतर सभोंवतालच्या गोष्टींकडे नीटसें अवधान ठेविलेलें नाहीं. इंग्रजीं खालीं शें दीडशें वर्षांच्या सतत वागण्यानें आह्मी हिंदुस्थानचे लोक इतके परतंत्र व व्यापार शून्य बनलों आहों कीं सरकारच्या कृपेशिवाय आमचे चलनवलनादि व्यापार काडीमात्र चालूं शकणार नाहींत. आमची हालचाल बंद झाल्यामुळें देशाची सांपत्तिक स्थिती सुधारण्याचे तिन्ही मार्ग अगदीं निरुपयोगी झाले आहेत, हे मार्ग इतके बुजल्या सारखे झाले आहेत व इतके आड बाजूचे झाले आहेत कीं, सध्यां त्यांच्या खाणाखुणाही आह्मांस पटण्या सारख्या नाहींत. तेव्हां आमची भिस्त सर्व प्रकारें सरकारावर आहे. सरकारनेंच आमचे वाटाडे झाले पाहिजे. पण ही गोष्ट पसंत नसल्यामुळें जों पर्यंत सरकार आपलें कर्तव्यकर्म बजावीत नाहीं तों पर्यंत आमच्या हिंदुस्थान देशाची सांपत्तिक स्थिती सुधारेल अशी आह्मांस फारच थोडी आशा आहे.

---

सन १८९१ सालांत हिंसक श्वापदें व विखारी सर्प यांच्या संहारासाठीं सरकारांतून ज्या ज्या व्यवस्था झाल्या त्या संबंधाच्या हकिकतीचें एक पत्रक रेसिडेन्सींतून आमच्याकडे आलें आहे त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. वाघ, चित्ता बिबळा, लांडगा अस्वल, तरस, सर्प आणि दुसरे हिंसक प्राणी या सर्वांनीं मिळून सालगुदस्ता १७४ मनुष्यें मारलीं. ही संख्या १८९० सालापेक्षां ४३ नें कमी आहे आणि वाघाचा उपद्रव वाढला असून सर्पांचा पुष्कळ कमी आहे. वरील प्राणहारक प्राण्यापासून एकंदर ५१३१ जनावरें मृत्युमुखीं पडलीं पण त्यांत बुलढाणा, वाशिम व वणी येथील, संख्येचें प्रमाण फार मोठें आहे. सुमारें सव्वाशें गुरें मागील वर्षा पेक्षां जास्त बळी पडलीं. ही वाईट गोष्ट होय. बुलढाणे जिल्ह्यांत चित्या वाघांनीं फार उपद्रव दिला आणि या उपद्रवाला लांडग्याचेंही चांगो साह्य मिळालें. बुलढाण्याचे डेपुटी कमिशनर कळवितात कीं, हिंसक श्वापदांचा व सर्पांचा नाश करण्याचे उपाय योजण्यांत लोकांस उत्तेजन व सवडी पुष्कळ दिल्या होत्या त्यावरून प्राणहानि कमी होईल असा अंदाज होता परंतु तो अंदाज प्रत्यक्ष आंकड्यावरून पहातां खोटा ठरतो. असा खोटा अंदाज होण्याचें कारणही कांहीं दाखविण्यांत आलें नाहीं. लांडगा मारून आणणारास सात रुपयांचें बक्षीस दिलें जात असे परंतु अधीक उत्तेजन यावें व लांडगे कमी व्हावें ह्मणून हें बक्षीस दर लांडग्यामागें १० रुपयांचें केलें होतें. आणि तसें करण्यामुळें सर्व वर्षांत ३१ गुरें काळरूपी पशूंच्या जबड्यांत कमी पडलीं असें दिसतें. हत्याराच्या कायद्या अन्वयें लोकांस हत्यारांचे परवाने बुलढाणें जिल्ह्यांत मुबलकपणें दिले आहेत असें तेथील डेपुटी कमिशनर लिहितात परंतु एकंदर परवान्यांची संख्या पुष्कळ कमी आहे तेव्हां लोकांना परवाने काढून बंदूक व शस्त्रें वगैरे वापरण्याची हौस अगर गरज नसावी किंवा डेपुटी कमिशनराकडून तितके मोकळ्या व सढळ रीतीनें परवाने दिले जात नसावेत. कमिशनर साहेबांनीं आपला अभिप्राय नमूद केला आहे कीं सर्पांवर कोणाचें कांहीं चालत नाहीं तरी नेटीव लोक फार, करून बेफिकीर असल्यामुळें श्वापदें ही सर्पांप्रमाणें यथेष्ट मनुष्यें व गुरें यांचे बळी घेत असतात. नेटिव लोकांपैकीं ज्या कांहीं जणास बंदुकीचा उपयोग करितां येतो ते बहुतेक शिकार हरणा सारख्या निरुपद्रवी प्राण्यांची करितात आणि शिकारीच्या मांसावर व कातड्यावर ते खुष असतात. वाघ किंवा लांडगा यांच्या ते कधीं वाटेला जात नाहींत आणि ही जिवावरच्या धोक्याची शिकार फक्त साहेब लोकच करूं जाणतात.

हिंसक पशूंस मारणाऱ्यांस बक्षिसें देण्यांत आलीं त्याबद्दल एकंदर ३६१६ रुपये खर्च झाले असून सर्पांस मारण्या साठीं अवघे रु. १७०१० खर्चले आहेत. ह्या बक्षिसांच्या रकमे विषयीं लिहितांना कमिशनर साहेब ह्मणतात कीं तरसाला मारण्यासाठीं या पुढें बक्षीसें देऊं नये कां कीं तरस हें मित्रें व निरुपद्रवी असून भंग्याचें काम चांगलें करितें त्याची झडप मनुष्य अगर गुरू यांजवर नसते. खेड्यांतील घाणीचा फडशा पाडण्याला तरस फार उपयोगी असून त्याचें भक्ष्य कुत्रेंच काय तें असतें. ह्मणून गेल्या वर्षांत ९६ तरसें सहजीं मारलीं गेलीं तेव्हां तरसाला मारण्याचा नाद सोडून व्याघ्रादि पशूंची लोक खबर घेतील तितकें चांगलें.

जंगलांतून चरणाऱ्या गुरांस सर्पदंश होऊन तीं मरतात त्याला मनुष्याचा कांहीं इलाज नाहीं. परंतु लोकवस्तीच्या शहरांतून व खेड्यापाड्यांतून सर्पदंशानें प्राणहानि होत असते त्यांत मनुष्याच्या गैबीपणानें व हलगरजीपणानें अधीक होत असते. अंधारांत अगर बिळांच्या कानाकोपऱ्यांत बेधडक मनुष्यें वापर ठेवितात आणि कधीं तरी प्रसंगवशात् सर्पदंशानें मरण पावतात आणि अशाच गोष्टी पुष्कळ घडतात. शिवाय पुष्कळ लोक जमिनीवरच अंधारांत निजतात त्यामुळें सर्पदंशाचा उपद्रव मोठा होत असतो. कर्नल मेकंझी साहेब आश्चर्य करितात कीं वरील स्थितीच्या मानानें पुष्कळ लोक मेले पाहिजेत परंतु तसें न होतां थोडेजण मरतात.

सन १८८६ चा हत्यारांचा कायदा वऱ्हाडास लागूं आहे त्या अन्वयें साही जिल्ह्यांत मिळून ३९४० परवाने लोकांस दिले आहेत. अकोला जिल्ह्यांत हत्यारें वापरणारे परवानावाले ११३९ आहेत तरी वाशिम जिल्ह्यांत १३३९ आहेत आणि ही मोठी संख्या गुदस्त साला पेक्षां ९०९ परवान्यांनीं वाढली आहे. उमरावती व बुलढाणा येथील डेपुटी कमिशनरास विचारणी झाली आहे कीं त्यांनीं आपापल्या जिल्ह्यांतील परवान्यांची संख्या फार कमी होण्याचीं कारणें कळवावी. वाशिम जिल्ह्यांत पुष्कळ परवाने दिले आहेत ते लोकांना मोंगलाईंतल्या हद्दींतील हांकेखोर लोकांपासून स्वसंरक्षण करण्यासाठीं दिले आहेत परंतु कामिशनर साहेब ह्मणतात कीं त्यापासून मोठासा फायदा होणार नाहीं कां कीं भित्र्या मनुष्याला शूर योद्धया प्रमाणें सजविला तरी तो लढवय्या क्वचित्‌च निघेल.

नेटीव लोकांस शिकारीचा शोक कितपत असतो व ते शस्त्रास्त्रें वापरण्यास कितपत लायक आहेत या दोन गोष्टी संबंधानें कमिशनर साहेबांनीं काढलेले उद्गार कांहीं खोटे नाहींत तर ते अक्षरशः खरे आहेत. परंतु नेटिवांस असा भागुबाईपणा प्राप्त होण्यास आमचे सरकार बहादुरच कारण आहेत हें हत्याराच्या कायद्या संबंधानें राष्ट्रीय सभेचा अभिप्राय जगजाहिर झाला आहे तो समग्र नीटपणें वाचल्यास आमच्या प्रजाजनांचा भागुबाईपणा आणि राज्यकर्त्यांची समशेरबहादरी या मधील कार्यकारणमाला लक्ष्यांत आल्या वाचून राहणार नाहीं.

---

'नाट्य कथार्णव' नांवाच्या सुप्रसिद्ध मासिक पुस्तकाच्या सहाव्या वर्षाच्या चौथ्या आणि पांचव्या अंकामध्यें दीर्घ कालाची अहेटी लागली होती, परंतु आतां कळविण्यास आनंद वाटतो कीं रा० रा० हरी नारायण गोखले यांनी त्या पुस्तकाची व्यवस्था आपले हातीं घेऊन नाट्य कथार्णवास सतत व अव्याहत भरतीच राहील अशी व्यवस्था केली आहे आणि त्या प्रमाणें या मासिक पुस्तकाचा अंक आह्मांकडे आला आहे त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करून ही नवीन सुव्यवस्था चिरकाल चालो असें इच्छितों. मराठी मध्यें जीं थोडीं मासिक पुस्तकें उत्तम ह्मणून गणलीं आहेत त्यां पैकीं हें एक आहे. तेव्हां अशा मासिक पुस्तकाला चांगला लोकाश्रय मिळेल असें आमचें अनुमान आहे.

---

## The Berar Samachar

MONDAY, MAY 30
1892

To a stranger a sufficiently comprehensive idea of our social condition can be very well given by a careful survey of the various laws that there exist in our important sections of Indian community on points of Family system. Inheritance, Relationship and other questions more or less connected with or dependent on them. We are not to reproducc, here, all the discourses on these topics that are to be found in

our lawbooks. We shall refer only to such of the characteristics of our society as require special attention from our present point of view. The first characteristic of our family is that it is a joint one. There is to be a head in every family whose behests every member is to obey. On his shoulders lies the responsibility of supporting the whole family. For him does work every family member, and for him is acquired property by them. This has had effects good as well as bad: Family members naturally feel affection for one another. This affection becomes stronger and stronger as they remain more and more in harmony with one another. Various members working severally for one, make comfort easily accessible by their division of labour. This system again, relieves man of many cares and anxieties which would otherwise much wear him down. His moments are cheerfully passed there being fewer occasions for the sense of loveliness to distract his mind. Help and encouragement are readily obtainable even when they are least required. These and many other charms this system has. But alas! These very charms turn into agonies when dissensions are set on foot and poverty threatens to yawn. One member falls out, now and then, with another. The head of the family putting up with inconveniences, is tired out dy his constant efforts to bring about reconciliation. Even the head of the family, if he be of a violent temparament, becomes unbearable to the members. Thus then there is displeasure in every way. There is no comfort, no charm, no happiness nothing of the kind.

Again experience teaches us that affection is felt for a man, more or less intensely according as he succeeds or fails to make a comfortable home by amassing a competent fortune in one way or the other.

If such is the case, is it not, advisable to try to give some convenient form to the present system? It is the concern of us all and all must, therefore, fully attend to it. This question forces on our notice more especially when we consider that we are being, day by day, reduced to poverty. The system is inexpedient in one more way. Man, as a rule, does not aspire to self improvement so much when he is forced to work for others as he does when he is working for himself or for those in whom he has special interest. If not to the first reason at least to the second reason it is that we owe the laudable attempts of our Madrasi Educated friends to suggest to the legislative Council of that province the propriety of making some better provision for the protection of self-acquired property. This point we have here introduced to show that our young men have greatly to consider this question.

Again, it is very common among us to pay regards to and feel affections for even remote relations. This tendency of mind is really much desirable. Recognition of kinness produces sympathy and affection.

The present systems of marriage require many modifications. The original intention of connecting two different families is altogether ignored. In stead of keeping the two families in perfect harmony many a time ill-feeling is produced between them. Again there is great aversion shown by people generally to educate women. People are again obstinate in sticking to old ideas. They take much pleasure in marrying children when they are of a very tender age. Parents marry their young children only to derive pleasure for themselve. They never look to the harm they are doing to the couple. Again there are social evils that ought to be removed by the strong will of ourselves. But where such a remedy fails or is not adopted by us law is doing what we ought to do.

In general then our social relations are not very far from being very satisfactory, provided some necessary changes be timely introduced. They are not many and far. They have been recognized and are being gradually introduced. In remote times we hope our further generations will reap advantages from them.

As regards our moral condition if we but take an impartial view of it we cannot but deem it as very much satisfactory. We don't like to contrast it with that of other nations. So far as the main principles of morality go they are the same in one form or the other in all nations. The fact is thus: we commit a mistake when we say that the morality of this country is good and that the morality of that country is bad, We, here, assume that there is some definite and universal standard whereby we can measure the goodness or badness of the different forms of morality. Justice, benevolence, veracity, chastity, faithfulness and such other principles are dictated everywhere— though they may be so indifferent forms and from different considerations.

As to religion we have so much disagreement on the point among ourselves, that it is owing to this fact that we are always in danger of being split up into still more factions. Under the present circumstances if morality were, in some way or other to take the upper hand of religion to become an object of faith and to completely command faith we should have had the happiest time of it. But Since that is hoping against hope it would be to some purpose to bring the weight of different religions on to the side of some great consideration which should inspire awe and reverance in our people.

The present tendency of young men who have drunk of the fountain of western education and who have any considerable right to free thinking is to explode non-religious elements and to bring the residue which is purely religious closer and closer to our heart and understanding. Religion rests on faith and requires no other justification. Whether we clothe our religious sentiments, motives and conviction in one form or the other is a matter of no great moment. Religion has done more than either law or morality would do separately or conjointly to preserve peace and amicable feeling in every quarter. Besides religion, whatever its character, has relieved us of many of the vagaries arising from a sense of disappointment. It has if rightly observed a great tendency to make life on the whole a series greater pleasures and less pains. It is only later interference by some vain domineering spirit that has distorted a little the most pleasant form of real religion.

Again it is true that as scientific inquiries are carried on with proper diligence and accuracy— more and more truths are discovered which gradually tend to shake our confidence in religion in the form in which it is now presented. But this cannot be helped. Truths cannot be disputed to defend lies.

The more the scientific inquiry advances the wider, the deeper and the surer is the conviction regarding the most true and genuine principles of religion. Such and others of a similar nature are the considerations which fill the man's mind when he reads through the Book of nature.

———0———

An eminent lady has very earnestly expressed her views on the position of women in English societies. The picture she has represented will point out the dark side of the manifold attempts that are being done to raise a woman to an equal standing with man. The failure which attends such a change in social topics is an index to the fact that the present generation is not prepared to welcome it. The now stating paras quoted from her essay are upon the influence of women and the probable future of the play of such an influence in social movements:—

"According to Lady Jenne, "Luxury, ease, comfort are the watchwards of a large part of society in London, and they are undermining our society as surely and as certainly as they did that of Rome." We have grown very rich, and "we have a large leisured class whose only aim and occupation is amusement, and where such exists it must demoralize and relax all social restraints." Men and women who only live for pleasure, and have no sense of the obligations of life and its duties, are becoming the parents of the young England around us, & to a serious degree the example of their lives is being impressed on the boys and girls who are their children and who ought to carry on the traditions of which we in all time have been so proud. The influences of which we speak are perhaps less felt among boys than girls...But society, as well as the tone of society, is not governed or influenced by men, their role in society being a very secondary one; for society in its tone and composition is created by women, and as women are virtuous or the reverse, so is their *entourage*."

"The decay of strong religious belief in some sections of English society is, Lady Jenne adds, sweeping away some of the strongest restraints to which human nature can be subjected. Modern thought, too, is changing the relations of men and women, and unless some unforeseen event occurs which will change the direction in which society is moving public opinion will, Lady Jenne holds, "insist on its reconstruction on a firmer and entirely different basis, and the lines of demarcation which now divide society will become more clearly defined." The "smart set" will follow its natural inclination, which has for its object the gratification of every pleasure and whim which are the fashions of the moment. The other, with certain ideals of duty, will, as now, endeavour to realize the responsibilities these impose, and, being composed of the strength and backbone of the country, will always be the power to adjust the baneful influence of its competitor Fortunately for England, the mass— and the most important mass— of opinion will be on the side of the latter; but, unfortunately, owing to the glamour shed over the former by the rank and position of its leaders, it will always be the smarter and therefore, the fashionable set."

## वऱ्हाड

हवामान—गेल्या आठवड्यांत एक दोन दिवस मोठ्या तुफानाचा वारा सुटून किंचित पाऊस पडला. पर्जन्यकाळ सुरू होण्याचीं सर्व चिन्हें दिसत होतीं, परंतु शनिवार रविवार पासून वारा अगदीं पडल्यामुळें उकाडा विशेष होतो. ईश्वरकृपेनें पटकीचा आजार मंदावत चालल्याचें कळतें. उन्हाळा पावसाळा या दोहोंमधील ऋतु पालटत असल्यामुळें किरकोळ आजारास आरंभ झाला आहे.

रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे नायब तहसिलदार पुसद हे किरकोळ सात दिवसांचे रजेवर इकडे येऊन आपल्या कामावर आनेरोजीं रुजू झाले.

उमरावतीचे सिव्हिल सर्जन डॉ० रो हे विलायतेस रजेवर गेल्या कारणानें मद्रासेकडील सर्जन क्याप्टन बरटॉन यांस त्यांचे जागीं नेमल्याप्रमाणें ते आपल्या कामावर येऊन दाखल झाले.

आम्हीं पूर्वी कळविल्या प्रमाणें येथील डेपुटी कमिशनरचे हेडक्लार्क मि० गॉडफ्रो यांची बदली उमरावतीचे डेपुटी कमिशनरचे हेडक्लार्कचे जागां झाल्या वरून ते लवकरच उमरावतीस जातील व त्याचे येथील जागीं मि० वुइल्यम शमेरट यवतमाळ डेपुटी कमिशनरचे हेडक्लार्क हे येणार व त्यांचे यवतमाळचे जागेवर मि० थॉंप हे जाणार.

बाळापूर तहसिलदारीचे खालीं झालेले जागेवर तूर्त येथील डेपुटी कमिशनरचे क्लार्क ऑफवी कोर्ट यांस नेमिलें व त्यांनीं आपले कामाचा चार्ज घेतला.

उमरावतीचे डेपुटी एजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण बापट हे रजेवरून परत आले आणि पुनः त्यांनीं आपले उमरावतीचे कामाचा चार्ज घेतला. व तेथील आक्टिंग डेपुटी इन्स्पेक्टर मि० गोपाळ रामचंद्र पिटके हे इलिचपूर येथील डेपुटी एजुकेशनल इन्स्पेक्टरचे जागीं जातील व तेथील आक्टिंग इन्स्पेक्टर मि० बळवंत विष्णु वैद्य हे येथील आपले ट्रेनिंग कालेजचे जागेवर परत येतील.

### नोटीस

रा. कनुलाल चुनीलाल अगरवाले रहाणार गोन्हापूर तालुके मलकापूर यासी सोनाजी वल्लद पुंनाजी माळी अंत्रजकर हल्लीं वस्ती सुटाळे बुजरुख याजकडून:--

नोटीस देण्यांत येतें कीं, मौजे अंत्रज तालुके खामगांव येथील माझे मालकीचें शेत सर्वे नंबर ६३ एकर गुंठे १९०३९ आकार रुपये १७ यांतील तिसरा हिस्सा मी तुम्हाला तारीख २९ मार्च सन १८९२ इ० रोजीं रुपये २५० अडीचशाला खरेदी देऊन खरेदीखत रजिष्टर करून दिलें. सदरहू खरेदीखताचे मुबादल्याचे रुपये खरेदीखत रजिष्टर करून दिल्या नंतर सदरील हिस्सा मी तारीख २९ फेब्रुवारी सन १८९२ इ० रोजीं नारायण अंबादास सराफ दुकान मौजे गोन्हापूर याजला जे तारणगहाणखत रुपये २०० अक्षरीं दोनशाचे करून देऊन रजिष्टर करून दिले त्याजला देण्याचे ठरले होते. परंतु तुह्मास फार वेळां मी रुपये मागितले आणि सांगितलें कीं, सदरील नारायण अंबादास याजला रु. ऐन ठ्याना सुद्धां देऊन पावती मला द्यावी परंतु आज पावेतों तुह्मी मला अगर सदरील नारायण अंबादास याजला रुपये मुळींच दिले नाहींत. वरून मी यापूर्वी एक नोटीस टपाल मार्फत दिली असतां सुद्धां रु. देत नाहीं. वरून आतां ह्या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत नारायण अंबादास याजला रुपये २५० अडीचशें आणि त्यांनीं जी शेताची किस्तकारी केली त्याजबद्दल झालेल्या खर्चा सुद्धां चुकते देऊन मला पावती आणून द्यावी. याप्रमाणें न केल्यास तुह्मी माझें पासून करून घेतलेले खरेदीखत रद्द होईल आणि मी शेत दुसऱ्यास विक्री करीन हे पक्के समजावें. कळावें. मिती जेष्ठ शुद्ध २ तारीख २८ माहे मे सन १८९२ इ०

(सही)

सोनाजी वल्लद पुंनाजी
माळी निशाणी खुद्द
हातची असे.

## वर्तमानसार

ऱ्होपाला जातीचें एक झाड आहे, त्याला विस्तवाचें मुळींच भय नाहीं. हें झाड मोठें चमत्कारिक आहे. त्याचा आकार पीळदार असून त्याची उंची सुमारें वीस फूट असते. ज्या ठिकाणीं उष्णतेमुळें कुरणें रानें वर्षांतुन दोन वेळां जळून खाक होतात, अशा मुलखांत हें झाड बहुशः उगवतें. जिकडे तिकडे जळून खाक झालें ह्मणजे हीं झाडें काय तीं तगतात. जेथें गवत देखील कधीं उगवायचें नाहीं किंवा उगवलें तरी तगावयाचें नाहीं, अशा उषरावर हीं झाडें चांगलीं उगवतात व वाढतात. कुंभारझाड ह्मणून एक झाड आहे. त्याला अशीच आगीची मुळींच भीति नसते. यां झाडाच्या लांकडाचीं भांडीं करून खुशाल विस्तवावर ठेवावीं. त्यास ढीम देखील होत नाहीं. तीं भांडीं अगदीं मातीच्या भांड्यासारखीं दिसतात पाप्लार नांवाचें एक झाड आहे त्यासही आगीचें फारसें भय नसतें इंग्लंदांत नॉटिंघम नांवाच्या शहरीं एका गिरणीला एकदां आग लागली. ती दुसऱ्या मजल्यावर लागली यामुळें वरचा सगळा भाग जळाला; परंतु खालच्या भागानें मुळींच पेट घेतला नाहीं. चौकशी करतां असें कारण कळलें कीं, खालची तक्तपोशी पाप्लार झाडाच्या लांकडाची केलेली होती.

लंडन टाइम्सनें आपली छापखान्याची जागा व पार्लमेंट सभागृह यांच्यामध्यें टेलिफोन लावला आहे. दोहोंमध्यें अंतर दीड मैल आहे.

इंडिया सरकारानें हिंदुस्थांतील कालवे दुरुस्त करण्याकरितां अडतीस लाख पन्नास हजार रुपयांची मंजुरी दिली आहे. यां पैकीं रयतेंच्या— नेटिवांच्या—हातांत किती पडतील बरें?

काबूलचा अमीर व इंग्रज सरकार यांच्यामध्यें कांहीं बेबनाव उत्पन्न झाला आहे असें दिसतें.

सिमला बाजारांत राहणाऱ्या नेटिव लोकांनीं तेथून निघून जावें ह्मणून त्यांजवर दोन रुपये कर बसविण्याचा विचार सुरू आहे.

करमणूक.

राक्षसी बेडूक—जिवलाकर ( फ्रान्स ) येथें एक बेडूक सांपडला आहे. त्याच्या शरीराचा घेर ३ फूट असून त्याचें वजन ६६ पौंड आहे. तो सेंट एटना एथील एका व्यापाऱ्यानें ७० पौंड किंमतीस विकत घेतला. त्याचें डरावणें कुत्र्याच्या भोंकण्या सारखें आहे. त्याला पाहण्याला लोकांच्या झुंडीच्या झुंडी येत असतात.

कलकत्यास एक गमतीचें जुळें आलें आहे. हें जुळें दोन मुलींचें असून त्या मुली एकमेकास छातीच्या हाडानें जुळलेल्या आहेत. त्यांचें वय चार वर्षांचें आहे. या दोन्ही मुली चांगल्या सशक्त असून त्यांस तहान, भूक, झोंप चांगली लागते आणि ती एकाच वेळीं लागते. या शिवाय सर्व इंद्रिय व्यापार दोन्ही एकाच वेळीं करितात. ह्या दोन्ही मुली कोणत्याही गोष्टीचा विचार बरोबरच करितात आणि एका मुलीनें उच्चारलेलें वाक्य दुसरी मुलगी पुरें करते! सदरहु जुळें चिकागोएथील प्रदर्शनांत जाणार आहे. ईश्वराची लीला अघटित खरीच.

धा० वृ०

लढाईसाठीं राखून ठेवण्याकरितां १००० घोडा विकत घेण्याबद्दल स्टेट सेक्रेटरी कडून हिंदुस्थान सरकारास लिहून आलें आहे. हे घोडे सहारनपूर येथें ठेवण्यांत येणार आहेत.

काश्मिरांत लवकर दुष्काळ पडणार अशीं चिन्हें होऊं लागलीं आहेत. झेलम नदींतील पाणी अगदीं आटलें. पाऊस फार लवकर पडला पाहिजे.

सु० प०

भविष्य कथन—पंडित सुब्राय सिद्धांती राहणार दक्षण कानडा चालू वर्षा संबंधानें भविष्य कळवितात तें खालीं लिहिल्याप्रमाणें.

१ अश्विनी, भरणी, या महानक्षत्रांत चोंहोंकडे साधारणपणानें थोडथोडा पाऊस पडेल. गर्जना व झंजावत पुष्कळ होतील. समुद्र अतिशय खवळून जहाजांची बरीच हानि होईल.

१ रोहिणी, मृगषीर्ष, आर्द्रा, पुनर्वसू नक्षत्रांत अतिशय पाऊस पडून मनुष्यास हवेच्या रोगाची बाधा होईल.

पुष्य, आश्लेषा, मघा या नक्षत्रांत पाऊस साधारण कमीच पडेल.

१ पूर्वा, उत्तरा, हस्त, चित्रा या नक्षत्रांत पृथ्वीवर जितका पाहिजे तितका पाऊस पडेल.

१ या वर्षांत असा सुकाळ होईल कीं तसा सुकाळ पुढें १९ वर्षें येणार नाहीं.

म० मि०

आगगाड्यांच्या टकरा चुकविण्यासाठीं मुंबईस एकानें अशी युक्ति काढिली आहे कीं, रेल्वेच्या एका भागावर एकसमयावच्छेदेंकरून दोन आगगाड्या आल्या असतां आपोआप विद्युत्प्रवाह चालू होऊन वाफेच्या नळ्या एकदम बंद व्हाव्या व आगगाड्या थांबाव्या.

हिंदुस्थानांत सोन्याचीं नाणीं सुरू करावीं अशी सूचना मि. एल्. एस्. किंग यांनीं कामन्स सभेंत आणली आहे.

हिंदुस्थानांतील कौन्सिलासंबंधानें बिल पास झालें.

विलायतेच्या पार्लमेंटची लवकरच निवड होणार.

अफगाणिस्थानांत लौकरच लढाई होणार अशीं कित्येकांस दुःस्वप्नें पडूं लागलीं आहेत.

क० त०

कोणत्या पिकाकडे किती जमीन—सन १८९१ सालीं बंगाल इलाखा शिवाय करून सगळ्या हिंदुस्थानांत १९४९००००० एकर जमिनींत पीक होतें. २८० लक्ष एकर जमिनींत भात, २०० लक्ष एकर जमिनींत गहूं, २६० लक्ष एकर जमिनींत मिलेट, १०० लक्ष एकर जमिनींत कापूस, व बाकीच्या जमिनींत इतर धान्यें व पिकें होतीं असें एक पत्रक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे.

ज्यांस लिहितां वाचतां येत नाहीं त्या लोकांस पार्लमेंटच्या निवडींत मत देण्याचा अधिकार नाहीं असा पार्लमेंटानें ठराव केला.

१५४ माणसें मारणारा चित्ता—बंगाल इलाख्यांतील राजशाही जिल्ह्यांत एक चित्ता फार माजला होता. गेले २१ महिन्यांत ह्या चित्यानें घरांतुन ओढओढून १५४ माणसें ठार मारलीं शेवट गेल्या एप्रिल महिन्याच्या दुसरे तारखेस एका शिकाऱ्यानें त्यास ठार मारून लोकसंहार कमी केला. लोकांस निःशस्त्र केल्याचा हा केवढा भयंकर परिणाम बरें. तरी सरकारचे डोळे कोठें उघडतात?

३००० रुपयांची सत्रंजी—पुण्यांतील गव्हरनर साहेबांच्या कौन्सल हालांत घालण्या साठीं ७० फूट लांब, ३० फूट रुंद अशी एक मोलवान सत्रंजी यरवडा येथील तुरुंगांत तयार होत आहे. ह्या सत्रंजीची किंमत ३००० रुपये होईल असें ह्मणतात. ह्या भागांत एवढी मोठी सत्रंजी ही पहिलीच तयार होत आहे.

अत्यंत दुःखाचें मरण—मुंबईस एका कोष्ट्याची १४ वर्षांची एक बायको होती. नवऱ्याच्या आणि सासूच्या जाचामुळें ती वारंवार पळून जात असे. शेवट तिच्या अंगावरचे कपडे पेटून त्यामुळें फार भाजून ती मरण पावली. मरणा पूर्वीं तिची जबानी माजिस्त्रेटापुढें झाली तेव्हां माझ्या सगळ्या कपड्यावर राकेल ओतून त्यांस नवऱ्यानें आग लावून दिली असें तिनें आपल्या जबानींत सांगितलें.

शु० सू०

इजिप्तमधील वाडहिाफाजवळ दरवेशी लोकांनीं पुनः दंगा करण्यास सुरुवात केली आहे. इजिप्त फौज त्यांचा पाठलाग करीत आहे.

आह्मी एडनला सुखरूप पोंचलों व आह्मांस इकडची हवा उत्तम मानवली अशी गायकवाडानीं आपल्या दिवाणास एडनहून तार केली आहे.

ब्रह्मदेशांतील वंथू जातीच्या लोकांनीं जो बंडाळा मांडला आहे तो मोडण्यासाठीं त्या सर्व लोकांस सरकारांतून माफी देण्यांत आली आहे.

अजमीर मारवाड प्रांतांत ४ लाख रुपये शेतकऱ्यांस कर्जाऊ दिले.

वायव्य सरहद्दीवर कोणकोणत्या ठिकाणीं फौज ठेवावी याबद्दल हिंदुस्थान सरकारांत विचार चालूं आहे.

तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत देतां येणाऱ्या सरकारी कर्जास १०० रुपयांस आज चार चार टक्के व्याज येत असून दर १०८ आहे. यावरून हिंदुस्थान सरकारची पत किती वाढत चालली आहे. हें सहज समजेल.

विजापुरास १२०९ लोक दुष्काळकामावर असून त्याबद्दल आठवड्यास १४६ रुपये खर्च येतो.

एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत पंजाबांत ७ हजार लोक पटकीनें मेले.

हिंदुस्थानांत कोणतें नाणें सुरू करावें या बद्दल विचार करण्यासाठीं सिमल्यास लवकरच एक सभा भरणार आहे.

कलकत्याकडील एका जुन्या कंपनीनें नुकतेंच दिवाळें काढलें. कंपनीस सुमारें ४० पासून ६० लाख कर्ज आहे.

मद्रासच्या कांहीं भागांत पाऊस पडल्यामुळें तेथील स्थिती सुधारली आहे. इतर ठिकाणीं गुरें पटापट मरत आहेत.

जर्मन सरहद्दीवर रशिया आपलें सैन्य वाढवीत असून आज त्या ठिकाणीं त्याचें ३२ हजार सैन्य आहे.

फ्रान्सांत बायकांनीं स्वयंपाक कसा करावा अशाबद्दल शाळा स्थापन झाली आहे. हिंदुस्थानांत पुरुषांनीं स्वयंपाक कसा करावा अशी शाळा स्थापन करण्याची वेळ आली आहे.

विलायतेस सैन्य व आरमारा साठीं १८ कोटी रुपये गेल्या वर्षी खर्च झाले. यापैकीं १८० लाख रुपये कर्जाऊ काढलेले आहेत.

गेल्या दिसेंबर पर्यंतच्या एका वर्षांत युनायटेड किंगडम मध्यें १२४७ लोक रेल्वे अपघातानें मेले व ११,९०० जखमी झाले.

क्यास्पियन समुद्रांत एक रशियन आगबोट बुडून तिच्यांतील २०० इराणी उतारू बुडून मेले.

मद्रासेकडील मि. आडरू नांवाच्या मिशनरीच्या बंगल्यावर तेथील लोकांनीं हल्ला केला. व दोन तीन खिडक्या फोडून मिशनरीवरही हात टाकला असें ह्मणतात. एक ब्राह्मणाचा मुलगा बाटतो आहे ह्मणून हा दंगा झाला असावा.

आपल्या धर्माची निंदा करतात ह्मणून हासल बासेस जातीच्या पारशी लोकांस काबूलच्या अमिरानें नुकतेंच ठार मारून त्यांचा पुढारी काजबाश यास त्याचा उजवा हात तोडून आंधार कोठडींत टाकण्यांत आलें आहे असें श्रीनगर येथें आलेले बारबदचे रहिवासी सांगतात.

काबुलास पटकी इतकी उठली आहे कीं, सरकारी हाफीसें बंद पडलीं आहेत.

नागर जातींतील उजरखान नांवाच्या एका सरदारास श्रीनगर येथील किल्ल्यांत राजकीय कैदी ह्मणून ठेवण्यांत आलें आहे त्याजबरोबर त्याचे चार चाकरही आहेत.

ठा० अ०

अमेरिकेंत जलप्रय—मिसुरी आणि मिसिसिप्पी यांच्या थड्यांमध्यें फार मोठाले पूर येऊन कापसाचें पीक सफा बुडालें. माणसेंही बहुत मेलीं. सेंटलुई व मिसिसिप्पीच्या कांठच्या प्रदेशांत ११० लक्ष डाल्लरांचें नुकसान झालें. व १९०० चौरस प्रदेश पुरामध्यें बुडाला होता. न्यूयार्कची ता० २१।५ तार.

ज्ञा० च०

## अकोला बाजारभाव.

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | १००=≡ |
| „ ५९ दिवसाच्या मुदतीची | | | १०० |
| सुवर्ण २५ रुपे | १०८। | आळशी | ९५॥ |
| गहूं काठे | ७५॥ | बनशी | ७८॥। |
| जवारी | ४८ | सर्की | ६ |
| कापूस | ३७ | रुई | ९९ |
| मीठ ३॥= | तूप ९॥ | तेल | ५॥= |

सच्याचे भाव. ( मोंगलाई )

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | बसंत | १९४९ | ४६ |
| गहूं | वैशाख शुद्ध | १९४९ | ६५॥ |
| आळशी | चैत्र शुद्ध | १९४९ | ८६॥ |
| सर्की | वैशाख नवे सालची | १९४९ | ९।— |
| रुई | फाल्गुन | १९४९ | ९५॥ |

शु० प०

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.